स. ग्रं. मं. ठाणें
प्र. क्र.
. नं.

हिंदुस्थानचे

# हिन्दु सम्राट्

लेखक

वामन पुरुषोत्तम हडींकर,
राजापुर, (जि० रत्नागिरी.)

RFFBK-0005869

मूल्य ८ आणे

हिंदुस्थानचे

# हिन्दु सम्राट्



लेखक


वामन पुरुषोत्तम हर्डीकर

राजापुर ( जि० रत्नागिरी )



REFBK-0005869


मूल्य ८ आणे

मुद्रक
वसन्त श्रीपाद सातवळेकर, बी. ए.,
भारतमुद्रणालय, औंध (जि० सातारा.)

शके १८६१, सन १९३९

प्रकाशक-
स्वाध्याय-मंडल, औंध,
(जि० सातारा)

# लेखकाचें निवेदन.

सुमारें तीन वर्षांपूर्वी 'भारत के हिंदु समाट्' ह्या नांवाचा हिंदी भाषेंतील एक ऐतिहासिक ग्रन्थ एके ठिकाणीं वाचावयास मिळाला, त्यांतील माहिती उपयुक्त असल्यामुळे आणि मला इतिहासविषयाची आवड असल्यामुळे मुख्य मुख्य गोष्टींचें टांचण काढून ठेवलें. नंतर त्या पुस्तकांत वर्णिलेल्या चंद्रगुप्त, हर्ष इत्यादि सम्राटांप्रमाणे दक्षिणेंतील अर्वाचीन राजांचीही माहिती मिळवावी, म्हणून पाहूं लागलों. इतक्यांत सुदैवाने 'विजयनगर' येथील साम्राज्याविषयी (षट्शताब्दि) महोत्सवाच्या निमित्ताने वृत्तपत्रांतून थोडथोडी माहिती येऊं लागली व पुढे 'विजयनगर-स्मारक ग्रन्थ' ही प्रसिद्ध झाला. त्याच सुमारास 'राष्ट्रकूटांचा इतिहास' ही हातीं आला. अशा कांही पुस्तकांचे आधाराने 'पुरुषार्थ' मासिकामध्ये 'हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्' ह्या शीर्षकाखाली एक लेखमाला गत वर्षी लिहिली. ती पुष्कळ वाचकांना पसंत पडल्यावरून त्यामध्ये आणखी बरीच भर घालून हें पुस्तक आज लिहीत आहें.

इतिहासलेखनासंबंधी असा एक महत्त्वाचा प्रश्न आहे की, देशांतील नागरिकांच्या गतकालीन स्थितीच्या वर्णनाला त्या देशाचा इतिहास म्हणावें कीं त्या देशावर चढाई करून राज्य करणाऱ्या परकी लोकांच्या वर्णनाला त्या देशाचा इतिहास म्हणावें? अर्थात् आपल्या देशाच्या बाबतींत विचार केला तर कोणीही मान्य करील कीं, ज्या वेळीं हे परकीय लोक 'हिंद भूमीला' मातृभूमि समजून आणि ह्या देशांतील बहुजन-समाजाच्या सुखदुःखांशीं एकरूप होऊन जिव्हाळ्याने राष्ट्राची सेवा करूं लागतील, त्याच वेळीं त्यांचें कर्तृत्व, बुद्धिमत्ता आणि वैभव आमच्या राष्ट्रीय इतिहासांत जमा करणें न्यायाचें होईल! अशा तऱ्हेचें उदाहरण द्यावयाचें झालें, तर 'जायसी,' 'कबीर,' किंवा 'दादाभाई नौरोजी' अशा थोर

पुरुषांचें देतां येईल. प्रस्तुतचें पुस्तक लिहीत असतां स्वकीय परकीय विषयक माझी दृष्टि अशा प्रकारचीं आहे.

निरनिराळया कालखंडांतील, निरनिराळया प्रांतांतील आणि घराण्यांतील दहा प्रमुख सम्राटांचीं चरित्रें हीं आपल्या इतिहासामधील मुख्य केंद्रें कल्पून देशांतील अनेक राजकीय घडामोडी, धार्मिक व साहित्यिक चळवळी आणि इतर कित्येक विषयांतील आमची प्रगति ह्यांचें दिग्दर्शन करण्याचा ह्या पुस्तकांतील प्रयत्न वाचकांना रुचेल, अशी अपेक्षा आहे. आपल्या इतिहासाविषयीं अद्याप पुष्कळ माहिती प्रकाशांत यावयाची आहे आणि कित्येक गोष्टींचा एकमताने निर्णयही व्हावयाचा आहे. विक्रम व शालिवाहन राजे आणि त्यांचा-शककर्त्यांचा काळ ह्याविषयी बराच मतभेद आहे ! दिल्लीचा ‘ कुतुबमिनार ’ पृथ्वीराज चव्हाणाचा ‘ यमुनास्तंभ ’ ( कीर्तिस्तंभ ) ठरत आहे; तर दुसरीकडे कलकत्याची अंधारकोठडी ही कल्पित कथा मानली जाऊं लागली आहे ! अशा बिकट स्थितींतून मार्ग काढण्याला अस्सल ऐतिहासिक साधनांची अनुकूलता, विद्वत्ता, पर्यटन व आर्थिक सुस्थिति वगैरे कितीतरी गोष्टींची जरूर असते; परन्तु हें भाग्य साऱ्या लेखकांना कोठून मिळणार ? म्हणून यथामति केलेला हा प्रयत्न गोड करून घेण्याची वाचकांना नम्र विनंती करीत आहें.

हिंदुस्थानचे हिंदु सम्राट् हें पुस्तक लिहून झाल्यानंतर प्रकाशनाच्या खर्चाचा प्रश्न मला भेडसावूं लागला; परन्तु औंध येथील श्री० पंडित श्री० दा० सातवळेकर ( स्वाध्याय-मंडळ ) ह्यांनी उदार अन्तःकरणाने ती जबाबदारी मान्य केली, म्हणूनच माझें मनोराज्य सफल होऊं शकत आहे. ह्या त्यांच्या औदार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. पुस्तक-प्रकाशनाच्या पूर्वीं पुरुषार्थ मासिकांत ह्याचविषयी प्रसिद्ध झालेले माझे लेख नामांकित इतिहासलेखक प्राध्यापक ओतूरकर ह्यांजकडे अवलोकनार्थ पाठवून नंतर प्रस्तावना लिहून देण्याविषयी त्यांना विनंती केली आणि

त्यांनी वेळांत वेळ काढून सुंदर व अधिकारयुक्त प्रस्तावना लिहून दिली म्हणून मी त्यांचा फारच आभारी आहें. तसेंच डॉ० अळतेकर, एम्. ए., अध्यापक हिंदु विद्यालय [ काशी ] ह्या प्राचीन हिंदी इतिहासाचे तज्ज्ञांनी लक्ष्यपूर्वक पुस्तक वाचून आपला चांगला अभिप्राय दिला आणि त्यांतील, चुकाही दाखवून कित्येक सुधारणा सुचविल्या, ह्याविषयी मी फार आभारी आहें. शुद्धिपत्रामध्ये त्यांनी व प्रा० पोतदार ह्यांनी सुचविलेल्या सुधारणा परिशिष्टांतून स्वतंत्रपणें दाखल केल्या आहेत. महाराष्ट्रांतील वयोवृद्ध संशोधक रावसाहेब गो० स० सरदेसाई ह्यांनीही माझें पुस्तक मोठ्या आस्थेने वाचून व सुंदर अभिप्राय देऊन मला उपकृत केलें आहे. त्याचप्रमाणे इतिहाससंशोधक प्रा० पोतदार [पुणें] ह्यांचा माझ्या विचारसरणीशीं मतभेद असुनही त्यांनी काळजीपूर्वक समग्र पुस्तक वाचून आपले विचार मला सविस्तर कळविले आणि संशोधनाचे दृष्टीने कांहीं दोष दाखविले, ह्याबद्दल मी त्यांचे आभार मानितों. अनेक मराठी व हिंदी इतिहासग्रंथांतून मिळालेल्या माहितीचा मला फार उपयोग झाला आहे, म्हणून त्या सर्व ग्रंथकर्त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनाने होणारें अखिल भारतांतील ऐतिहासिक थोर पुरुषांचें ओझरतें दर्शन वाचकांस त्यांच्यासंबंधी अधिक जिज्ञासा उत्पन्न करील व त्यांना अधिक माहिती मिळविण्यास प्रवृत्त करील, अशी आशा आहे.

वा० पु० हर्डीकर,
राजापुर ( जि० रत्नागिरी )

# प्रस्तावना.

राजापूरचे व्यासंगी शिक्षक व या ग्रंथाचे कर्ते श्री० वा० पु० हर्डीकर यांचा माझा साक्षात् परिचय नसतांही त्यांनी मला प्रारंभींचे चार शब्द लिहावयास सांगितले, तेव्हा मला त्यांचा आग्रह मान्य करण्यास संकोच वाटला. एक तर प्रस्तावना लिहिण्यास जें कांही समाजांत मान्यत्व असावें लागतें, तें मला आलें आहे, असें मला वाटत नाही व ज्या प्राचीन भारताच्या इतिहासांतून त्यांनी आपल्या बहुतेक हिंदुसम्राटांची निवड केली आहे, त्या विषयाचा माझा गाढ परिचय नाही. बुद्रुकपणा व विषयप्रभुत्व यांपैकी दोनही बाजूंनी मी लंगडा असतांही हे चार शब्द लिहिण्यास उद्युक्त झालों, याचें कारण श्री० हर्डीकर यांच्यासारखे व्यासंगी गृहस्थ महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यांतून यथाशक्ति काम करीत असतां पुण्यासारख्या ठिकाणीं राहिल्याने ज्याच्या बुद्धीला खतपाणी मिळालें व प्राध्यापकत्वामुळे सहजीं अंगीं जडणारी प्रसिद्धीही प्राप्त झाली, त्या मजसारख्यांनी आपापल्या मगदुराप्रमाणे दूरस्थांचा परामर्ष घेणें, हें त्यांचें कर्तव्य आहे; कारण अशा करण्याने इतस्ततः विखुरलेले व्यासंग उत्तेजन पावून वाटचालीला लागतात, असा विचार माझ्या मनांत आला व त्यांच्या विनंतीला होकार देऊन मोकळा झालों.

'हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्' या चरित्रसंग्रहांत वाचकांच्या हिंदुत्वबुद्धीला आवाहन केलेलें आहे. हिंदुस्थानांत हिंदुसम्राट् होऊन गेले आहेत, हें मुद्दाम सांगण्याची पाळी आली आहे, त्याला काय करावें ? लेखकांनी उपोद्‌घातांत म्हटल्याप्रमाणे आजची हिंदुस्थानच्या इतिहासाचा अभ्यास

करण्याची पद्धत व अभ्यासिलीं जाणारीं अनेक पाठ्य पुस्तकें अशीं सदोष आहेत की, हिंदुस्थानचा इतिहास वाचणाराच्या मनांत स्वतःबद्दल अवहेलना वाटूं लागावी. हा न्यूनतागंड काढून टाकण्यास प्रस्तुतचें पुस्तक उपयोगी पडेल, यांत शंका नाही.

हिंदू सम्राटांची निवड करतांना त्यांत प्रांताभिनिवेश नाही. त्यांत मागध आहेत, राजपूत आहेत, राष्ट्रकूट आहेत व तुळुवही आहेत. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून एकमेकांविषयी आपलेपणाची भावना उत्पन्न होण्यास प्रत्येक प्रान्ताने संस्कृतिसंरक्षणासाठी कोणकोणतें कार्य केलें, याची माहिती करून घेतली पाहिजे. इंग्रजांनी हिंदुस्थानला इ० स० १९३५ च्या कायद्याने 'प्रांतिक स्वायत्तता' देण्याच्या आधीच कित्येक वर्षें आपण निराळ्या अर्थाने प्रांतिक स्वायत्तता अनुभवीत आहोंत; ही प्रांतिक स्वायत्तता म्हणजे मुंबईच्या चाळींत ज्याप्रमाणे शेजारशेजारचीं बिऱ्हाडें एकमेकांशीं परक्याप्रमाणे तुसडेपणाने वागतात, तसे मराठी, कानडी, तेलगु, तामिळ, मल्याळी, गुजराथी, हिंदी, बंगाली, उडिया या भाषा बोलणारे लोक जणूं काय आपला एकमेकांशीं कांही सम्बन्ध नाही, अशा पद्धतीने आपले छोटे संसार एकलकोंडेपणाने करीत आहोंत! इंग्रजीद्वारा एकमेकांचा एकमेकांस परिचय होतो व आजच्या राजकीय परिस्थितींत सर्वांचीं सुखदुःखें एकसारखीं असल्याने राष्ट्रीय सभेसारख्या ठिकाणीं आपण आपल्या राष्ट्रीय ऐक्याचा उच्चार व आचारही करतों; पण ही ऐक्याची भावना वृत्तींत किती मिसळली आहे, हें पहावयाचें असल्यास गुजराथ्यास 'शामळो,' कानड्यास 'इड्डुगुड्डु,' बंगाल्यास 'रसगुल्ला' अशीं नांवें ठेऊन आपण किती चांगले आहोंत, अशी प्रौढी कशी मारली जाते, हें थोडेंसें लक्ष्यांत घ्यावें. ही परप्रान्ततुच्छतेची भावना जावयाची असल्यास सर्व हिंदुस्थानभर हिंदुसंस्कृतीसाठी रक्तसिंचन करणाऱ्या थोर पुरुषांचें एकाच सरणींत स्मरण करावयास हवें. जिव्हाळ्याचें प्रेम उत्पन्न होण्यास नुसत्या सद्यःकालीन हितैक्याच्या

जाणिवेने भागत नाही. प्राचीन परंपरेचीही आठवण करून द्यावी लागते. प्रस्तुतच्या पुस्तकाने ही सार्वराष्ट्रीय भावना निर्माण होण्यास सहाय्य होईल, यांत शंका नाही.

यावर कोणी म्हणेल की, सार्वराष्ट्रीय भावना उत्पन्न होण्यास नुसत्या हिंदु सम्राटांस आवाहन काय म्हणून? याचें एक उत्तर वर दिलेंच आहे की, 'हिंदु सम्राटांचा विसर पडण्याजोगी सध्याची शिक्षणपद्धति आहे म्हणून.' दुसरें असें की, सार्वराष्ट्रीय ऐक्याची जाणीव असतांहि, एखाद्या प्रसंगाने हिंदुधर्मरक्षकांचेंच तेवढें स्मरण करणें हा गुन्हा होतो कीं काय? त्यांतून या धर्मरक्षक सम्राटांनी धर्मांधतेने राष्ट्रीय ऐक्यास विघातक कृत्यें केलीं असतीं, तर गोष्ट वेगळी. हिंदु सम्राटांनी धर्माच्या नांवाखाली परधर्मीयांवर जुलूम केले नाहीत, मशिदी वा मठ उद्ध्वस्त केले नाहीत, गांवें बेचिराख केलीं नाहीत, जिझिया बसविला नाही, विहिरींत पाव टाकून कोणास बाटविलें नाही! उलट मशिदींस देणग्या दिल्या, बौद्धधर्मियांस आश्रय दिला व अगदी विसाव्या शतकांतहि युरोपियनांना साधणार नाही, इतक्या व्यापक व उदार अंतःकरणाने कृष्णदेवराय तुळवासारख्यांनी बौद्ध, लिंगायत, जैन, नास्तिक या सर्वांना आपल्या दरबारांत व राज्यांत बोलावलें. अशा उदार बुद्धीच्या पुरुषश्रेष्ठांनी, इतरांनी संकुचित बुद्धीने हिंदु धर्मावर आणलेलीं संकटें देहदंड सोसून मागे सारलीं व आपला पाणीदारपणा जगाच्या प्रत्ययास आणून दिला. अशा सर्व पुरुषांना एका मालिकेंत बसवून त्यांचें स्मरण करावयाचें नाही, तर काय आजचें राजकीय ऐक्याचें नाटक साधण्यासाठी सकाळीं उठल्याबरोबर जय रुद्रदामनम्, जय अल्लाउद्दीन खिलजी, जय राजा मानसिंग, जय राघोबा दादा, जय लॉर्ड क्लाइव्ह, जय लॉर्ड डलहौसी, असा जयघोष सुरू करावयाचा?

हिंदुस्थानच्या हिंदु सम्राटांचें स्मरण केलें, म्हणजे हिंदुस्थानांतील अहिंदु

सम्राटांचा आम्हांस विसर पडला, असें मानणाऱ्यांच्या अधीर वृत्तीची कींव करावी तेवढी थोडी आहे, किंवा तेवढ्याने सार्वराष्ट्रीय राजकारण बिघडलें, असें मानणेंही चुकीचें आहे. लढाईचा उद्देश एकच असला, तरी तींत लढणाऱ्या शिपायांचें शौर्य निरनिराळ्या कारणांनी जागृत होतें. कोणास आपला भाऊ मृत्यु पावला म्हणून चेव येतो, कोणी असहाय स्त्रीपुरुष मृत्युमुखीं पडले म्हणून सूड घेण्यास प्रवृत्त होतात, कोणास सेनापतीच्या रक्षणासाठी देहाचें बलिदान करावेंसें वाटतें, कोणास रेड क्रॉसवर बॉंब पडल्याबद्दल राग येतो, त्याचप्रमाणे स्थूल राष्ट्रीय भावना जागृत करण्यास एकेकाचीं मर्मस्थानें डिवचावीं लागतात. धर्म हें एक हिंदुसमाजाचें डिवचण्याजोगें मर्मस्थान आहे, म्हणून हिंदु सम्राटांना आवाहन करणें, हें योग्य आहे.

खेरीज हिंदुस्थानांत राहणाऱ्या कांही अहिंदूंची मनोवृत्ति नजरेआड करून कसें चालेल? हिंदुस्थान हें एक राष्ट्रच नाही, हिंदुस्थानांत लोकशाही झाल्यास बहुसंख्य हिंदूंचें मताधिक्य होणार, हें जाणून हिंदुस्थानास लोकशाही राज्यघटना जुळणारी नाही, अशी ओरड करण्यापर्यंत अल्पसंख्याकांची मजल गेलेली आहे! अशा स्थितींत हिंदुस्थान हें एकसंधी राष्ट्र टिकवून धरण्याची जबाबदारी कोणावर आहे, याचा ज्याचा त्याने विचार करावा. मुसलमान या देशांत परके आहेत, असें मी तरी कालत्रयीं म्हणणार नाहीं. इस्लामधर्मियांच्या सहवासाने हिंदुस्थानावर जसे कांही अनिष्ट परिणाम झाले असतील, तसे इष्ट परिणामहि झाले आहेत, हें मी 'हिंदुस्थानांतील मुसलमानांचें साम्राज्य' या पुस्तकांत दाखविलें आहे. हिंदुस्थानांतील बहुसंख्य मुसलमान हिंदूंच्या हाडामासाचे व रक्ताचे आहेत. कित्येक तर हिंदु देवतांची पूजाही करतात. एकट्या विजापूर जिल्ह्यांत मुसलमानांतील ३८ पंथांपैकी १५ पंथ किंवा धंदेवाईक हिंदु देवतांची पूजा करतात. त्यांचीं नांवें–बागवान, बकरकसाब, पिंजारी, पेंढर, कंजर, आतार, मण्यार, मुकेरी, छपरबंद, भडभुंजे, गवंडी,

झरकार, शिकलगार, पखाली, नकरची. सटाण्याचे मुसलमान आपल्या मुलांना शेंडी ठेवतात, महाबळेश्वरचे धावड खंडोबा व म्हसोबाचे टाक यांची पूजा करतात. हें सर्व सांगण्याचें कारण एवढेंच की, खरोखर मुसलमान हे कोणी या देशांत परके नाहीत. आज अराष्ट्रीय वृत्ति सोडल्यास, धर्मानें मुसलमान किंवा ख्रिश्चन राहून हिंदी राष्ट्राच्या उद्धारार्थ खटपट करणें कांहीं कठीण नाहीं. असें ऐक्य साधावें ही राष्ट्रीय सभेची खटपट आहे; पण यासाठीं राष्ट्रीय सभेचे कुलगुरु महात्माजी, बॅ० जिना यांच्याकडे जों जों धाव घेत आहेत, तों तों त्यांच्याकडून ऐक्यासाठीं पुढे केलेला हात झिडकारला जात आहे व एकसंधी हिंदी राष्ट्राचे तुकडे करण्याचें घातुक राजकारण खेळविलें जात आहे. अशा वेळीं आसेतुहिमाचल पराक्रम करणाऱ्या हिंदु सम्राटांना आवाहन करून हिंदूंची राष्ट्ररक्षणाची बुद्धि जागृत केली, तर चुकलें कोठे ? समाजांत उत्पन्न होणारें वाङ्मय हें कळत नकळत परिस्थितीचा पडसाद घेऊन उठत असतें.

यावर समाजवादी व राष्ट्रविचारवादी म्हणतील, 'धर्म ही दिवसेंदिवस राजकारणांत दुय्यम स्थान प्राप्त होत जाणारी बाब आहे. राष्ट्रीय भावनेस स्वयंभू असें स्थान युरोपांत निर्माण झालें आहे, तसें हिंदुस्थानांतही होईल किंवा आर्थिक हितसम्बन्ध हे धर्मैक्य किंवा वंशैक्य यावर अधिष्ठित झालेल्या भावनांना छेदून नवे वर्ग निर्माण करतील. जागतिक राजकारणाचा हा प्रवाह लक्ष्यांत घेऊन हिंदु वा इस्लाम या धर्मभावनांना राष्ट्रीय जागृतिसाठीं डिवचणें योग्य नाहीं. धर्मास दुय्यम स्थान मिळणें, जें क्रमप्राप्त आहे, तें होऊं द्यावें.' यास उत्तर हेंच की, समाजवादी किंवा राष्ट्रविचारवादी म्हणतात तितकी ही मतभेदातीत बाब नाहीं. कम्यूनिझमवर अधिष्ठित झालेल्या रशियानें हिटलरशीं सहकार्य केलें आहे. खुद्द हिटलरनें वंशशुद्धीच्या भावनेनें जर्मनांस डिवचून जागे करण्यांत यश मिळविलें आहे. अशा स्थितींत हिंदुसंस्कृतीच्या रक्षणासाठीं हिंदी राष्ट्रास डिवचून जागें

करणें अशक्य किंवा गैर कां वाटावें ? अल्पसंख्याकांनी हिंदूंना ते बहुसंख्य हिंदु म्हणून विरोध करावा, राष्ट्राचे तुकडे पाडण्याची भाषा बोलावी व हिंदूंनी स्वसंस्कृति व स्वदेश यांच्या संरक्षणासाठीदेखील हिंदुत्वास आवाहन करूं नये, हा न्याय कोठला? हिंदुधर्म व संस्कृति हीं निरनिराळ्या स्थित्यंतरांतून गेलेलीं आहेत. 'जगा व जगूं द्या, नांदा व नांदूं द्या' इतकें व्यापक हिंदुसंस्कृतीचें स्वरूप आहे. त्यांत प्राचीन काळीं आर्य, अनार्य, द्रविड, शक असे भिन्न वंश सामावले; बौद्ध, जैन, लिंगायत, नास्तिक हे धर्म सामावले, शैव व वैष्णवादि पंथ सामावले. अशा व्यापक अधिष्ठानावर उभारलेल्या संस्कृतीच्या चौकटींत बहुंशीं आमच्याच हाडामासाच्या व रक्ताच्या मुसलमानांना आपला धर्म संभाळूनही बसतां येणार नाही व त्यांनी आपल्या स्वतःच्या संस्कृतीसाठी अरबस्थानाकडे पाहिलें पाहिजे, असें मुळीच नाही; पण त्यांनी तिकडे नजर देऊन हिंदुस्थानचे तुकडे करण्याचें मनांत आणलें तर 'हिंदुस्थानच्या हिंदु सम्राटां'ची स्फूर्ति आसेतु-हिमाचल हिंदुस्थानचें एकसंधी संरक्षण करण्यास जागती उभी आहे, हें सहज पाहणारांच्याही लक्ष्यांत आणून दिलें पाहिजे.

प्रस्तावनारूप प्रबन्ध म्हणतां म्हणतां बराच वाढला; पण मोठेपणाचा आव आणून लेखकाचे गुणदोष सांगणें किंवा समतोल विधानें करीत करीत त्यांचें अभिनन्दन करणें ही मला न साधण्याजोगीं कामें बाजूस सारून या प्रस्तावनेचे निमित्ताने 'हिंदु सम्राटांचें आवाहन' ही मध्यवर्ती कल्पना या पुस्तकाचा आत्मा चर्चेस घेऊन त्यावर माझे विचार मी मांडले आहेत. मला लेखकांनी ही संधि देऊन, माझा गौरव केल्याबद्दल मी आभारी आहें.

पुणें, कार्तिक व० ५, शके १८६१ }
ता० १-१२-३९ }

रा० वि० ओतुरकर.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| | उपोद्घात् | १–७ |
| १. | सम्राट् चंद्रगुप्त मौर्य. | ९–१६ |
| २. | सम्राट् अशोक. | १७–२२ |
| ३. | सम्राट् गौतमीपुत्र शातकर्णी. | २३–२६ |
| ४. | सम्राट् समुद्रगुप्त. | २७–३२ |
| ५. | हिंदूंच्या प्राचीन वसाहती. | ३३–३५ |
| ६. | सम्राट् हर्षवर्धन ( शिलादित्य. ) | ३६–४३ |
| ७. | वैदिक धर्माचा पुनरुत्कर्ष. | ४४–४६ |
| ८. | महाराणा बाप्पा रावळ. | ४७–५२ |
| ९. | सम्राट् तिसरा गोविंदराज राष्ट्रकूट. | ५३–५७ |
| १०. | सम्राट् पृथ्वीराज चव्हाण. | ५८–६२ |
| ११. | धार्मिक आंदोलन. | ६३–६७ |
| १२. | सम्राट् कृष्णदेवराय तुळुव. | ६८–७३ |
| १३. | राष्ट्रपुरुष आणि परकी सुराज्याचें अन्तरंग. | ७४-७८ |
| १४. | छत्रपति शिवाजी. | ७९–८८ |
| १५. | उपसंहार. | ८९–१०० |
| | परिशिष्ट १ | १०१ |
| | परिशिष्ट २ | १०२ |


# काही आधारभूत ग्रन्थ.


१. मध्ययुगीन भारत, लेखक कै० चिंतामणराव वैद्य.

२. विजयनगरस्मारकग्रंथ, संपादक– भा० इ० सं० मंडळ, पुणें.

३. मराठी रियासत, लेखक– श्री० सरदेसाई.

४. रजपुतांचा उदय व ऱ्हास, लेखक– श्री० देशपांडे.

५. भारत के प्राचीन राजवंश, लेखक– पं० विश्वेश्वरनाथ रेऊ.

# अभिप्राय.

( १ )

'हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्' ह्या नांवाचें शंभर पृष्ठांचें पुस्तक रा० वामन पुरुषोत्तम हर्डीकर यांनी अभिप्रायार्थ पाठविलेलें वाचून पाहिलें. मुसलमानांच्या आगमनापासून किंबहुना सिकंदर बादशहाच्या स्वारीपासून हिंदु लोक परकीय हल्ल्यांपुढे नेहमीच हार खात आले आहेत, असा पुष्कळ बाह्य लेखकांचा व तदनुसार आमच्यांतील जाणत्यांचाही अवास्तव समज बनलेला प्रचलित आहे. हा समज सर्वथा चूक असून, हिंदु आर्यांनी स्वराष्ट्राच्या संरक्षणार्थ पराकाष्ठेचे श्रम करून आपलें क्षात्रतेज हजारो वर्षेपावेतों भरपूर प्रकट केलें आहे, हा प्रकार विद्यार्थी दशेपासून अभ्यासकांच्या मनावर ठसणें अत्यंत अवश्य आहे. याच विषयावर एक सुंदर लेख श्री० अरविंद घोष यांनी सुमारें वीस वर्षांपूर्वी मॉडर्न रिव्ह्यूंत लिहिलेला मी मोठ्या आस्थेने वाचला. तेव्हापासून ह्या विषयासम्बन्धाने माझे मनांत जो नवीन प्रकाश उत्पन्न झाला, त्याचाच अनुवाद श्री० हर्डीकर ह्यांच्या पुस्तकांत उतरलेला पाहून मला संतोष वाटतो.

ह्या लहानशा पुस्तकांत त्यांनी कित्येक ठळक ठळक राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें देऊन वरील मिथ्या ग्रह सप्रमाण खोडून काढला आहे. येणेंकरून आपल्या तरुण पिढीला नवीन स्फूर्ति प्राप्त होण्याला पुष्कळ मदत होईल; कारण निराशेचें पटल होतकरू पिढीवर उत्पन्न होणें बिलकुल उपयोगी नाही. पुस्तकांत वर्णिलेले हिंदु सम्राटांचे नानाविध पराक्रम वाचकांनी ध्यानांत ठेविल्यास राष्ट्रकार्याचें निकडीचें एक अंग सिद्धीस जाईल आणि ह्याच दृष्टीने मी ह्या पुस्तकाचें अभिनन्दन करून, त्याचें प्रयोजन सिद्धीस जाईल, अशी आशा व्यक्त करितों.

सम्राट् शब्दांत फक्त राज्यकर्त्यांचा समावेश न करितां शंकराचार्य, नानक इत्यादि नैतिक विजेत्यांचाही त्यांत अन्तर्भाव करण्यांत आला, हें युक्तच आहे.

ता० १२।९।१९२९ गो० स० सरदेसाई ( कामशेत, जि० पुणें. )

## ( २ )

हिंदूंच्या पराक्रमाची, कर्तबगारीची आणि संस्कृतीची कल्पना सामान्य वाचकांना येण्याला ' हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्' ह्या पुस्तकाचा फार चांगला उपयोग होईल. मुंबई विश्वविद्यालयामध्ये अद्यापि प्राचीन हिंदु इतिहास व संस्कृति ह्या विषयाच्या अभ्यासाला कोठेच स्थान दिलें गेलें नाही. त्यामुळे आपल्या पूर्वजांची उज्ज्वल संस्कृति आणि अभिनंदनीय पराक्रम यांची माहिती सुशिक्षित लोकांनाही फारशी नसते. प्रस्तुत पुस्तक लिहून ह्या बाबतींतील बहुजनसमाजाचें अज्ञान अंशतः तरी नाहीसें करण्याचा प्रयत्न श्री० हर्डीकर यांनी केला आहे. तो जितका स्तुत्य आहे, तितकाच यशस्वीही झाला आहे.

ग्रंथकाराने सम्राटांची निवड अशा कौशल्याने केली आहे की, सदरहू पुस्तक समग्र वाचल्याने वाचकांना हिंदूंच्या इतिहासाची इ० स० पू० ३५० ते इ० स० १७०० पर्यंतच्या काळाची ठोकळ मानाने कल्पना येईल. राजकीय घडामोडींबरोबर ग्रन्थकाराने सांस्कृतिक व धार्मिक विषयांचीही चर्चा केली आहे व त्यामुळे वाचकांना एकंदर हिंदु समाज, त्याचें अंतरंग व ध्येयें ह्यांची चांगली कल्पना येईल. आपल्या मुलांपुढे योग्य आदर्श ठेवले जावेत, त्यांच्या अंतःकरणांत स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान प्रज्वलित व्हावा, त्यामुळे त्यांच्या आयुष्याला योग्य वळण लागावें, अशी इच्छा असणाऱ्या प्रत्येक हिंदु पालकाने हें पुस्तक आपल्या मुलांना वाचावयास दिल्याखेरीज राहूं नये.

पुस्तकामध्ये कांही किरकोळ चुका आहेत; परन्तु त्यामुळे त्याच्या मुख्य उद्देशाला बाध येत नाही.

डॉ० अनंत सदाशिव अळतेकर, एम्. ए., एल्‌एल्. बी., डी. लिट्०
प्राचीन हिंदी इतिहास व संस्कृति ह्या विषयाचे ' मणींद्रचन्द्र नंदी ' अध्यापक हिंदु विश्वविद्यालय, काशी.

( १ )

' हिंदुस्थानचे हिंदु सम्राट् ' ह्या छोट्या चरित्रमालेची पूर्वमुद्रित प्रत पोचली. त्या बाबतींत माझा मतविसंवाद कळविणें अवश्य कर्तव्य वाटतें. ( उपोद्घात ) पान २ मध्ये ' राष्ट्रियत्व व देशाभिमान ' आमच्यामध्ये होता, असें म्हणण्याचा एकंदर रोख दिसतो; पण आपल्या संस्कृत वाङ्मयामध्ये राष्ट्रीयत्व ( Nationalism ) व देशाभिमान ( Patriotism ) ह्या अर्थानें कितीसा मजकूर आढळतो ? दुसरें असें की, त्या कल्पनाच सर्वोत्तम, असें आहे काय ? त्या कल्पनांचे युरोपीय अवतार जगाच्या अधोगतीसच कारणीभूत झाले आहेत ! त्या जशाच्या तशा घेणें आम्हांस जरूर नसून, आसचेंच तत्त्वज्ञान साफसूफ करून वाढविलें पाहिजे. आमची विश्वबंधुत्वाचीच कल्पना सरस आहे. कमी एवढेंच की, आम्ही भौतिक शास्त्र-ज्ञान कांहीच वाढविलें नाही.

पुढे पान ३-४ वर नजर देतों. कांही प्रश्न करून लिहिलें आहे की, ह्यांचीं उत्तरें देतील, तर प्रतापी हिंदु वीरच ! हिंदु वीर प्रतापी होते, यांत शंका नाही; परन्तु भोवतालच्या जगाच्या मानानें विचार केला, तर कोणीही सत्यदृष्टि इतिहासलेखक त्यांची कींवच करील ! रणजितसिंह-बाजीराव ह्यांची समकालीन युरोपियनांशीं तुलना केली असतां, त्यांमध्ये मोठी तफावत दिसून येईल. समोर काय चाललें आहे, याचेंही ज्यांना आकलन करतां आलें नाही, त्यांचा बडेजाव गाण्यांत अर्थ नाही. आमचें मोठेपण खरोखर कशांत होतें, तें ओळखलें पाहिजे.

पुढे पान ५-६ पाहूं. पारतन्त्र्य आणि अपकर्ष ह्या बाबतींत अमेरिका-इटाली वगैरे देशांशीं हिंदुस्थानची तुलना केली आहे; पण ते देश आकार, लोकसंख्या इत्यादि बाबतींत कमी असल्यामुळे हिंदुस्थानसारख्या प्रचंड, सुसंपन्न व सुसंस्कृत देशाची त्यांच्याशीं तुलना होणार नाही. तसेंच

इंग्लंड-अमेरिकेंतील परतंत्र भावाचा सम्बन्ध आणि इंग्लंड-हिंदुस्थानचा सम्बन्ध हे दोन्ही जाति-संस्कृतिभिन्नता लक्ष्यांत घेतली, तर एकाच मापाने मोजतां येतील काय ?

(पृष्ठ ८६) शिवाजीने देशाची भावना मराठ्यांत उत्पन्न केली, असें विधान आहे; पण शिवाजीची भावना आधुनिक देशवाचक patriotic असूं शकणार नाही. (पृष्ठ ८०) १६४६ इ० शिवाजीच्या कार्याचा आरम्भ, हा खरा नसून तो शके १५६२ (१६४० इ०) मध्ये झाला होता.

—प्रा० दत्तो वामन पोतदार, पुणें.

---

[ सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री० प्रा० दत्तो वामन पोतदार ह्यांनी आपला अभिप्राय (मतभेद) विस्तृत पत्र पाठवून कळविला. तो सारांशरूपाने छापला आहे. —लेखक ]

# उपोद्घात.

'हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्' हा शब्दप्रयोग कोणाला सकृद्दर्शनीं कांहीसा चमत्कारिक वाटला, तर नवल नाहीं; कारण सध्या ह्या देशावर इंग्रज बादशहांचें 'यूनियन जॅक' फडकत आहे आणि इंग्रजांच्या पूर्वी अनेक शतकें मुसलमान बादशहांचा 'चांद' मिरवत होता! अर्थात् हिंदु सम्राटांच्या अस्तित्वाला आणि कर्तृत्वाला वाव तरी कसा मिळणार? असा प्रश्न उत्पन्न होणें साहजिक आहे; परन्तु हिंदुस्थान देशाच्या इतिहासाचें योग्य परिशीलन केलें, तर आपणांस समजून येईल की, मुसलमानी अमदानीपूर्वी अनेक प्रतापी हिंदु सम्राटांनी पिढ्यानुपिढ्या सार्वभौमत्व आणि अतुल वैभव उपभोगिलें आहे! इतकेंच नव्हे तर इस्लामी सद्दीचा जोर असतांहि कित्येक हिंदु विरांनी स्वतन्त्र राज्यें आणि साम्राज्यें उभारलीं व चालविलीं आहेत. त्यांचें कर्तृत्व हीच देशांतील जागृतीची आणि पुनरुत्थानाच्या पात्रतेची खूण होय! म्हणून अशा कांही घडामोडींचा इतिहास ज्यांच्या आयुष्यांत घडून आला आहे, अशा प्रकारच्या कांही प्रसिद्ध *'हिंदु सम्राटांचीं उद्बोधक चरित्रें' मी ह्या पुस्तकांत सारांशरूपाने देण्याचें योजिलें आहे.

---

* वीसाव्या शतकांतील लोकशाहीच्या ह्या नवयुगांत 'हिंदु सम्राट्'

(टीप पृ० २ वर चालू)

सर्व सुधारलेल्या देशांतून प्रतापी पूर्वजांचा उज्ज्वल इतिहास योग्य रीतीने लिहून, भावी पिढीसमोर त्याचा आदर्श ठेविला जातो; परन्तु आमच्या देशाची गोष्टच न्यारी आहे! कित्येक परकीय आणि स्वकीय इतिहासकारही कळत किंवा नकळत आमचा इतिहास अशा रीतीने आम्हांपुढे मांडीत आले आहेत की, त्यावरून होणाऱ्या अर्धवट आणि विपर्यस्त ज्ञानापेक्षा पूर्ण अज्ञानहि हितकारी होईल. असल्या इतिहास-ज्ञानावरून निघणारीं प्रमेयें आणि अनुमानें म्हणजे अर्थाचा अनर्थ होय! कोणी म्हणतो, हिंदूंना अर्थात् बहुसंख्य हिंदी लोकांना (Nationality) 'राष्ट्रीयत्व' ही चीज माहीतच नाही! इंग्रजी शिक्षणाने आणि युरोप-अमेरिकेच्या वाढत्या दळणवळणाने अलीकडे आपल्या देशांत 'देशाभिमाना'चें पीक नव्यानेच येऊं लागलें आहे! तर दुसरा कोणी सांगूं लागतो, हिंदूंचीं राज्यें म्हणजे 'राजा करील ती पूर्वदिशा' ह्याच तत्त्वाने चालणारीं; प्रजा म्हणजे जणू मुकीं जनावरें! अशा प्रकारें पाहिजे ते आक्षेप हिंदुस्थान देशाबद्दल आणि हिंदु जातीबद्दल घेतले जात आहेत. याचें कारण मुख्यतः आमच्या इतिहास-लेखनांतील सदोषता हेंच आहे. पुढील उदाहरणांवरून माझ्या विधानाची सत्यता कळून येईल-

हिंदी विद्यार्थ्यांपुढे त्यांच्या देशासंबंधी चार सोप्या व खऱ्या गोष्टी

---

हा शब्दप्रयोग पुष्कळांना अप्रिय व तिरस्करणीय वाटण्याचा संभव आहे. कित्येकांना 'भाकरी'च्या प्रश्नापुढे 'धर्म-जात-संस्कृति' ही अवास्तव कटकट वाटण्यासारखी आहे. परन्तु माझ्या मतें 'भाकरी'चा प्रश्नही धर्मरक्षणाच्या अंगभूत आहे. समाजाचें धारणपोषण हा धर्माचाहि उद्देश आहेच. तसेंच 'सम्राट्' शब्द पाहूनही नाक मुरडण्याचें कारण नाही. जपान व इंग्लंडमध्ये अद्याप सम्राट् आहेत. प्रजातन्त्रपद्धति वाखाणीत असतां त्यांतही 'सर्वाधिकारी' निर्माण होत आहेत! त्यांच्या राज्यपद्धतीशीं तुलना केली, तर 'हिंदु सम्राटां'नी प्रजेला मतस्वातन्त्र्य अधिक दिलें होतें.

ठेवण्याचा हेतु ज्याच्या प्रस्तावनेमध्ये प्रदर्शित केला आहे, अशा एका 'भाषांतरित' सोज्वळ पुस्तकांत लेखक-महाशय म्हणतात की, "हिंदुस्थान देशाचा बचाव करण्याचे कामीं आर्यांची सुधारणा आणि लढाऊ सामर्थ्य हीं कुचकामाचीं होत...... मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळे निदान इतकें तरी चांगलें झालें की, हिंदी लोकांमध्ये लढवय्ये लोकांची चांगली भर पडली....... ब्रिटिश अमदानींत थंड हवेमधील गोऱ्या शिपायांची बहुमोलाची भर हिंदी सैन्यांत पडत आहे. तसेंच ब्रिटिश आरमाराच्या सहाय्याने परकीय हल्ल्यापासून आपल्या किनाऱ्याचें रक्षण करण्याचें सामर्थ्य आता हिंदुस्थानला आलें आहे. अशा प्रकारची प्रौढी आजतागायत कोणत्याही काळीं हिंदुस्थानास सांगतां आली नसती ........"

वरील मजकुरावरून विद्यार्थ्यांच्या मनावर कशा प्रकारचा ठसा उमटेल बरें? अर्थात् आपण हिंदु लोक दुर्बळच आहोंत आणि त्यामुळे आमच्या रक्षणाला निरंतर दुसऱ्या कोणाची तरी आवश्यकता आहे! पर्यायाने स्पष्टच बोलावयाचें म्हणजे 'हिंदु जाति' यावच्चंद्रदिवाकरौ परतन्त्र राहण्यालाच पात्र आहे! असो. ब्रिटिश आरमाराच्या सहाय्याने आपल्या किनाऱ्याचें रक्षण करणें, ही गोष्ट हिंदुस्थानसारख्या प्रचंड राष्ट्राला आणि येथील विद्यमान राज्ययंत्राला मोठीशी भूषणावह नाही, असें समतोल विचाराचा कोणी त्रयस्थदेखील मान्य करील; मग त्यांत प्रौढी ती कसली मारावयाची? तसेंच मुसलमान लढवय्यांची भर पडल्यानन्तर तरी दिल्लीच्या मध्यवर्ती सत्तेला या देशावर वायव्येकडील लोकांनी केलेल्या स्वाऱ्यांचा बंदोबस्त योग्य प्रकारें करतां आला काय? देशाच्या अवाढव्य किनाऱ्याचें संरक्षण स्वतःच्या हिंमतीवर करण्याची सावधगिरी व राजकीय कर्तृत्व बहामनी सुलतानांनी, विजापूरच्या अदिलशहांनी किंवा जगाचे बादशहा म्हणवून पाहणाऱ्या मोंगल बादशहांनी दाखविलें आहे काय? ह्या

*

प्रश्नांचीं उत्तरें जर अल्पस्वल्प तरी होकारार्थी देऊं शकतील, तर रणजित-सिंह, हरिसिंह किंवा शिवाजी-बाजीरावांसारखे प्रतापी हिंदु वीरच!

असल्या इतिहास-लेखन-पद्धतीचा विस्तारभयास्तव आणखी एकच दाखला देतों. प्राथमिक शाळांतील मुलांना प्रथम आपल्या प्रांताचा अर्थात् महाराष्ट्राचा इतिहास शिकविण्यांत येतो. ह्या उद्देशाने लिहिलेल्या एका प्रचलित पुस्तकामध्ये पहिल्या धड्यांत अगस्तिमुनि आणि श्रीरामचंद्र-प्रभृति आर्य लोक दक्षिणेकडे दंडकारण्यांत येऊन जरा साफसूफ करून वस्ती करूं लागतात, तोंच पुढल्या धड्यामध्ये अचानक 'अल्लाउद्दीन खिलजीचा हल्ला आणि देवगिरीच्या यादवांची शरणागति! बिचाऱ्या शालिवाहन किंवा चालुक्य-राष्ट्रकूटांसारख्या प्रसिद्ध राजवंशांची विचारपूसदेखील नाही! जणू काय रामावतारानन्तर हिंदूंमध्ये कांहीच 'राम' राहिला नाही! पुस्तक संपवितांना ग्रंथकारांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या नालायकीचें वर्णन कांही वेचक शब्दांत बरेंच दिलें आहे; परन्तु अष्टें-कोरेगावच्या लढाया व सेनापति बापू गोखल्याचें विलक्षण शौर्य आणि आत्मबलिदान अशा उल्लेखनीय गोष्टींना फाटा दिला आहे! पराभवाच्या वर्णनामध्येदेखील देशाच्या प्रतिष्ठेसाठी लढलेल्या वीरांविषयी वाचकांच्या अंतःकरणांत अनुकंपा व आदर आणि देशाविषयीं कळकळ कुशल लेखकाला उत्पन्न करतां येते; ही गोष्ट गेल्या महायुद्धामध्ये चीत झालेल्या जर्मनीमधील विद्वानांच्या लिखाणांवरून सिद्ध होण्यासारखी आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासाचें अशा प्रकारें थोडें फार ज्ञान झाल्यावर पुढील वर्गांतून हिंदुस्थानचा इतिहास विद्यार्थी शिकूं लागतात. त्यामध्ये पठाण-मोंगलांच्या झटापटी, इंग्रज-फ्रेंच वगैरे गोऱ्या लोकांचे चुरशीचे सामने आणि इंग्रज गव्हर्नर किंवा व्हाइसरॉय ह्यांच्या कारकिर्दी इत्यादिकांपुढे चंद्रगुप्त, अशोक किंवा हर्ष इत्यादि प्राचीन 'हिंदु सम्राटां'ची खबर विचार-ण्याला फुरसत कोणाला? तें राहूं द्या; अगदी अर्वाचीन काळच्या 'विजय-

नगर' येथील 'हिंदु साम्राज्या' संबंधी तरी विद्यार्थ्यांना कितीशी माहिती दिली जाते ? मग बृहद्‌भारतामध्ये विकास पावलेल्या आमच्या विद्या-कलादिकांची आणि जावा, सुमात्रा इत्यादि द्विपांतरांमधून झालेल्या प्राचीन हिंदु वसाहतींची ओळख तरी कोठून होणार ? ह्यापुढे ज्या थोड्याशा भाग्यवान् मुलांना दुय्यम किंवा उच्च प्रतीचें शिक्षण मिळूं शकतें, त्यांना इंग्लंड, ग्रीस, जपान इत्यादि देशांचा किंबहुना जगाच्या इतिहासाचाही थोडाबहुत परिचय होऊं शकतो; परन्तु स्वदेशाविषयीच्या ऐतिहासिक ज्ञानांत– कांही जिज्ञासु विद्यार्थी वगळले तर–विशेष भर पडूं शकत नाही असें म्हटलें तर फारसें धाडसाचें होणार नाही.

अर्थातच 'हिंदुस्थानचा इतिहास' हे शब्द उच्चारतांच प्रायः गजनवी महमुदाच्या स्वाऱ्यांपासून आजपर्यंतचा म्हणजे हिंदूंच्या अंतःकलहाचा, गाफीलपणाचा आणि फलस्वरूप जाचक पारतंत्र्याचाच इतिहास झटकन डोळ्यांपुढे उभा राहतो ! लहानपणापासून झालेलें हें अपूर्ण ज्ञान आणि तज्जन्य गैरसमज आजन्म वज्रलेपच होऊन बसतो; कारण पुढील आयुष्यक्रमामध्ये बिकट जीवनकलहांतील कामांमुळे किंवा रिकामपणाचा वेळ घालवण्याचीं अनेक मोहक साधनें हल्ली उपलब्ध झालीं असल्यामुळे ह्या विषयाकडे सर्वसामान्य लोकांचें लक्ष्य जात नाही. अशा प्रकारें विपर्यस्त व स्फूर्तिशून्य अशा ह्या इतिहासाच्या अभ्यासामुळे लहानपणींच 'निराशा' आणि 'स्वजनांविषयी तिरस्कार' इत्यादि भावनांची छाया आमच्या तरुण पिढीवर पडूं लागते ! आणि त्यामुळे आत्मविश्वासाचा व कर्तृत्वाचा अभाव होऊं लागतो; ही एक राष्ट्राची हानीच होय !

आता हिंदी लोकांचा व त्यांच्या गत इतिहासाचा कोणी कितीहि अभिमानी असला, तरी त्याला हीं गोष्ट कबूल करणें भाग आहे की, आमच्या कांहीं दुर्गुणांचें कठोर प्रायश्चित्त आम्हांला पारतन्त्र्याच्या रूपाने अनेक शतकें भोगावें लागत आहे; परन्तु अशा कांही दोषांमुळे व चालू

दीनदशेमुळे निराश होण्याचेंहि कारण नाही. जगाच्या इतिहासांत असा क्वचितच एखादा देश किंवा समाज अढळेल की, भरतीओहोटीच्या सृष्टि-क्रमाप्रमाणे ज्याला कांही काळतरी पारतंत्र्याच्या कुंद वातावरणांत रखडावें लागलें नाही ! आजची संपन्न व बलाढ्य अमेरिका दोनशे वर्षांपूर्वी इंग्लंड-च्या ताब्यांत होती; अफाट साम्राज्याचा धनी इंग्लंड देश एका काळीं रोमन साम्राज्याचा एक विभाग होता ! आणि तोच इटली (रोमन) कांही काळ ऑस्ट्रियाच्या पंजाखाली चेंगरून गेलेला होता ! ग्रीस, तुर्कस्थान व इराण ह्यांच्या इतिहासांतहि कांही दिवस सासूचे तर कांही सुनेचे आले असल्याचें दिसून येतें. मग तसे कांही दुर्दिन हिंदुस्थानच्या वाटणीला आले, तर त्याच्याच कपाळीं नालायकीचा शिक्का काय म्हणून ?

परकीयांचीं आक्रमणें केवळ हिंदुस्थानवरच झालीं आहेत, असें नाहीं; किंवा त्या आक्रमणांमध्ये नेहमी हिंदूंनीच हार खाल्ली असेंहि नाहीं. पर-कीयांना नामोहरम करून त्यांजकडून आपला फायदा करून घेणारेहि अनेक हिंदु राजे आमच्या गत इतिहासामध्ये होऊन गेले आहेत. त्यांच्या-प्रमाणे धर्म, तत्त्वज्ञान व इतर शास्त्रें इत्यादि विषयांतहि जगद्वंद्य असे अनेक थोर पुरुष आमच्या देशांत होऊन गेले आहेत. त्या सर्वांच्या पुण्य-प्रतापामुळे अनेक संकटांतून निभावून 'हिंदु संस्कृति' अद्याप टिकून राहिली आहे.

खरोखर विचार करतां हिंदु जातीच्या इतिहासाला ख्रिस्ती सनापूर्वी हजारो वर्षांपासून सुरवात झाली आहे. ज्याला आज 'ऐतिहासिक काल' म्हणून संबोधितात, त्याच्यापूर्वीहि अत्यंत अभिमानास्पद असा आमचा इतिहास पूर्वजांनी घडविलेला आणि लिहून ठेवलेला आहे. त्या अति प्राचीन काळाचे 'वैदिक काल', 'उपनिषत्काल', 'रामायणकाल', 'महाभारतकाल' इत्यादि अनेक भाग विद्वान् शोधकांनी कल्पिले आहेत. आमच्या अनेक ग्रंथांमधून जागजागीं सूर्यवंशांतील 'रघुराजा' व 'श्रीरामचन्द्र' किंवा

चंद्रवंशांतील 'भरत' आणि 'युधिष्ठिर' इत्यादि अनेक राजांच्या पराक्रमांचीं, त्यांच्या राज्यपद्धतीचीं आणि प्राचीन देशस्थितीचीं वर्णनें लिहिलेलीं आहेत.

परन्तु कालाच्या प्राचीनत्वामुळे त्यांमध्ये अस्पष्टता येणेंही अपरिहार्य आहे. म्हणून ज्या ग्रंथांतील ऐतिहासिक वर्णनें इतर देशांतील प्रवासी, राजे आणि राजदूत ह्यांनी आमच्याविषयी लिहिलेल्या माहितीशीं ताडून पाहतां येतात, असे आमच्या हिंदु विद्वानांचे प्राचीन ग्रंथ आणि त्यांतील ऐतिहासिक विषय हाच विश्वसनीय व बहुतांशीं निर्विवाद समजला जातो. अशा प्रकारच्या सुमारें दोन–अडीच हजार वर्षांच्या कालविभागांतील गणनीय अशा थोर हिंदु सम्राटांचीं चरित्रें प्रस्तुत पुस्तकामध्ये मी देत आहें. हीं दहा चरित्रें केवळ चरित्रांच्या पद्धतीने दिलेलीं नसून, तीं दहा प्रमुख केंद्रें कल्पून ओघाओघाने वेळोवेळीं झालेल्या अनेक घडामोडींचें आणि आंदोलनांचें थोडक्यांत वर्णनच आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.



द्रा. ग्रं. ५८६

# हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्.

## (१) सम्राट् चन्द्रगुप्त मौर्य.

( खिस्तपूर्व ३२२ ते २९८ )

आपल्या हिंदुस्थान देशावर स्वारी करणाऱ्या परकीय लोकांवर विजय मिळवून अजरामर कीर्ति मिळविणाऱ्या आणि तद्द्वारा मायदेशालाही गौरव प्राप्त करून देणाऱ्या अनेक हिंदु सम्राटांमध्ये चंद्रगुप्त ( मौर्य ) हा पहिला प्रतापी सम्राट् होय. त्याच्याविषयीं, कांही बांधकामें व शिलालेख इत्यादि प्रत्यक्ष साधनांवरून बरीच माहिती मिळू शकते. तसेंच हिंदु, बौद्ध व जैन लोकांचे अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथ 'चंद्रगुप्त' राजाच्या श्रेष्ठत्वाची साक्ष देत आहेत. ग्रीस देशाचा प्रसिद्ध वकील 'मेगॅस्थिनीस' हा त्याचे दरबारीं रहात असे. त्यानेही ह्या भारतसम्राटा–विषयी आणि त्या काळच्या देशस्थितीविषयी सुंदर वर्णन लिहून ठेविलें आहे. एवढ्यावरून 'चंद्रगुप्त' राजाची योग्यता निदर्शनास येते; परन्तु त्याबरोबरच कित्येक ठिकाणीं तपशिलाच्या बाबतींत मतभेदही आढळतो. त्यामधून सत्य शोधून काढण्यासाठी कित्येक विद्वान् संशोधकांचे प्रयत्न चालू आहेत, ही समाधानाची गोष्ट होय.

चंद्रगुप्ताच्या पूर्वपीठिकेविषयी एक प्रसिद्ध हिंदी चरित्रलेखक पं० रामनरेश त्रिपाठी म्हणतात—

"बौद्ध ग्रंथांवरून दिसून येतें की, गौतम बुद्धाच्या शाक्य वंशांतील एका राजावर 'विडूडभ' नामक राजाने स्वारी केली. त्या प्रसंगीं कांही शाक्य हिमालयाच्या उतरणीवरील एका चांगल्या ठिकाणीं जाऊन राहिले. त्या प्रदेशांत मोर फार होते. त्यामुळे त्यांनी नवीन वसविलेल्या आपल्या

गावाला 'मयूर-नगर' असें नांव दिलें. ह्याच लोकांना 'मयूर-नगर' निवासी किंवा मौर्य असें इतर लोक म्हणूं लागले. 'चन्द्रगुप्त' हा त्याच कुळांतील राजकुमार होता. पुढे 'विडूडभ' राजाच्या वंशजांनीही बरेच दिवस मौर्यांवर हत्यार धरिलें होतें. अशा संकटकालीं गर्भवती मौर्यराणी एके दिवशीं गुप्तपणें पाटलीपुत्र येथे जाऊन राहिली. तेथेच ती पुढे प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. तोच 'चंद्रगुप्त मौर्य' या नांवाने प्रसिद्धीस आला. 'चन्दो' नामक एका विश्वासू सेवकाने राणीच्या आज्ञेवरून गुप्तपणें त्या अर्भकाला एका गवळयाकडे नेऊन ठेविलें. तेथूनही कांहीं दिवसांनी एका शिकारी माणसाकडे त्या मुलाची रवानगी झाली. बाल चंद्रगुप्त अमळ मोठा होऊन, आपल्या सवंगड्यांबरोबर खेळूं बागडूं लागला.

''एके दिवशीं तीं मुलें 'न्याय करण्याचा' कांहीं खेळ खेळत होतीं. चिमकुला चंद्रगुप्त एका उंच दगडावर बसून न्याय देण्याचें काम करीत होता. त्या वेळीं त्या वाटेने आर्यचाणक्य ह्या नांवाचा एक चतुर ब्राह्मण चालला होता. त्याच्या दृष्टीला हा खेळ साहजिक पडल्यामुळे त्याने त्या बालन्यायाधिशाविषयी अधिक चौकशी केली. तेव्हा त्याची हुशारी पाहून त्या चाणाक्ष गृहस्थाने अनुमान केलें की, हा मुलगा पुढे कांहींतरी खास नशीब काढील ! पुढे मोठ्या प्रयासाने त्याच्या संगोपनाची जबाबदारी पत्करून आर्यचाणक्याने चिमखड्या चंद्रगुप्ताला आपणांबरोबर एका सुरक्षित स्थळीं नेलें आणि त्याला युद्धकला व राजनीति ह्या विषयांचें शिक्षण देऊन चांगलें तरबेज केलें !''

दुसऱ्या कांहीं विद्वानांचें मत असें आहे की, चंद्रगुप्ताच्या आईचें नांव 'मुरा' होतें. तिच्या नांवावरून त्याला 'मौर्य' नांव पडलें आणि तेंच पुढे त्याच्या घराण्याला चालू झालें.

चंद्रगुप्ताच्या चरित्राशीं 'आर्यचाणक्य' ह्याचा वेळोवेळीं सम्बन्ध येत असल्यामुळे त्याची थोडी माहिती येथे दिली असतां विषयान्तर होणार नाही. चंद्रगुप्ताच्या पूर्वी पाटलिपुत्र ( पाटणा ) येथे 'नंद' वंशांतील पराक्रमी हिंदु राजे राज्य करीत असून, सर्व राजेराजवाड्यांमध्ये ते प्रबल मानले जात असत. त्यांनी एकदा कांहीं अपमान केल्यामुळे 'आर्यचाणक्य' त्यांचा सूड उगवण्याची संधि पहात होता.* त्यासाठी एखादा राजपुत्र हाताशीं धरून मगध राज्यामध्ये क्रांति घडवून आणावी, अशा विचारांत तो हिंडत असतां वर सांगितल्याप्रमाणे चलाख व तरतरीत बाल 'चंद्रगुप्त' त्याला सुदैवाने मिळाला.

नंतर चाणक्याचें चातुर्य आणि तरुण चंद्रगुप्ताचें शौर्य हीं एकाच उद्दिष्टासाठी एकत्रित झालीं. ह्या कर्तृत्ववान् गुरुशिष्यांना ग्रीक बादशहा शिकंदर ह्याच्या स्वारीनंतर झालेल्या पंजाबमधील बेबंदशाही व बंडाळी-मुळे एक सुवर्णसंधीच चालून आली ! तिचा फायदा घेऊन बलाढ्य 'नंद' राजांचा पराभव करून मगधाचें राज्य मिळविण्याचे कामीं वीर चंद्रगुप्ताला चाणक्याच्या मुत्सद्देगिरीचें अप्रतिम साह्य झालें आणि त्यानंतरदेखील राज्यकारभारांतील व्यवस्थितपणा व राजकीय धोरण इत्यादि बाबतींत चंद्रगुप्ताला आर्यचाणक्याचा फार उपयोग होत असे. चंद्रगुप्त व चाणक्य ह्यांनी घडवून आणलेली राज्यक्रांति ही कदाचित् कोणी स्वार्थमूलकही

---

*'नंद' राजांबद्दल अप्रीति उत्पन्न होण्याचें कारण अशा प्रकारचें वैयक्तिक व क्षुल्लक नव्हतें, तर पंजाबवरील ग्रीकांच्या स्वारीची खबर दूर असलेल्या 'नंद' राजांस देऊन त्यांना ग्रीकांविरुद्ध युद्धाला प्रवृत्त करावें आणि देशाचें स्वातंत्र्य राखावें, अशा हेतूने आर्यचाणक्य पाटलि-पुत्राला गेला; परन्तु तें नंदांनी मनावर न घेतल्यामुळे तो रुष्ट झाला, असें-ही कोणी म्हणतात.

म्हणूं शकेल; परन्तु तसें मानलें तरीदेखील शिकंदरची पंजाबवरील स्वारी आणि नंतर पुनः लौकरच झालेली 'सेल्युकस् निकेटर' ह्याची स्वारी अशा दोन प्रसंगांची व त्यांच्या परिणामांची जर तुलना केली, तर चंद्रगुप्त-चाणक्यांनी केलेली राज्यक्रांति भारतीय राष्ट्राच्या हिताचीच झाली, असें दिसून येईल. देशांतील जी व्यक्ति किंवा जो व्यक्तिसमुदाय ( पक्ष ) निरंतर जागृत राहून आपल्या देशाचा गौरव वाढविण्याला समर्थ असेल, ती व्यक्ति किंवा तो पक्ष अधिकारारूढ होणें हें योग्यच मानलें पाहिजे व अशा वेळीं होणाऱ्या स्थानिक अस्वस्थतेला इष्टापत्ति असेंच सहजलें पाहिजे, हें उघड आहे.

जगज्जेता अलेक्झांडर दि ग्रेट ऊर्फ शिकंदर ह्याने ख्रिस्तपूर्व ३२५ ह्या वर्षीं तुर्कस्थान-इराणकडून दिग्विजय करीत शेवटीं पंजाबप्रांतावर स्वारी केली. पंजाबांतील राज्यें जिंकल्यानंतर गंगेच्या काठाने पूर्वेकडे जाण्याचा त्याचा विचार होता; परन्तु मगध देशांतील 'नंद' राजे प्रबल असल्यामुळे आणि सैन्यही त्या दीर्घकाल चाललेल्या स्वारीमुळे कंटाळल्या-कारणाने पंजाबमध्ये आपला ग्रीक सरदार ठेवून तो परत गेला. त्याची पाठ वळल्याबरोबर त्या सरदाराला हाकून देऊन ग्रीकांची सत्ता नष्ट करण्याचा पंजाबी लोकांनी यत्न सुरू केला. त्या प्रसंगीं त्या स्वातन्त्र्य-प्रिय लोकांचें नेतृत्व तरुण चंद्रगुप्ताने स्वीकारलें. 'तक्षशिला' घेऊन पंजाबवर आपलें वर्चस्व त्याने स्थापन केलें. नंतर त्या प्रदेशांतील 'पर्वतक' नांवाच्या एका राजाचें साह्य घेऊन चंद्रगुप्ताने मोठें सैन्य जमविलें आणि आर्यचाणक्याच्या सल्ल्याने मगध राज्यावर स्वारी केली. युद्धामध्ये चाण-क्याने अनेक कारस्थानें केलीं. शेवटीं नंद राजांचा पुरा नाश होऊन ख्रिस्तपूर्वी ३२२ ह्या वर्षीं भाग्यशाली 'चंद्रगुप्त' मगधाचा अधिपति झाला ! नंतर चाणक्य आणि 'राक्षस' ह्या नांवाचा नंदांचा प्रधान, ह्यांच्या साह्याने ह्या नूतन राजाने आपल्या राजवटीला योग्य वळण दिलें.

ख्रिस्तपूर्व ३०५ या वर्षीं ग्रीक राजा सेल्युकस् निकेटर याने पंजाब-मधून नष्ट झालेली ग्रीक सत्ता पुनः स्थापन करण्यासाठी हिंदुस्थानवर स्वारी केली. मगधाचा नूतन सम्राट् चंद्रगुप्त त्याच्याशीं सामना देण्याला सिद्ध होताच. शेवटीं मोठ्या निकाराचें युद्ध होऊन विजयश्रीने चंद्रगुप्ताचे गळयांत माळ घातली ! अनेक दृष्टींनी ह्या युद्धाचें विशेष महत्त्व आहे. शिकंदरच्या स्वारीच्या वेळीं 'नंद' राजांनी भारतावरील संकट जाणून वेळींच जोराने प्रतिकार करण्याची दक्षता दर्शविली नाही. पंजाबांतील शूर पौरस राजाने केलेला प्रतिकार ह्या जगज्जेत्या शिकंदरापुढे अपुरा ठरला. तरीहि शिकंदराने त्याच्या गुणांवर मोहित होऊन त्याचा गौरव केला. पुढे चंद्रगुप्ताने सावध राहून सेल्युकस् याला फार पुढे येण्यापूर्वीच गांठून सिंधू जवळ त्याचा पूर्ण पराभव केला. तात्पर्य, हिंदु लोक जागृत राहतील तर त्यांनाहि आपलें स्वातन्त्र्य-रक्षण करतां येतें, ही गोष्ट परम प्रतापी चन्द्रगुप्ताने सिद्ध केली आहे.

हिंदुस्थानची हवा उष्ण असल्यामुळे थंड देशांतील ताज्या दमाच्या लोकांपुढे आमचीं सैन्यें टिकाव धरूं शकत नाहीत, असा एक विचित्र आणि अतिशयोक्तिपूर्ण सिद्धांत आमच्या कांही इतिहासांतून ठोकून दिलेला असतो. अर्थात् जगाच्या अंतापर्यंत ( विषुववृत्तानजीक आमचा देश असल्याकारणाने ) आमच्या देशाची हवा उष्ण राहणार; त्या हवे-मुळे आम्ही कमकुवतच राहणार आणि मग असले आम्ही दीनदुबळे हिंदी लोक यावच्चंद्रदिवाकरौ परतन्त्रच राहाणार ! हें उघडच आहे. असल्या ह्या विचार-परंपरेची व्यर्थता वरील युद्धावरून समजून येईल. प्रस्तुतच्या चरित्राप्रमाणे पुढील कित्येक चरित्रांतुन अशाच प्रकारचे कांही प्रसंग येणार आहेतच. असो. पराभूत झालेल्या सेल्युकसने पुढील अटींवर चंद्रगुप्ताशीं तह केला—

१. ग्रीकांनी पंजाबवर हक्क न सांगतां काबूल, कंदाहार व मकरान हे आपले प्रांत चंद्रगुप्ताला द्यावे.

२. ग्रीकांचा वकील 'मेगॅस्थिनीस' चंद्रगुप्ताच्या दरबारीं रहावा.

३. चंद्रगुप्ताने सेल्युकसला पांचशे हत्ती द्यावे.

अशा प्रकारचा तह कबूल करून व आपली कन्या 'हेलेन' हिचा विवाह चंद्रगुप्ताबरोबर लावून देऊन ग्रीकराजा सेल्युकस निकेटर स्वदेशीं निघून गेला !

ह्या तहाप्रमाणे सेल्युकस् राजाचा वकील 'मेगॅस्थिनीस' हा चन्द्रगुप्ताचे दरबारांत रहात असे. त्याने लिहून ठेविलेल्या वर्णनावरून चन्द्रगुप्ताची राज्यपद्धति आणि तत्कालीन देशस्थिति कळून येते. मेगॅस्थिनीस ह्याच्या-नंतरदेखील ग्रीस आणि हिंदुस्थान ( मगध ) येथील राजांचे वकील एकमेकांकडे जात येत असत. अशा प्रकारें चंद्रगुप्ताच्या कर्तृत्वामुळे हिंदु-स्थान देशाला राजकीय महत्त्व प्राप्त झालें होतें. अंतरराष्ट्रीय सलोख्याच्या संबंधांमध्ये पुढे 'अशोक'च्या धर्मोपदेशकांनी अधिकच वाढ केली.

भारत–सम्राट् 'चंद्रगुप्त मौर्य' ह्याच्याजवळ सहा लक्ष पायदळ, तीस हजार घोडेस्वार, नऊ हजार हत्ती आणि चार हजार रथ एवढें प्रचण्ड चतुरंग दळ सज्ज होतें. त्याशिवाय एक लहानसा आरमारी विभाग असून गुप्त हेरांचेंही एक खातें होतें. त्या काळीं आरमारी लढाया झाल्या नाहीत. तरीसुद्धा सिंधु नदींतून चालणाऱ्या व्यापाराच्या संरक्षणाला अर्थात् चांचेलोकांवर दरारा बसविण्यामध्ये त्या 'जलसेने'चा उपयोग होत असे. अशा सैन्यबळावर सम्राट् चंद्रगुप्ताने बंगालच्या उपसागरापासून अरबी समुद्रापर्यंत आपला अम्मल बसविला. अफगाणिस्थान आणि बलुचिस्थान हे प्रदेशही ग्रीकांनी तहाअन्वयें त्याला दिले होतेच. सारांश, चंद्रगुप्ताचें साम्राज्य मोंगल बादशाह अकबर ह्याच्या साम्राज्याएवढें विस्तृत व बलाढ्य होतें, असें म्हणतां येईल.

सम्राट् चंद्रगुप्त ह्याची राज्यव्यवस्थादेखील नमुनेदार होती. तो सम्राट् होता, तरीही अनियंत्रितपणें वागत नसे. त्याला साह्य करणारी एक प्रजा-


प्रतिनिधींची मोठी सभा होती. राजधानी पाटलिपुत्र व त्यासारख्या कांहीं मोठ्या शहरांतून सुमारें तीस सभासदांची एक संस्था ( म्युनिसिपालिटी ) असून ती स्थानिक अंतर्गत व्यवस्था पाही. दररोज राजसभेंत येऊन चंद्रगुप्त न्यायदानाचें काम करी. धार्मिक दृष्ट्या तो 'शैव' हिंदु होता, असें पं० गौरीशंकर ओझा ह्यांच्यासारख्या विद्वानांचें मत आहे; पण जैन वाङ्मयाच्या आधारें तो जैन मताचा अनुयायी होता, असेंही कोणी म्हणतात. स्वतः चंद्रगुप्त कोणत्याही मताचा असला, तरी हिंदु, बौद्ध, जैन इत्यादि सर्व धर्मांच्या लोकांना तो समभावाने वागवीत असे. राजधानी पाटलिपुत्र हें शहर नऊ मैल लांब व दोन मैल रुंद असून त्याचे भोवताली भव्य तटबंदी होती. तटाला ६४ दरवाजे होते. तटाबाहेर प्रचंड खन्दक असून, तो शोणनदीच्या पाण्याने भरलेला असे.

चंद्रगुप्ताचे राजवाडे शहराचे मध्यभागीं असून, आपल्या सौंदर्याने व भव्यतेने शहराची शोभा वाढवीत होते. त्या वेळच्या प्रसिद्ध इराणी राजमहालांपेक्षाही ते शोभिवंत होते, असें तत्कालीन प्रवाशांचें मत आहे. त्यावरून भारतीय शिल्पकलेची प्रगति त्या वेळीं किती झाली होती, हें दिसून येतें. देशामध्ये मुख्य धंदा शेती असून, तिच्या भरभराटीकडे सरकारचें विशेष लक्ष्य होतें. शेतीच्या उपयोगासाठी अनेक कालवे बांधण्यांत आले होते. त्यांपैकी 'सुदर्शन झील' नामक काठेवाडांतील तलावासम्बन्धी कांहीं माहिती शकांचा राजा 'रुद्रदामन्' ह्याच्या एका शिलालेखावरून मिळते. उभ्या पिकाचा चौथा हिस्सा सरकारी कर घेतला जात असे. युद्धप्रसंगींदेखील शेतें व झाडी ह्यांना उपद्रव न होण्याची राजेलोक खबरदारी घेत असत. शेतीखेरीज कापड विणणें, कातडीं कमावणें, धातूंच्या खाणी चालवणें, इत्यादि अनेक धंदे देशभर चालत असत.

दूरदेशीं व्यापार करण्यासाठी हिंदू लोकांना सरकारकडून प्रोत्साहन मिळत असे. राजधानीपासून पश्चिमेस 'तक्षशिला' नगरीपर्यंत एक

प्रशस्त व प्रचंड सडक बांधलेली होती. डांक नेण्याआणण्याची व्यवस्था घोडेस्वारांचे द्वारें होत असे. चोरीचें भय फार कमी असे. लोक साधे व सुखी होते. लोकांचा परस्परांवर विश्वास असे. मद्यपानासारख्या व्यसनांचें प्रमाणहि अल्प असे. त्यामुळे न्यायालयांत कज्जे घेऊन जाण्याचा प्रसंग क्वचितच कोणाला येई. संस्कृत भाषेला विशेष मान असून पाली व मागधी इत्यादि भाषांचा उदय होत होता. शिक्षणामध्ये धार्मिक वाङ्मयाचा अभ्यास प्रामुख्याने होत असे. अर्थशास्त्रावरील आर्यचाणक्याचा सुप्रसिद्ध ग्रंथ चंद्रगुप्ताचे कारकिर्दींतच झालेला असून, त्याचे अनुरोधाने त्या वेळची बहुतेक राज्यव्यवस्था चालत असे.

अशा प्रकारें ऐतिहासिक कालांतील पहिल्या भारतीय साम्राज्याची स्थापना करणारा सम्राट् चंद्रगुप्त हा पंचवीस वर्षें उत्तम रीतीने राज्य करून, खिस्तपूर्व २९८ ह्या वर्षीं स्वर्गवासी झाला. त्याचे पश्चात् त्याचा पुत्र 'बिंदुसार' ह्याने राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं.



अशोकाचें साम्राज्य
सीमा
गांधारदेश
तक्षशिला
श्रीनगर
ऐरावती
शतद्रु
सिंधु नदी
प्राचीन हाकडा नदी
इंद्रप्रस्थ
यमुना
गंगा नदी
श्रावस्ती
कपिलवस्तु
कोसलदेश
कुशीनगर
ललितपट्टण
वैशाली
पाटलीपुत्र
काशी
प्रयाग
(सारनाथ)
राजगृह
नालंद
बोधिगया
उज्जनी
सांची
नर्मदा
भोजदेश
सुराष्ट्र
गिरनार
ताम्रलिप्ती
महानदी
नाशिक
पैठण
सोपारा
गोदावरी
राष्ट्रिक देश
कृष्णा
आंध्र
चोल
पांड्य
ताम्रपर्णी
हिंदी
महासागर

## हिन्दुस्थानचे हिन्दु सम्राट्.

ग्रंथ संग्रहालय ... प्रा. क्र.

# (२) सम्राट् अशोक

( खिस्तपूर्व २७२ पासून खिस्तपूर्व. २३२ )

मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणे सम्राट् 'बिंदुसार,' पाटलिपुत्र येथील सिंहासनावर विराजमान झाल्यावर त्याने पंचवीस वर्षे साम्राज्याचा कारभार पाहिला. त्याच्या राजत्वकालामध्ये ( कारकिर्दीत ) दक्षिणेकडे त्याच्या साम्राज्याचा विस्तार बराच झाला. राजपुत्र अशोक हा त्या वेळीं अर्वाचीन मोंगल शहाजाद्यांप्रमाणे पंजाबप्रांतावर प्रांताधिकारी नेमलेला होता. एकदा सीमाप्रांतांतील डोंगरी लोकांनी 'बिंदुसार' ह्याचे विरुद्ध बंडाचा प्रयत्न केला होता; त्या प्रसंगीं अशोकाजवळ भरपूर सैन्याबळ असतां ही त्याचें प्रदर्शन न करितां सामोपचाराने त्याने शांतता प्रस्थापित केली. त्यामुळे त्याजवर पित्याची विशेष कृपादृष्टि झाली. अशोकाच्या अंगचे असे सद्गुण पाहून बिंदुसाराने तो वडील पुत्र नसतांही त्यालाच युवराज-पद दिलें. पुढे बापाचे पश्चात् अशोकाला रीतसर मगधाचें साम्राज्य-सिंहासन प्राप्त झालें. हातीं आलेल्या राज्यवैभवाला स्थैर्य आणण्यासाठीं राजवंशांतील इतर वारसदारांचा अशोकाने घातपात न करतां त्यांना मोठें वेतन देऊन ठिकठिकाणीं सरकारी प्रांताधिकारी किंवा धर्मप्रचारक म्हणून त्यांची योजना केली. क्रमांक ५ च्या त्याच्या शिलालेखावरून ही गोष्ट स्पष्ट होत आहे; त्यावरून त्याची सत्प्रवृत्ति दिसून येते.

खिस्तपूर्व २६१ ह्या वर्षीं सम्राट् अशोक ह्याने कलिंग ( ओढ्या-उत्तर सरकार ) राज्यावर महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन प्रचंड सैन्यानिशीं स्वारी केली. तेथील राजाजवळदेखील साठ हजार पायदळ, एक हजार घोडे-

स्वार आणि सातशे हत्ती एवढें सैन्य सज्ज होतें. अर्थातच दोघांचा घनघोर संग्राम झाला. शेवटीं अशोकाचा विजय झाला! परन्तु त्या युद्धामध्ये जी भयंकर प्राणहानि झाली, ती पाहून कोमल स्वभावाच्या अशोकाचें हृदय द्रवलें आणि युद्धकर्माविषयी त्याला उद्वेग वाटूं लागला! कोठे सम्राट् अशोक आणि कोठे जित लोकांच्या कत्तली करून त्यांच्या मुंडक्यांचे मनोरे बांधणारा पाषाणहृदयी जगज्जेता तैमूरलंग!

क्रमांक १३ च्या शिलालेखांत आपल्या वंशजांना त्याने केलेल्या आज्ञेवरून त्या वेळच्या त्याच्या मनःस्थितीची कल्पना होते–

"एताये चा अथोय इयं धंमलिपिलिखिता किति पुता पापोता मे अ... सवं विजयमविजयंत वियमविजयंत विय–मनिषु षयकापिनो विजयषिखंति चालहु दंडताचालोचेतु तमेव चाविजयं मनतु ये धंमविजये।"

(संस्कृत भाषांतर)–'एतस्मै चार्थायेयं धर्मलिपिर्लिखिता किमिति पुत्राः प्रपौत्राः मे (शृणुयुः) सर्वविजयं मा विजेतव्यं मन्येरन् शराकर्षिणो विजये शांतिं च लघुदण्डतां च रोचयन्तां तमेव विजयं मन्यन्तां यो धर्मविजयः।

अर्थात् ह्यासाठी हा धर्मलेख लिहिला गेला आहे की, विशेषतः माझ्या वंशजांनीं ही हकीकत ऐकावी आणि युद्धविजय वाईट समजून सोडून द्यावा. जेव्हा बाण सोडणें जरूर होईल, तेव्हा शक्य तितकी सौम्यता बाळगावी आणि धर्मविजय हाच खरा समजावा.

अशा रीतीने युद्धांतील हत्याकांडामुळे द्रवलेलें अशोकाचें अन्तःकरण साहजिकच × पुढे अहिंसावादी बौद्धधर्माकडे वळलें. मि० व्हिन्सेंट स्मिथ

× राज्यप्राप्तीनंतर तीन वर्षांनी हें मतांतर झालें; असेंही कोणी म्हणतात.

ह्या इतिहासतज्ज्ञाच्या मतें अशोक शैव हिंदू होता व नंतर त्या वेळच्या चाललेल्या ओघाप्रमाणे तो बौद्ध झाला.* मात्र त्याचें मतांतर हिन्दू प्रजेला अनिष्ट किंवा दुःखदायक झालें नाही. सम्राट् चंद्रगुप्ताप्रमाणे त्यानेही प्रजेला समतेने वागविलें; इतकेंच नव्हे तर त्याच्या धार्मिक प्रवृत्तीचा एकन्दर राज्यकारभारावरही अत्यंत इष्ट परिणाम झाला.

सम्राट् अशोक हा राजा ह्या नात्याने प्रजेची ऐहिक व पारमार्थिक अर्थात् नैतिक उन्नति करणें आपलें कर्तव्य मानीत असे. आपल्या अधिकाऱ्यांनी फिरतीवर गेल्यावेळीं ठिकठिकाणीं सभा भरवून लोकांना धर्म-नीति-सदाचार ह्यांचें शिक्षण द्यावें, अशा प्रकारचे हुकूम त्याने दिले होते. तशा रीतीच्या प्रयत्नामुळे समाजांतील 'गुन्हे करण्याची प्रवृत्ति' कमी होऊं लागली व सर्व प्रजा गुण्यागोविंदाने नांदूं लागली ! फ्रान्स देशांतील विख्यात् पुरुष नेपोलियन बोनापार्ट म्हणत असे की, वास्तविक 'राज्यकारभार' म्हणजे दुसरें कांही नसून, 'सर्वांच्या हितांत व्यक्तीचें हित आहे, ह्या गोष्टींचें लोकांना शिक्षण देणें' म्हणजे 'राज्यकारभार' होय ! हें तत्त्व येथे उत्कृष्ट रीतीने सिद्ध होत आहे.

राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठी त्याने पंजाब, माळवा, कलिंग व कर्नाटक असे साम्राज्याचे विभाग केले होते. त्यामध्ये अनुक्रमें तक्षशिला, उज्जनी, तोसाली व सुवर्णनगरी ( म्हैसूर ) अशीं मुख्य नगरें असून, तेथे प्रान्ताधिकारी रहात. त्यांचे हातीं कारभाराचे शिस्तीसाठी पुष्कळ सत्ता दिलेली होती; तरीही धार्मिक चालिरीतींमध्ये धर्माधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय त्यांना कांही ढवळाढवळ करतां येत नसे. तसेंच ग्रामपंचायत किंवा जातीचे पंच ह्यांच्या निर्णयांतही ते हात घालीत नसत. स्वतः सम्राट् अशोकही दौरा काढून सर्वत्र नजर ठेवीत असे. त्यालादेखील महत्त्वाच्या कामीं सल्ला देणारी एक मंत्रिमंडळाची संस्था होतीच. अशा प्रकारें सर्व काम

*

चालत असल्यामुळे 'चंद्रगुप्त व अशोक' ह्यांचीं साम्राज्यें 'राजा करील ती पूर्व दिशा' अशा स्वरूपाचीं नव्हतीं, असें कोणालाही कबूल करणें भाग पडेल.

क्रमांक ७ च्या स्तंभलेखामध्ये पुढील वर्णन आहे–

'रस्त्याच्या काठाने छायेसाठीं वडाचीं व आंब्यांचीं झाडें लावलीं आहेत. एक मैलाचे अन्तराने विहिरी खोदविल्या असून, प्रवाशांचे सोईसाठी अनेक धर्मशाळा व अन्नसत्रें ह्यांची व्यवस्था केली आहे. गरीब लोकांसाठी व त्याचप्रमाणे जनावरांसाठी दवाखाने घातलेले होते. तक्षशिला व नालंदा येथील विश्वविद्यालयांच्या प्रगतीसाठी त्याने फार परिश्रम केले. व्यापार–वृद्धीकडे लक्ष्य देऊन ग्रीस व इजिप्त ह्यांचेशीं दळणवळण ठेविलें. ह्यावरून त्याचें प्रजावात्सल्य दिसून येतें.

'राज्यवैभवाच्या निदर्शक अशा सुंदर व भव्य इमारती बांधण्याकडे त्याचें फार लक्ष्य होतें. त्याच्या राजवाड्याचें वर्णन पांचव्या शतकामध्ये इकडे आलेला चिनी प्रवासी 'फाहियान' ह्याचे शब्दांत देत आहें–

'अशोकाचा राजवाडा पाहून मी थक्क झालों ! इतकें सुंदर बांधकाम करण्यासाठी त्याने 'यक्षा' सारख्या दैवी कारागिरांचीच योजना केली होती कीं काय कोण जाणें !'

गिरनारसारख्या पर्वतांवरील प्रचंड खडकांच्या पृष्ठभागीं आपल्या आज्ञा कोरून ठेवणाऱ्या धर्मनिष्ठ सम्राटाचें कौतुक करावें तेवढें थोडेंच ! तसेंच अनेक भव्य स्तूप, मठ, विहार वगैरे त्याचीं बांधकामें फार सुंदर आहेत. त्यांमध्ये चौदा शिलालेख व सात स्तंभलेख प्रसिद्ध आहेत. अशोकाच्या 'कारुवाक्या' नामक एका राणीचाही शिलालेख सापडला आहे. ह्या बहुतेक लेखांची भाषा 'पाली' असून, त्या भाषेंत स्थानपरत्वें क्वचित्

[stamp]

थोडासा भेद आढळतो. लेखांची लिपि बहुतेक ठिकाणीं ब्राह्मी ( नागरी ) असून कांही लेखांमध्ये खरोष्टी लिपीचा उपयोग केलेला आहे. असे अशोकाचे अनेक लेख आहेत. त्यांवरून त्याचा राज्यविस्तार आणि लोकोपयोगी कामें वगैरे माहिती मिळते. काश्मीरमध्ये श्रीनगर ( पाडरेथन ) आणि नेपाळमध्ये ललितपट्टण ह्यांसारखीं नवीन सुंदर शहरेंही त्याने वसविलीं होतीं.

चंद्रगुप्तापासून ग्रीक लोकांशीं आलेला आंतरराष्ट्रीय सम्बन्ध, बिंदुसार व अशोक यांचे वेळींही चालू होताच. मॅगॅस्थिनीसनंतर 'डाय-मेचस्' नामक ग्रीक वकील मगधाचे राजदरबारीं रहात असे. इजिप्तचा राजा 'टालेमी फिलाडेल्फस्' याजकडून 'डायोनिसिअल' हा वकील हिंदुस्थानांत आला होता. इजिप्त, मासिडोनिया, सीरिया अफगाणिस्थान, ब्रह्मदेश, सिंहलद्वीप वगैरे देशांत त्यांने आपले धर्मप्रचारकही पाठविले होते. त्यांनी तेथे पुष्कळ अनुयायी बनवून धर्मप्रसार केला. 'थेरापूटस्' आणि 'एसेनीज्' सारख्या ग्रीकांच्या विद्वानांवरहि बौद्ध मतांचा प्रभाव पडला होता. अशा प्रकारें त्या प्राचीन काळीं इतर देशांशीं भारतीयांचें चांगलें दळणवळण असे.

राजसत्तेचा 'बडगा' न दाखवितां मतपरिवर्तनाच्या मार्गाने अशोकाने बौद्ध धर्माचा प्रसार करण्याची पराकाष्टा केली. खिस्तपूर्व २४९ सालीं तो 'बौद्ध' धर्माप्रमाणे यात्रेस निघाला. प्रथम बुद्धाचें जन्मस्थान ( लुंबिनी उद्यान ) येथे गेला. तेथे एक स्तंभ स्थापून तो कपिलवस्तु येथे गेला. नंतर श्रावस्ती आणि काशी ( सारनाथ ) क्षेत्रांची यात्रा करून त्याने गयेच्या 'बोधि' वृक्षाचें दर्शन घेतलें. शेवटीं नेपाळ-मधील 'कुशी' क्षेत्रीं जाऊन त्याने यात्रा पूर्ण केली. नंतर खिस्तपूर्व २४० सालीं संन्यास-भिक्षु-वस्त्रें घेतलीं आणि आठ वर्षांनंतर भारताला

कलामभूत असा ' राजर्षि ' अशोक ' ह्याचें ' राजगृह ' येथे निर्वाण झालें !

सम्राट् अशोकाच्या पश्चात् त्याचें साम्राज्य सुमारें पन्नास वर्षें ' मौर्य ' घराण्याकडे चाललेलें होतें. त्याच्या साम्राज्यामध्ये ' चंद्रगुप्त ' पासूनच गांधार ( अफगाणिस्थान ), बलुचिस्थान ह्यांचाहि समावेश होत होता. दक्षिणेकडे पेन्नार नदीपर्यंत त्याची साम्राज्यसत्ता चालत असे ( नकाशांत पहा ). अशा प्रकारें अफाट राज्यविस्तार आणि अतुल वैभव ह्या बाबतींत तत्कालीन सर्व राजांहून अशोक श्रेष्ठ होता ! ह्या बाबतींत अर्वाचीन काळांतील औरंगजेब बादशहा कदाचित् त्याची बरोबरी करूं शकेल; परन्तु प्रजेची सुखशांति आणि सन्तुष्टता तसेंच वैयक्तिक नीतिमत्ता व सौजन्य इत्यादि सद्गुणांच्या दृष्टीने औरंगजेबापेक्षा अशोकाची योग्यता फारच मोठी आहे. म्हणून हिंदू पद्धतीप्रमाणे ' राजर्षि ' अथवा प्राश्चात्य चाली-प्रमाणे ' दि ग्रेट ' हें उपपद सम्राट् अशोकाला अगदी सार्थ होय !

# (३) सम्राट् गौतमीपुत्र शातकर्णी

पाटलिपुत्र येथील मगध साम्राज्यावरील 'मौर्य' राजांची सत्ता कमजोर झाल्यानंतर तेथे 'शुंग' कुलाची सत्ता स्थापन झाली. शुंग घराण्याचा संस्थापक 'पुष्यमित्र' ह्याने सोडलेला 'अश्वमेध' यज्ञाचा घोडा (पार्थियन) ग्रीकांचा राजा 'मिनांडर' ह्याने अडविला. अर्थात् आपल्या साम्राज्य-सत्तेला हें एक युद्धाचें आव्हानच आहे असें समजून पुष्यमित्राने ग्रीकांशीं मोठें युद्ध केलें. त्यांत ग्रीकराजा 'मिनांडर' ह्याचा पूर्ण पराभव झाला. थंड देशांतील गोऱ्या लोकांचा आमच्या हिंदु सम्राटांनी पराभव केल्याचें हें दुसरें उदाहरण होय! चंद्रगुप्त (मौर्य) राजाने सेल्युकस-ला चीत केल्याचें वर्णन मागे आलेंच आहे. पाटलिपुत्र येथे शुंग आणि कण्व वंशांतील राजांनी सुमारें दीडशे वर्षें राज्य केल्यानंतर (खिस्तपूर्व २८) आंध्र देशांतील 'शातकर्णी' राजांनी आपली सत्ता स्थापन केली; परन्तु त्या राजाचें नांव निश्चित समजत नाही. शातकर्णी किंवा शातवाहन वंशांतील तो बारावा किंवा तेरावा पुरुष असावा, असें मि० व्हिन्सेंट स्मिथ ह्यांचें मत आहे. उत्तर हिंदुस्थानांत स्वारी करून तेथे आपलें वर्चस्व स्थापन करणारा 'शातकर्णी' हा पहिलाच 'दक्षिणी' राजवंश होय! ह्याच गोष्टीची अभिमानास्पद पुनरावृत्ति मालखेडच्या राष्ट्रकूटांनी आणि कृष्णाकाठच्या मराठ्यांनी केली. तें वर्णन क्रमाक्रमाने पुढे येईलच.

ह्या 'शातकर्णी' राजवंशाचा सुसंगत व साधार असा इतिहास अद्याप फारसा उपलब्ध झालेला नाही. 'हिंदुस्थान देशाचा इतिहास' असें नांव धारण करणाऱ्या अनेक पुस्तकांतून जेमतेम दहापंधरा ओळींतच थोडीशी

माहिती देऊन आंध्रराजांचें केवळ स्मरण केलेलें आढळतें. इतकेंच नव्हे तर "अनेक हिंदु राजघराण्यांमध्ये आंध्र किंवा शातवाहन नांवाचें एक घराणें होऊन गेलें, ' अशा एका ओळींतच चारशे वर्षें राज्य केलेल्या ह्या घराण्याची बोळवण एका मोठ्या ग्रंथकाराने केली आहे ! हें अज्ञान कीं अनास्था ?

मत्स्य, वायु, ब्रह्मांड वगैरे पुराणांवरून 'आन्ध्र' राजांसंबंधी थोडीशी माहिती मिळते. आंध्रराजांचे कांही शिलालेख व नाणींही सापडलीं असून, त्यांवरून ह्या घराण्याचा बराच साधार आणि क्रमबद्ध इतिहास लौकरच प्रकाशांत येईल, असें वाटतें. बंगालच्या उपसागराला लागून कृष्णा व गोदावरी ह्या नद्यांमध्ये 'आंध्र' किंवा 'तैलंगण' देश आहे. त्यामध्ये 'धनकटक' येथे 'शातवाहन' राजांची राजधानी होती. मि० स्मिथ ह्यांचे मताने 'श्रीककुलम्' हीच शातवाहन किंवा शातकर्णी राजांची राजधानी होती. कांही काळाने ह्या राजांचें राज्य पश्चिमेकडे महाराष्ट्रांत प्रसार पावल्यानंतर गोदावरीच्या काठीं 'प्रतिष्ठानपूर' ऊर्फ पैठण ही राजधानी झाली. मोंगलांच्या दिल्ली–आग्रा किंवा इंग्रजांच्या कलकत्ता–दिल्ली ह्या राजधान्यांप्रमाणे हा फेरबदल झाला असावा. आंध्र देशांतील ह्या 'शातकर्णी' घराण्यांत एकंदर तीस राजे होऊन गेले आणि त्यांनी सुमारें चारशे वर्षें राज्य केलें. त्यांमध्ये सिमुक, कृष्ण ( कन्ह ), हाल, गौतमीपुत्र शातकर्णी, पुलुमायी व गौतमीपुत्र यज्ञ शातकर्णी, इत्यादि राजे प्रसिद्ध होत.

सम्राट् गौतमीपुत्र शातकर्णी हा फार पराक्रमी राजा होऊन गेला. अशोकानंतर झालेल्या राजांमध्ये ह्याचा दर्जा फारच मोठा मानला जातो. ह्याच्या वेळचे कांही शिलालेख नाशिक व कार्लें येथे सापडले असून, ते त्याच्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षीं लिहिलेले आहेत. नाशिकच्या लेखांत एका दानाचें वर्णन असें आहे की, "क्षत्रपवंशी नहपानाच्या जावयाच्या अधिकारामध्ये असलेली जी जमीन त्याने पूर्वी भिक्षूंना दिली होती, ती

आता शातकर्णीच्या ताब्यांत आली असून, त्या भिक्षूकडेच ती पूर्ववत् दान म्हणून चालू राहील." ह्या लेखावरून सम्राट् गौतमीपुत्र याने मिळविलेला विजय आणि स्वतः हिंदु असूनही, बौद्धांशीं वागण्याची उदारता व दानशीलता इत्यादि गोष्टी कळून येतात. ह्याच लेखाखाली राजमाता 'गौतमी बालश्री' हिचाही एक लेख ( दानपत्र ) आहे. त्यामध्ये ती म्हणते–

"गौतमीपुत्र शातकर्णी ह्याचे राज्यांत राजपुताना, गुजराथ, उत्तर कोकण वगैरे प्रदेश गणले जात आहेत. ह्या राजाने राजपुतान्यांतील क्षत्रियांना नमविलें आणि शक, पल्हव ( पर्शियन ) इत्यादिकांचा नाश केला. क्षहरात वंशांतील राजा नहपान ह्याजवर विजय मिळवून शातवाहन वंशाला मोठी कीर्ति प्राप्त करून दिली......"

हा लेख त्याच्या कारकिर्दीच्या चोविसाव्या वर्षीं लिहिला गेला असून, त्यामुळे त्याचा पराक्रम व राज्यविस्तार ह्यांची कल्पना येऊं शकते.

शकांवरील त्याचा विजय विशेष महत्त्वाचा असल्यामुळे त्याचें द्योतक म्हणून शकराजा 'नहपान' ह्याचे नाण्यांवर आपले नवीन शिक्के मारून 'गौतमीपुत्र शातकर्णी' ने तीं नाणीं चालू केलीं. त्यांचेवर 'धनुष्य-बाण' मुद्रित केला असून खरोष्टी लिपींतील पूर्वींचीं कांही अक्षरें आहेत. तसेंच ब्राह्मी लिपीमध्ये 'रायो गोतमी पुतस सिरि सातकणिस' असे शब्द दुसऱ्या बाजूला आढळतात. हीं बहुतेक नाणीं चांदीचीं असून, नाशीकजवळ मिळालीं आहेत. ह्यांखेरीज शकांवरील विजयापूर्वींचींही त्याचीं नाणीं सापडली असून तीं गजचिन्हांकित आहेत.

नहपानच्या नाण्यांमध्ये त्याने वरीलप्रमाणे स्वतःच्या विजयाचा निदर्शक बदल केला असला, तरी त्याचीं दानें-देणग्या वगैरे बौद्ध भिक्षूंकडे पूर्ववत् चालविलीं होतीं, हें वरील शिलालेखांवरून उघडच दिसत आहे.

महाराष्ट्रांतील कालगणनेचा प्रसिद्ध 'शालिवाहन शक' हा त्याच्या

शकांवरील विजयाचेंच स्मारक म्हणतां येईल; परन्तु कांही लोकांच्या मतें त्याचा पुत्र 'पुलुमायी' हाच शककर्ता शालिवाहन होय ! परन्तु 'पुलुमायी' ह्याने शकांवर विजय मिळविल्याविषयी फारसा उल्लेख मिळत नाही. उलट त्याचा सासरा शक राजा 'रुद्रदामा' ह्याने त्याचा पराभव केल्याचा दाखला एके ठिकाणीं मिळाला आहे. ह्या शककर्त्यांचे नांवाबद्दल अद्याप बराच मतभेद आहे.

आंध्र देशच्या ह्या शातकर्णी राजांकडे एक लक्ष पायदळ, दोन हजार घोडेस्वार व एक हजार हत्ती एवढें सैन्य होतें. त्यांनी शक लोकांपासून देशाला होणारा उपद्रव बंद केला आणि या प्रांतांतील आर्यसंस्कृतीचें रक्षण व जोपासना केली. महाराष्ट्रांतील कित्येक सुन्दर लेणीं त्यांच्याच राजवटींत तयार झालीं आहेत. विद्वान् लोकांना शातकर्णी राजांनी चांगला आश्रय दिला. 'हाल' नामक सतराव्या शातकर्णी राजाने 'सप्तशती' नामक ग्रंथ लिहिला. आमचा चरित्रनायक हा तेविसावा पुरुष होय. त्यानंतर सत्ताविसावा पुरुष 'श्रीयज्ञशातकर्णी' हा विशेष कर्तृत्ववान् होऊन गेला. त्याच्या कांही नाण्यांवर जहाजाचे ठसे दिसतात. त्यावरून आंध्रांचा व्यापार व राजकीय वर्चस्वही समुद्रावर व पूर्वेकडील कांही बेटांवर असावें, असें अनुमान आहे. आंध्र प्रांतांतील 'श्रीककुलम्' ह्या शहरांतून 'सुमित्र' नामक धाडशी हिंदु पुरुषाच्या समवेत कांही तेलगु लोक पूर्वेकडील बेटांत गेले होते. त्या 'सुमित्रा' चे नांवावरून एका बेटाला 'सुमात्रा' हें नांव पडलें, असें एका इतिहासलेखकाने म्हटलें आहे. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीचें आंध्र प्रांतांतील हिंदूंचें हें सीमोल्लंघन कौतुकास्पद होय !

सम्राट् 'गौतमीपुत्र शातकर्णी' हा इ० स० १३० सालीं स्वर्गवासी झाला. त्याचे मागून त्याचा पुत्र 'पुलुमायी' (ज्या राजाला इतिहासांत 'वसिष्ठीपुत्र पुलुमायी' म्हणून संबोधिलें जातें, तो) गादीवर बसला.

## हिन्दुस्थानचे हिन्दु सम्राट्.

# (४) सम्राट् समुद्रगुप्त.

(इ० स० ३३५ ते ३८०)

आंध्र देशांतील राजांचें सामर्थ्य कमी झाल्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत काबूल-पेशावर कडील 'कनिष्क' प्रभृति कुशानवंशीय राजांचा कांही काळ बोलबाला झाला. त्यानंतर इसवी सन २७५ सालीं पाटलिपुत्र ह्या प्रसिद्ध केंद्रस्थानीं 'गुप्त' घराण्याची राजसत्ता स्थापन झाली.

ऐतिहासिक काळांतील सर्व हिंदु राजघराण्यांमध्ये ह्या 'गुप्त' घराण्यावर ईश्वराची विशेष कृपा होती, असें म्हणावें लागतें. हिंदुस्थानांतील फार मोठ्या प्रदेशावर सुमारें चारशे वर्षें ह्या वंशाने आपला अधिकार चालविला. ज्याप्रमाणे मोंगल राजघराण्यामध्ये बाबरापासून औरंगजेबापर्यंत एकामागून एक कर्तृत्ववान् पुरुषांची मालिकाच दिसून येते; त्याचप्रमाणे 'श्रीगुप्त' राजापासून पुढे 'स्कंदगुप्त' राजापर्यंत गुप्तवंशांतील बलाढ्य राजांची दीर्घ परंपरा हिंदु जातीला लाभली होती. तसेंच थोर थोर हिंदु व्यक्तींना दुर्मिळ असें जें दीर्घायुरारोग्य तेंही बहुतेक गुप्त राजांना लाभलें होतें. तुलनेसाठी आमचे मराठी राजे, पेशवे आणि त्यांचे सरदार पहा; तीसचाळीस वर्षांच्या वयांतच त्यांच्या कर्तृत्वाचा ग्रंथ संपावयाचा! राजकारणाप्रमाणे धार्मिक क्षेत्रांतही हाच प्रकार दिसून येतो. श्रीमत् शंकराचार्य, ज्ञानेश्वर व तुकाराम वगैरे बरीच मंडळी फारच अल्पायुषी झाल्यामुळे त्यांच्या बुद्धिमत्तेचा आणि विभूतिमत्त्वाचा फारच थोडा लाभ हिंदु समाजाला होऊं शकला! असो. प्राप्त झालेल्या सत्तेचा उपयोग सर्व गुप्त राजांनी 'हिंदु' संस्कृतीची सेवा करण्यांत आणि शक-हूणादि

लोकांच्या आक्रमणापासून देशाचें रक्षण करण्यांत केला; ही मोठ्या अभिमानाची व आनंदाची गोष्ट होय.

गुप्त घराण्यांत अनेक प्रतापी राजे होऊन गेले. त्या सर्वांमध्ये सम्राट् समुद्रगुप्त हा पराक्रम व विद्वत्ता वगैरे अनेक गुणांमुळे विशेष प्रसिद्ध आहे. गुप्त-संवत् सुरू करणारा चंद्रगुप्त * ( पहिला ) हा समुद्रगुप्ताचा पिता असून, चंद्रगुप्त दुसरा ऊर्फ विक्रमादित्य हा समुद्रगुप्ताचा पुत्र होय.

अशा प्रतापी सम्राटांच्या मालिकेंत मध्यंतरीं आलेल्या समुद्रगुप्तामुळे गुप्त घराणें पूर्ण तेजाने तळपूं लागलें, असें म्हणतां येईल. त्याचें तेज आणि कर्तृत्व पाहून तो वडील पुत्र नसून सुद्धा पित्याने त्यालाच 'युवराज' ठरविलें, असें एका शिलालेखावरून ( 'अलाहाबाद' अशोकाच्या स्तंभ-लेखाखालील वर्णन ) समजलें आहे. चंद्रगुप्त पहिला ह्याचे पश्चात् इसवी सन ३३५ सालीं समुद्रगुप्त सिंहासनावर विराजमान झाला.

सम्राट् अशोकाच्या एका स्तंभलेखाचे खाली गुप्तकालीन असा एक लेख मिळाला आहे. त्यामध्ये पुढील आशयाचा मजकूर आहे—

"( सारांश ) ह्या समुद्रगुप्त राजाने अनेक युद्धांत विजय मिळविले. त्याच्या शरिरावर वीराला भूषण अशा पुष्कळ जखमा दिसतात. गादीवर बसल्यानंतर लौकरच तो दिग्विजयास निघाला. प्रथम छोटानागपूर, गंजम व कोलार हीं स्थळें त्याने जिंकलीं. नंतर तो दक्षिणेंतील प्रख्यात 'कांचीवरम्' शहरीं गेला. तेथील पल्लवराजाचा पराभव करून पुढे दिशा बदलून नेल्लोर, देवराष्ट्र ( महाराष्ट्र ), माळवा अशा मार्गाने परत राजधानीला गेला. तीन हजार मैलांची ही प्रचंड स्वारी त्याने धडाडीने दोन वर्षांत संपविली. हा राजा संगीतशास्त्रांत निपुण असून प्रजेविषयी कळकळ बाळगीत असे...... "

---

* सेल्युकसवर विजय मिळवणारा चंद्रगुप्त ( मौर्य ) वेगळा होता.

सम्राट् समुद्रगुप्ताची तडफ व पराक्रम पाहून कांहीं इतिहासकार त्याला 'भारतीय नेपोलियन्' असें नांव देतात. पण समुद्रगुप्ताच्या पराक्रमाबरोबरच त्यांची गाननिपुणता, विद्वत्ता, सदाचरण व उद्दिष्ट कार्यामधील सफलता इत्यादि गोष्टींनी तो नेपोलियनपेक्षा श्रेष्ठ पुरुष मानावा लागेल!

अशोकाप्रमाणे त्याचे दरबारीं मध्य आशियामधील 'आक्सस्' नदीच्या खोऱ्यांतील 'कुशान' राजांचे, तसेंच गांधार (काबूल) येथील व सिंहलद्वीपमधील राजांचे असे देशोदेशींचे वकील येत असत. नेपाळ, बंगाल, माळवा इत्यादि प्रदेशांतील कित्येक राजे त्याचे मांडलिक होते. युद्धामध्ये जिंकलेल्या राजांना त्याने प्रेमाने वागविलें, पूर्वीच्या पदभ्रष्ट राजांना त्यांचीं राज्यें पुन्हा मिळवून दिलीं, त्याच्या मांडलीक संस्थानां-मध्ये कांही संस्थानें प्रजासत्ताकही होतीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. एकंदरींत दिग्विजय करून कीर्ति मिळविणें हेंच त्याचें ध्येय होतें; असें म्हणण्याला हरकत नाही.

सर्व हिंदुस्थानभर साम्राज्यसत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्याने आपल्या प्रभुत्वाचा निदर्शक असा प्राचीन पद्धतीप्रमाणे 'अश्वमेध' नामक मोठा यज्ञ केला. आर्य लोकांचें ह्या यज्ञसंस्थेवर अतिशय प्रेम होतें. भूतदयेच्या नांवाखाली बौद्ध लोकांनी आर्यांची 'यज्ञसंस्था' बहुतेक संपुष्टांत आणली होती. परन्तु मधून मधून वैदिक धर्मांचे अभिमानी राजे व थोर थोर ऋषि हे निरनिराळ्या प्रकारचे यज्ञ करीतच असत. आर्यांच्या सामाजिक जीवनाशीं यज्ञसंस्था कशी निगडित आणि उपयुक्त झाली होती, ह्याविषयी श्री० महादेवशास्त्री दिवेकर एके ठिकाणीं लिहितात—

"(१) यज्ञसंस्थेमुळे गोत्र-प्रवरांचा सम्बन्ध स्थिर होऊं लागला. (२) यज्ञासाठी अनेक विद्वान् एकत्र जमूं लागले व त्यामुळे तत्वज्ञानांत प्रगति

झाली. (३) पुराण, इतिहास, आणि वक्तृत्व इत्यादिकांची वाढ झाली. (४) अनेक प्रकारचे व विविध व्यवसायांतील लोक एकत्र होण्यामुळे व्यवहार-धर्म उत्पन्न झाला. (५) संघ व राष्ट्र-धर्म ह्या कल्पनांचा प्रादुर्भाव झाला. (६) व्यापारवृद्धि झाली. (७) नृत्य-गायनादि कलांना उत्तेजन मिळालें. असो.

समुद्रगुप्ताने केलेल्या यज्ञाच्या वेळीं ज्या सुवर्णमुद्रा दान केल्या होत्या, त्यांपैकी कांही सुवर्णमुद्रा संशोधनामध्ये हातीं आल्या आहेत. त्यांजवर अश्वमेधाचें होमकुंड आणि घोडा अशीं चित्रें दिसतात आणि पलीकडचे बाजूला 'परम भागवत सम्राट् समुद्रगुप्त' असे शब्द आढळतात. त्या-वरून त्याची वैदिक धर्मावरील श्रद्धा व्यक्त होते. तरी देखील बौद्धांचा तिरस्कार न करितां त्यांना तो उदार आश्रय देत असे. मथुरेसारख्या हिंदूंच्या मोठ्या क्षेत्रांतून सुद्धा अनेक बौद्ध मठ असून त्यांमध्ये हजारो बौद्ध भिक्षु रहात असत.

गुप्तवंशांतील सम्राटांचे बरेच शिलालेख व नाणींही सापडलीं आहेत. त्यांवरून त्यांच्या चरित्रांची व समाजस्थितीचीही माहिती मिळते. लेखांची भाषा 'संस्कृत' आणि लिपि 'ब्राह्मी' आहे. कांही नाण्यांमध्ये परदेशी नाण्यांचेंही अनुकरण केलेलें आढळतें. एका गरुडध्वजांकित नाण्यावर ब्राह्मी लिपींत परन्तु चिनी पद्धतीप्रमाणे 'समुद्रगुप्त' हीं अक्षरें वरून खालीं अशीं लिहिलेलीं आढळतात आणि इतर मजकूर सरळ ब्राह्मी लिपींतच आहे.

दुसऱ्या कांही 'वीणांकित' नाण्यांवर सम्राट् समुद्रगुप्त चांगला पोशाख करून एका सुंदर कोचावर बसला असून वीणा हातीं घेऊन संगीतोपासना करीत असल्याचें दर्शविलें आहे. ह्या नाण्यांवरून दिग्विजयाच्या शिला-लेखांतील गाननिपुणतेच्या उल्लेखाला दुजोरा मिळत आहे. तसेंच हरि-शर्मा नामक एक कविसुद्धा 'सम्राट् समुद्रगुप्त' हा काव्यमर्मज्ञ व रसिक

होता, असें म्हणतो. त्यामुळे अशा गुणवान् राजाबद्दल अधिकाधिक आदर उत्पन्न होतो. गुप्त राजांच्या काळाला ' सुवर्णयुग ' असें नांव देतां येईल. त्यांच्या राजवटींत पुराणें, स्मृति, ज्योतिष व नाटकें इत्यादि संस्कृत ग्रन्थ-संपत्तीमध्ये सम्राटांच्या गुणग्राहकत्वामुळे महत्त्वाची भर पडली आहे.

उमरावती येथील संगमरवरी स्तूप, काशी ( सारनाथ ) येथील स्तूप, दिल्लीचा लोहस्तंभ, धातूंचे पुतळे व मूर्ति इत्यादिकांवरून त्या वेळीं चित्रकला, शिल्पकला व ओतकाम ह्या विषयांतही हिंदु कारागिरी चांगल्या स्थितीला पोंचली होती, हें कोणालाही पटूं शकेल. सिलोन, चीन, जावा, रोम वगैरे परदेशांमध्ये हिंदु व्यापारी व नाविक जात येत असत; त्यामुळे व्यापारधंद्यांची भरभराट होऊन चारी दिशांनी हिंदुस्थानांत संपत्तीचा ओघ येत असे. अशा प्रकारें स्वातंत्र्य आणि सुखसमृद्धि ह्यांचें साहचर्य गुप्तांचे राजवटींत हिंदुस्थानाला दीर्घकाल लाभलें होतें.

अशा रीतीने पंचेचाळीस वर्षें राज्य करून हा चक्रवर्ति ' समुद्रगुप्त ' इ० स० ३८० मध्ये दिवंगत झाला. त्याचे पश्चात् त्याचा पुत्र दुसरा चन्द्रगुप्त ( विक्रमादित्य ) साम्राज्य-सिंहासनाधीश झाला.


वास्तविक हें चौथें प्रकरण येथेच पूर्ण झालें आहे. परन्तु समुद्रगुप्ताचा पुत्र दुसरा चंद्रगुप्त हाच शककर्ता ' विक्रमादित्य ' असें कित्येक विद्वानांचें मत असल्यामुळे त्याजबद्दल येथे थोडा उल्लेख केला पाहिजे.

चन्द्रगुप्ताने शक-क्षत्रपांना जिंकून शांतता स्थापन केली; गुजराथ व माळवा हे प्रदेश आपल्या राज्याला जोडले आणि गुजराथेंतील बंदरांच्या व्यापारवृद्धीकडे लक्ष दिलें. विक्रमादित्य हें नांव धारण करून उज्जयिनी येथे आपली राजधानी स्थापिली. ह्यावरून संवत् कर्ता राजा विक्रमादित्य हाच असावा, असें वाटतें. परन्तु ह्या अनुमानावर हा आक्षेप आहे की, ह्या चन्द्रगुप्ताचे पूर्वी इ० स० ६८ च्या सुमारास हाल नामक आंध्र राजा

होऊन गेला. त्याच्या वेळच्या ‘ गाथासप्तशती’ नामक ग्रंथामध्येही ‘कवि-प्रिय आणि दानशूर ’ अशा प्रकारें विक्रमादित्य राजाचा उल्लेख आढळतो. तसेंच स्वत:च्या घराण्यांत चालू असलेला ‘ गुप्तसंवत् ’ बन्द करून मालव लोकांच्या जुन्या संवताला महत्त्व देण्याचें ह्या चन्द्रगुप्ताला कारण काय ? असाही प्रश्न उद्भवतो. तें कसेंही असो, ह्याच्या कारकिर्दीमध्ये शकांची पुंडाई बन्द पडून ते हिंदु समाजांत मिसळून गेले. हें मात्र खरें आहे. ह्या सम्राटाच्या वेळींच चिनी प्रवासी ‘ फाहियान ’ हिंदुस्थानांत आला होता. मेगॅस्थिनीजच्या वर्णनाप्रमाणे त्यानेही हिंदुस्थान देशांतील विद्या व कलादिकांच्या प्रगतीचें सुन्दर वर्णन लिहून ठेवलें आहे. त्याखेरीज हिंदूंच्या देशाटनाचें आणि पूर्वेकडील वसाहतींचेंही अल्पसें दिग्दर्शन त्याचे लिखाणावरून होतें. पुढील प्रकरणांत स्वतन्त्रपणें त्याबद्दल माहिती देणार आहे.

ह्या चन्द्रगुप्तानन्तर सुमारें शंभर वर्षें गुप्तराजांची सत्ता चांगल्या स्थितींत चालू होती.

---



काबूल
गांधार
पुरुषपुर
तक्षशिला
श्रीनगर
ति बे ट
ची न दे श
सिंधु नद
हि मा ल य
इंद्रप्रस्थ
नेपाळ
कान्यकुब्ज
पाटलीपुत्र
कामरूपदेश
प्रयाग
काशी
मंदसोर
नागराज्य
गया
गुजरात
न र्म दा
ब्रह्मदेश
द्वारका
सुराष्ट्र
ताम्रलिप्ती
एरंडपल्ल
पैठण
पुरी
सोपारा
गंजाम
देवराष्ट्र
आंध्रदेश
धनकटक
कृष्णा
नेल्लोर
कांची
पांड्य
अंदमान
स या म
कंबोजदेश
सायगांव
ताम्रपर्णी
निकोबार
हिं दी म हा सा ग र
म ला या
सिंगापूर
इंद्रपूर
बाली


बृहद्भारत

# (५) हिंदूंच्या प्राचीन वसाहती.

हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये जे अनेक वर्णनीय व स्मरणीय विषय आहेत, त्यांपैकीं 'बृहत् भारतामध्ये हिंदूंच्या प्राचीन वसाहती' हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय समजला पाहिजे. सध्या चालू असलेल्या इतिहासांतून ह्यासम्बन्धी फारसें कांही सापडत नाही, हें प्रचलित ऐतिहासिक वाङ्मयाचें एक वैगुण्य होय. तरीपण अलीकडे ह्या गोष्टीकडे संशोधकांचें लक्ष जात आहे, हें सुचिन्ह आहे.

आंध्र प्रांतांतील कांही हिंदु लोक 'सुमात्रा' बेटांत गेल्याविषयी तिसऱ्या प्रकरणांत आलेंच आहे. फाहियान आणि इत्सिंग * नांवाच्या दोघां चिनी प्रवाशांच्या लेखांवरून हिंदु लोकांच्या पूर्वेकडील वसाहतींची कांही माहिती मिळूं शकते. जावा बेटांत ब्राह्मण धर्माचा विशेष प्रचार असल्याबद्दल फाहियान ह्याने लिहिलें आहे. तसेंच इत्सिंग लिहितो—

"इंडियन आर्किपेलागो (हिंदी द्वीपसमूह) आणि त्याचे पूर्वेकडील प्रदेशांत हिंदूंच्या दहा वसाहती होत्या आणि तेथे धार्मिक आचार व चालीरीति हिंदूंच्याच पाळल्या जात असत." सम्राट् अशोकाचे वेळीं बौद्ध भिक्षु ब्रह्मदेश, सयाम वगैरे प्रदेशांत गेलेच होते. पण त्यापूर्वीं देखील म्हणजे गौतम बुद्धाच्या जन्मापूर्वी हिंदु लोक सयामांत गेले होते. सयामचे राजे आपणांस रामचंद्राच्या वंशांतील समजतात व त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळीं भारतीय विद्वान् ब्राह्मणांचा आशीर्वाद लागतो. तिकडील कांही गांवांचीं नांवें अयोध्या किंवा लवपूर आणि राजांचीं नांवेंही

---

* इत्सिंग हा चिनी प्रवासी सहाव्या शतकांत इकडे येऊन गेला.

इंद्रादित्य, धर्मराज अशीं हिंदु पद्धतीचीं आढळतात. सयाममध्ये पुष्कळ तामीळ लोकांनी वसाहत केली असून विद्यमान राजाचें नांव 'आनंद-महिदोल' असें तामील रीतीचें आहे. कलिंग प्रांतांतील हिंदु जावा बेटांत गेले व त्यांनी तेथे वसाहती स्थापिल्या. ह्याचें द्योतक म्हणून ही मंडळी त्या वेळेपासून शतकाचा प्रारंभ धरितात. हा काल म्हणजे खिस्तजन्मापूर्वी ७५ वर्षें होय. ह्या साऱ्या प्रदेशांत वाङ्मयांतून व लोकव्यवहारांतूनही रामकथेचा बराच प्रभाव दिसून येतो.

शातवाहनांच्या अंमलाखाली पूर्वी असलेले पूर्व किनाऱ्यावरील तामीळ (चोल) लोक कापडाचा व्यापार करीत. त्यांचीं जहाजें ब्रह्मदेश व मलाया वगैरे प्रांतांत जात असत. पुढे दहाव्या शतकांत चोल राजे उदयास आले. चोल राजांमध्ये 'राजेंद्र चोल' नांवाचा राजा मोठा पराक्रमी होऊन गेला. त्याने आपलें आरमार पाठवून ब्रह्मी किनाऱ्यावरील आर्किपलागो आणि मलाया हे प्रदेश काबीज केले, पश्चिम किनाऱ्यावरील लखदीव आणि मालदीव हीं बेटें ताब्यांत आणलीं व बंगालच्या उपसागरांतील निकोबार बेटाचाहि कबजा मिळविला. जावा बेटांतील 'शैलेंद्र' घराण्याचा राजा 'संग्रामविजयोत्तुंगवर्म' ह्याचा पराभव करून त्याजपासून राजेंद्र चोलाने सुमात्रा बेट जिंकून घेतलें. सुमात्रा बेटांतील 'श्रीविजय' चें राज्य कांचीच्या पल्लवांचे वेळीं फार प्रसिद्ध होतें. फिलिपाईन्स व फोर्मोसा ह्यांमध्येही हिंदूंच्या वसाहती व लहान लहान राज्यें स्थापन झालीं होतीं.

अकराव्या शतकापासून ह्या प्रदेशांत कांही भागांतील मुसलमानांचें प्रथम राजकीय व नंतर धार्मिक वर्चस्व होत चाललें. हिंदुस्थानांत राहणाऱ्या हिंदूंना स्वदेशांतील तीव्र राजकीय व धार्मिक झगड्यांमुळे ह्या अनेक वसाहतींच्या शाखांकडे लक्ष देतां आलें नाही; त्यामुळे तिकडील हिंदु-सत्तेला उतरती कळा लागली आणि ज्या ठिकाणीं मुसलमानांचा प्रवेश

झाला नव्हता, तेथे स्पेन व अमेरिका वगैरे ख्रिस्ती राष्ट्रांनी आपलें वर्चस्व स्थापिलें. तरी देखील ' वाली ' नामक एका बेटांत एक हिंदु राजा अद्याप राज्य करीत आहे !

ह्या सर्व वसाहतींमधून हिंदु आणि बौद्ध लोक सुखाने रहात असत. पुढे हिंदुधर्मीयांना उतरती कळा लागली. तरीही अद्याप अनेक हिंदु मंदिरें व त्यांचे अवशेष दृष्टीला पडतात. कित्येक लोकांनी मुसलमानी धर्म स्वीकारला आहे, तरीसुद्धा हिंदूंचा आद्य काव्यग्रंथ ' रामायण ' ते पूज्य मानिताव ! तिकडील कांही लोक अद्याप हनुमंताची पूजा करितात. बँकोक येथील एका बुद्ध मंदिराचे दरवाजावर चांदीमध्ये सुन्दर खोदकाम करून रामायणांतील अनेक देखाव्यांचें चित्रण केलें आहे. ह्या प्रदेशांतील सण, उत्सव, नाटकें व नृत्यकला ( वाली ) ह्यांमध्ये कोठेही पहा, हिंदु संस्कृतीचा उत्तम ठसा उमटलेला दिसतो.

निरनिराळ्या द्वीपांतील हिंदुलोकांच्या वसाहतींच्या शेकडो वर्षांच्या इतिहासाविषयी वर दिलेली ही माहिती म्हणजे ' दर्यामें खसखस ' होय ! अशाच अनेक वसाहती आमच्या पूर्वजांनी पश्चिमेकडील कित्येक देशांतून केल्या होत्या, असें भाषा-साम्यावरून व प्राचीन अवशेषांवरून आजचे अनेक हिंदु विद्वान् सिद्ध करीत आहेत.

# हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्.

## (६) सम्राट् हर्षवर्धन.

( इ० स० ६०६-६४७ )

इसवी सनाच्या पांचव्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानवर 'हूण' नामक परकी लोकांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या. हे हूण लोक मध्य आशियांतून बाहेर पडून पश्चिमेस बाल्कन द्वीपकल्पापर्यंत पसरले होते आणि पूर्वेकडे पंजाबपर्यंत टोळधाडीप्रमाणे स्वाऱ्या करून हिंदूंना सतावून सोडीत होते. गुप्तवंशांतील सम्राट् स्कंदगुप्त ह्याने त्यांच्याशीं मोठें युद्ध करून, त्यांना हाकून लावलें. स्कंदगुप्ताच्या त्या वेळच्या पराक्रमाचें वर्णन भिटारी येथील एका लेखामध्ये—

हूणैर्यस्य समागतस्य समरे दोर्भ्यां धरा कंपिता ।

अर्थात् स्कंदगुप्ताने हूणांबरोबर केलेल्या युद्धांतील पराक्रमामुळे पृथ्वी कांपू लागली होती, असें केलेलें आहे. कांही काळाने पुनः त्या लोकांनी गुप्तांच्या साम्राज्यावर चढाई केली. त्या प्रसंगीं गुप्त-सम्राट् 'नरसिंह गुप्त' आणि माळव्याचा प्रतापी राजा 'यशोधर्मा अर्थात् विक्रमादित्य' ह्यांनी आपल्या फौजा एकत्र करून हूणांचा राजा 'मिहिरगुल' ह्याचेशीं इ० स० ५२८ सालीं मंदसोर येथे घनघोर संग्राम केला व हूणांचा पूर्ण पराभव होऊन ते दूर पळून गेले. ह्या पराभवानंतर त्या लोकांनी सुमारें पाऊणशे वर्षांनी पुनः एकदा जोर करून हिंदुस्थानावर स्वारी केली. त्या वेळीं पंजाबचा राजा (स्थानेश्वर येथील) प्रभाकरवर्धन आणि त्याचा पुत्र राज्यवर्धन ह्या पितापुत्रांनी त्यांचेशीं अनेक लढाया केल्या. शेवटीं त्या हूण लोकांचा जोर

कमी होऊन इकडे आलेले लोक नागरिक ह्या नात्याने शांततेने राहूं लागले. त्यांची स्वतःची अशी संस्कृति नव्हतीच. अर्थातच ते इकडील प्रचंड हिंदु-जन समुदायांतच मिळून गेले असावेत.

एवढ्यावरून उघड होत आहे कीं, देशावरील संकट दूर करण्यासाठी संघटित होण्याची अक्कल हिंदू राजांनाहि देवाने दिली आहे. इतर समाजां-इतकाच हिंदु-समाजहि स्वातंत्र्यप्रिय आहे आणि त्याने परकी आक्रमणांचा अनेक वेळा यशस्वी प्रतिकार करण्याचें सामर्थ्यहि प्रगट केलें आहे ! ग्रीक, शक आणि हूण लोकांच्या अनेक आक्रमणांतून हिंदुसमाज आणि संस्कृति टिकून राहिली आहे. एक हिंदी कवि म्हणतो—

> यूनान मिश्र रोमाँ, सब मिट गये जहाँसे ।
> अबतक मगर है बाकी, नामोनिशाँ हमारा ॥

स्थानेश्वरचा राजा 'प्रभाकरवर्धन' हा इ० स० ६०५ च्या सुमारास मरण पावला. त्याची राणी 'यशोमती' हिला 'राज्यवर्धन' व 'हर्षवर्धन' असे दोन पुत्र असून 'राज्यश्री' नामक एक कन्या होती. राणी 'यशोमती' ही नवऱ्याबरोबर सती गेली. पुढे राज्यवर्धन गादीवर बसला. इतक्यांत राज्यश्री हिचा नवरा कनोजचा राजा 'गृहवर्मा' ह्याजवर माळव्याचा राजा 'देवगुप्त' ह्याने स्वारी करून त्याला ठार मारलें आणि राज्यश्रीला कैदेंत ठेवलें. तेव्हा बहिणीला सोडविण्यासाठी राज्यवर्धन ह्याने देवगुप्तावर स्वारी करून त्याचा पराभव केला; परन्तु देवगुप्ताचा मित्र बंगालचा राजा शशांकगुप्त ह्याने कांही कारस्थान करून राज्यवर्धनाला ठार मारिलें. त्यामुळे अवघ्या *सोळाव्या वर्षी हर्षवर्धन ह्याला स्थानेश्वर येथील राज्य-कारभाराचीं सूत्रें हातीं घ्यावीं लागलीं.

---

* प्रो० आपटे यांचे मतें हर्षाचा जन्मकाल विक्रम संवत् ६४७ ज्येष्ठ वद्य द्वादशी (इ० स० ५९०) हा होय. (भारत के प्राचीन राजवंश)

सम्राट् हर्षवर्धन हा इ० स० ६०६ मध्ये 'शिलादित्य' हें नांव धारण करून पंजाबमधील वडिलार्जित राज्याचा राजा झाला. राज्यपद मिळाल्या नंतर बहीण 'राज्यश्री' हिची सुटका करण्याच्या खटपटीस लागणें, हें त्याचें कर्तव्यच होतें. त्याकरिता सैन्याची जमवाजमव करून युद्धाला निघण्यासाठी त्याने प्रस्थान ठेविलें. पश्चिमेकडून परकी हूण लोकांच्या स्वाऱ्या त्याने प्रत्यक्षच पाहिल्या होत्या आणि पूर्वेकडील देशी राजांच्या कारस्थानांत त्याच्या भावाची व मेहुण्याची आहुति पडली होती! त्यामुळे ही अस्वस्थता दूर करण्यासाठी एका प्रबळ साम्राज्यसत्तेची स्थापना करणें त्याला आवश्यक वाटलें; ( कारण सहाव्या शतकाच्या प्रारंभापासून गुप्तवंशाचें साम्राज्य मोडकळीस येऊन पुढील पन्नास वर्षांत नष्ट झालें होतें. ) म्हणून महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन आपलें अधिराज्य स्वीकारण्याविषयी त्याने अनेक राजांना पत्रें पाठविलीं. तो दिग्विजयाला बाहेर पडल्यानन्तर त्याच्या पहिल्याच मुक्कामावर एक अद्भुतरम्य गोष्ट घडली ती अशी—

तेथील एका प्रमुख ग्रामस्थाने ( पाटलाने ) त्याला एक 'अंगठी' भेट दिली; पण ती घालीत असतां राजाचे हातून निसटून चुकून खालीं पडली; हें पाहून कांहीं सैनिक आपल्या भावी यशाविषयी साशंक झाले! परंतु चाणाक्ष हर्षाने त्यांच्या मनांतील चलबिचल ओळखून म्हटलें, "सैनिकानो! पहा, ह्या अंगठीचा जमिनीवर कसा ठसा उठला आहे तो! ह्या ठशाप्रमाणे माझ्या साम्राज्यसत्तेची छाप सर्वत्र पडलेली तुम्ही लौकरच पहाल!" अर्थात् ह्या भाषणाने सैनिकांचा उत्साह द्विगुणित झाला, हें सांगावयास नकोच. ह्याला म्हणावें प्रसंगावधान! अपशकुनाचा शुभ शकुन करून दाखवणारा इंग्लंडविजेता 'वुइल्यम् दि कॉंकरर' ह्याची गोष्ट अशाच प्रकारची आहे.× हिंदभूमीदेखील प्राचीन हर्षराजासारख्या

---

× इंग्लिश किनाऱ्यावर पालथा पडलेला वुइल्यम् चिखलाने भरलेला हात दाखवीत म्हणतो-'हें पहा, इंग्लंड माझे हातीं आलें!'

किंवा अर्वाचीन तानाजी-सूर्याजी मालुसऱ्यांसारख्या अनेक प्रतापी वुइ-ल्यमांना जन्म देऊं शकते.

लौकरच 'भंडी' नामक हर्षवर्धनाचा सरदार देवगुप्त राजाचें पारिपत्य करून आणि माळव्यांतून पुष्कळ द्रव्य घेऊन त्याचे शिबिरामध्ये येऊन पोहोचला. 'राज्यश्री' ही देवगुप्ताच्या कैदेंतून पळून जाऊन विन्ध्याद्रीचे जंगलांत गेली असावी, असा शोधही त्याने राजाला सांगितला. तेव्हा गंगेच्या काठीं आपली सेना ठेवून स्वतः हर्ष राजा राज्यश्री चे शोधार्थ विंध्याद्रीवर गेला. तेथे एका वृद्ध भिक्षूच्या मदतीने त्याने राज्यश्रीचा बरोबर तपास लाविला, त्या वेळीं ती सती जाण्याच्या अगदी तयारींत होती. हर्षाने तिची कशीबशी समजूत घालून तिला त्या कृत्यापासून परावृत्त केलें आणि तिचेसह तो परत आपल्या तंबूत दाखल झाला. नन्तर राज्यश्रीला मूलबाळ नसल्यामुळे 'कनोज' येथील राज्यव्यवस्था कोणी कशी चालवावी, असा प्रश्न उत्पन्न झाला. कनोजच्या मंत्रिपरिषदेने हर्षवर्धनाला-च राज्य करण्याविषयी विनंती केली. शेवटीं सर्वांनुमतें 'बोधिसत्त्व अवलोकितेश्वर' ह्या देवाचा कौल घेऊन पुढील व्यवस्था करण्याचें ठरलें. देवानेही कौल दिला की, राज्यश्रीच्या नांवाने हर्षवर्धनाने कनोजचा राज्य-कारभार पहावा. ह्या वेळेपासून राजा हर्षवर्धन कनोज येथे राहूं लागला. देवाच्या आज्ञेने व लोकांच्या संमतीने त्याने कनोजचें राज्य स्वीकारिलें. बहिणीच्याही अधिकाराची जाणीव त्याने आमरण ठेवली होती, ही विशेष गोष्ट होय.

ह्यानन्तर बंगालचा राजा शशांक ह्याजवर हर्षाने शस्त्र धरिलें. तेव्हा शशांक राजाचा पराभव होऊन बंगालवर हर्षाचें अधिराज्य स्थापन झालें. शशांकापासून होणारा त्रास चुकविण्यासाठी पूर्वेकडील कामरूप (आसाम) व प्राग्ज्योतिषपूर येथील राजांनी हर्षवर्धनाचें अधिराज्य मान्य करून व त्याला मौल्यवान् भेटी देऊन, त्याचेशीं सख्य जोडलें. अशा प्रकारें सम्राट्

हर्ष ह्याने पांचसहा वर्षे उद्योग करून नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशामध्ये आपला अंमल बसविला. त्यानंतर 'समुद्रगुप्त' राजाप्रमाणे दक्षिणेकडे चढाई करण्याचाही त्याने प्रयत्न केला; परंतु त्या वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत हर्षाप्रमाणेच बलाढ्य असा सम्राट् दुसरा पुलकेशी ( चालुक्य ) राज्य करीत होता. त्याचे दरबारीं इराणसारख्या दूर देशाचेही वकील नजराणे घेऊन येत असत.

अशा प्रकारें हे दोन्ही सम्राट् तुल्यबल असल्यामुळे नर्मदा नदी दोघांची सीमा ठरून, दोन साम्राज्यें—उत्तर व दक्षिण अशा नैसर्गिक विभागांप्रमाणे—चालूं लागलीं. आपलें सार्वभौमत्व सिद्ध झाल्यानंतर इतर राजांचीं राज्यें कायम राखण्याची हिंदु सम्राटांची पद्धति हर्षवर्धनानेही चालविली होती, असें त्याच्या चरित्रावरून दिसून येतें. ह्या स्वारीनंतर हर्षाने बराच काळ राज्यव्यवस्था करण्यांत खर्च केला. इ० स० ६३३ मध्ये हर्षाने वलभीचा राजा ध्रुवसेन ह्यावर स्वारी केली. तेव्हा ध्रुवसेनाने त्याचें सार्वभौमत्व पत्करिलें. नंतर सुराष्ट्र, कच्छ वगैरे प्रांतांचे राजेही त्याला शरण गेले. इ० स० ६४३ च्या सुमारास त्याने गंजम (ओरिसा) वर स्वारी केली. हेंच त्याचे कारकिर्दीमधील शेवटचें युद्ध होय. ह्यानंतर अशोकाप्रमाणे त्याने धार्मिक विषयाकडे जास्त लक्ष्य दिलें.

सम्राट् हर्षवर्धन ह्याचे दरबारीं चीनचे वकील येत असत व तो आपले वकीलही तिकडे पाठवीत असे. समुद्रपर्यटन चालू असून जावा—सुमात्रा बेटांशीं इकडील लोकांचें दळणवळण बरेंच असे. चिनी प्रवाशी ह्युएनत्संग हा बौद्ध ग्रंथ पाहण्यासाठी इ० स० ६४० च्या सुमारास हिंदुस्थानांत आला होता. तो कनोज येथे हर्षाकडे आणि दक्षिणेंतील बदामीचा सम्राट् दुसरा पुलकेशी ( चालुक्य ) ह्याजकडे गेला होता. त्याने लिहून ठेविलेल्या हकिकतीवरून त्या काळचा इतिहास समजण्याला फार मदत होत आहे.

ह्युएनत्संग हर्ष राजाबद्दल लिहितो-

"सम्राट् हर्षवर्धन (शिलादित्य) ह्याचेजवळ पांच हजार हत्ती, वीस हजार स्वार व पन्नास हजार पायदळ होतें. त्याच्या जोरावर सुमारें चाळीस वर्षें निर्वेधपणें त्याने साम्राज्याचा कारभार केला.

"राज्याची पाहणी करण्यासाठी तो दौरे काढी आणि त्या वेळीं गवती झोपड्यांत तो रहात असे. त्याचा न्याय चोख असे. प्रजेच्या कल्याणासाठी तो अहर्निश झटत असे. गरिबांना तो दानधर्मही फार करी. त्याची राजधानी कनोज पांच मैल लांब असून, सभोंवार भव्य तटबंदी होती. उंच प्राकार, रम्य बागा आणि वस्तुसंग्रहालयें इत्यादिकांमुळे शहर फारच सुंदर दिसत असे."

सम्राट् हर्षवर्धन हा शैव हिंदु होता. एका ताम्रपटलेखामध्ये त्याला 'परम माहेश्वर' म्हटलें आहे. त्याने दिग्विजयाला निघण्यापूर्वी महेश्वराची पूजा केली होती, असें त्याच्या चरित्राचा लेखक 'बाणभट्ट' म्हणतो; परन्तु बहिणीच्या ( राज्यश्री ) सहवासामुळे हळूहळू त्याच्या मनाचा कल बौद्ध धर्माकडे झाला असावा. त्याने आपल्या प्रजेला धर्माच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें. दर पांच वर्षांनी मोठा समारंभ करून त्यामध्ये विद्वान् लोकांना बोलावून तो धर्मचर्चा करी. अशा एका समारंभांत ह्युएनत्संग ह्याला हर्षाने मोठ्या मानाचें स्थान दिलें होतें. समारंभानंतर उदार बुद्धीने ब्राह्मण, बौद्ध व जैन साधुसंतांना तो देणग्या देत असे. अशा एका प्रसंगीं त्याच्याजवळचें सर्व द्रव्य संपलें आणि स्वतःला पांघरण्याला वस्त्रदेखील उरलें नाही ! शेवटीं बहिणीजवळून एक भगवें वस्त्र त्याने पांघरण्यासाठी मागून घेतलें ! अशा रीतीने निष्कांचन होण्यांत हर्षराजाला मोठा आनंद होत असे. स्वपराक्रमाने राज्यवैभव कमावून 'कर्णा'लाही लाजविणाऱ्या उदार अंतःकरणाने त्याचा व्यय करणारा असा राजा अन्य देशांच्या इतिहासांत क्वचित् सापडेल !

सम्राट् हर्षवर्धन हा चांगला विद्वान् होता. त्याने रचिलेलें 'नागानंद' नाटक सुप्रसिद्ध आहे. त्याखेरीज 'प्रियदर्शिका' व 'रत्नावली' हे दोन्ही ग्रंथ-ही त्यानेच लिहिले असावेत. तो केवळ 'पुस्तकांतला किडा'च नव्हता, तर साहित्याप्रमाणे चित्रकलेंतहि तो चांगला ज्ञाता होता. ह्याविषयीं 'बांसखेडा' येथील एक तत्कालीन लेखामध्ये उल्लेख सापडतो. त्याचे पदरीं बाणभट्ट, पुलिंदभट्ट, दंडी, मयूर आणि मातंग दिवाकर इत्यादि कित्येक पंडित असत. नालंद, कनोज, प्रयाग, गया इत्यादि ठिकाणीं हर्षाच्या राजवटींत फार मोठीं विद्यालयें होतीं. त्या सर्वांत नालंद येथील विद्यालय फार प्रसिद्ध असून, त्याचे खर्चासाठी सम्राट् हर्षवर्धनाने शंभर गावें इनाम दिलीं होतीं. येथील विश्वविद्यालयाची इमारत सहा मजली व फार भव्य होती. तिजमध्ये दहा हजार विद्यार्थ्यांची सोय होती. तेथे दररोज निर-निराळ्या शंभर विषयांवर मोठमोठ्या पंडितांचीं प्रवचनें होत असत.

बौद्ध धर्माच्या अभ्यासाखेरीज सांख्य, योग, न्याय इत्यादि शास्त्रांचें व त्याचप्रमाणे तर्कशास्त्र, चिकित्साविद्या अशा अनेक विषयांचें शिक्षण देण्यासाठी वेगवेगळीं दालनें त्या विद्यालयामध्ये ठेवलीं होतीं. त्या विद्यालयाचा 'शीलभद्र' नामक एक पंडित कुलगुरु असून, स्वतः हर्षवर्धन हा कुलपति अर्थात् तेथील दहा हजार विद्यार्थीमंडळींना अन्नवस्त्र देणारा धनी होता. ह्या शिक्षणपद्धतीची श्रेष्ठता वर्णितांना हिंदी कवि मैथिली-शरण गुप्त म्हणतात—

पढते सहस्रों शिष्य हैं, पर फीस ली जाती नहीं।
यह उच्च शिक्षा तुच्छ धनपर, वेच दी जाती नहीं ॥१॥

आजकाल शिक्षणप्रसार व त्याचा वाढता खर्च, ह्यांसंबंधी अभिनव कल्पनांमध्ये गर्क असणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांनी ह्या प्राचीन इतिहासा-पासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

सम्राट् चंद्रगुप्त (मौर्य) ह्याचेपासून सुमारें हजार वर्षांच्या काळामधील स्त्रीशिक्षण व स्त्रियांचा सामाजिक दर्जा ह्यांविषयी फार थोडी माहिती मिळते. तरीपण तेवढ्यावरूनही त्या काळामध्ये हिंदु स्त्रियांचें शहाणपण 'केवळ चुलीपुरतेंच' रहात नसे, असें म्हणतां येतें. अशोकाची राणी 'कारुवाक्या' तसेंच शातकर्णी राजाची माता 'गोतमी बालश्री' ह्यांच्या नांवाचे लेख मिळाले आहेत. हर्षाची बहीण राज्यश्री ही कैदेंतून धीटपणें पळून गेली. पुढे ती भावाबरोबर धर्मसभेंत बसून सर्व वादविवाद ऐकत बसे. तसेंच राज्यकारभारांतहि ती हर्षवर्धनाला साह्य करीत असे. श्रीमत् शंकराचार्य आणि मंडनमिश्र ह्यांच्या वादामध्ये मंडनमिश्राची पत्नी हिने 'पंच' ह्या नात्याने काम केलें! ही गोष्ट सर्व हिंदु बंधु-भगिनींना अभिमानास्पद वाटेल, यांत शंका नाही.

इ० स० ६४६ ह्या वर्षी सम्राट् हर्षवर्धन ऊर्फ शिलादित्य स्वर्गवासी झाला. त्याचे पश्चात् त्याला पुत्र नसल्यामुळे त्याच्या प्रधानाने कांही दिवस त्याचें राज्य चालविलें होतें, असो. प्राचीन हिंदु सम्राटांमध्ये 'हर्षवर्धन' हा शेवटचा प्रसिद्ध सम्राट् होय. बगदाद येथील विख्यात खलीफा हरून-अल-रशीद किंवा खलीफा 'मामून' ह्यांचेशीं शौर्य, प्रजाप्रेम आणि विद्येची आवड इत्यादि बाबतींत हर्षवर्धनाचें साम्य दिसून येतें.

## हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्.

# (७) वैदिक धर्माचा पुनरुत्कर्ष

हिंदुस्थानच्या इतिहासांत हिंदु सम्राटांचें जेवढें महत्त्व आहे, तेवढेंच ऋषि, आचार्य व साधुसन्त ह्यांचेंही मानलें पाहिजे; कारण त्यांच्या तपस्येची आणि तत्त्वज्ञानाची छाप परंपरेने हिंदुसमाजावर चांगलीच बसली आहे आणि त्यामुळे स्वातंत्र्याचीं अनेक आंदोलनें उत्पन्न होऊन, तीं यशस्वीही झालीं आहेत. !

वैदिक धर्म आणि बौद्धधर्म ह्यांमध्ये सुमारें एक हजार वर्षें मतपरिवर्तनाचा शांत संग्राम चालू होता. कांही काळ बौद्धधर्माचा इतका प्रसार झाला होता की, आता वैदिक धर्म नामशेष होणार, अशी भीति कित्येकांना वाटूं लागली ! अशा बिकट काळाला कलाटणी देऊन वैदिक धर्माचा उद्धार कुमारिलभट्ट आणि शंकराचार्य ह्या दोन विभूतींनी केला आहे. कुमारिल भट्टाने वेद आणि यज्ञसंस्था ह्यांच्याविषयीं लोकांच्या मनांत पूज्य बुद्धि उत्पन्न करण्याचा यत्न केला. इ० स० ७०० च्या सुमारास तो होऊन गेला असावा. तो मोठा विद्वान् असून 'तंत्रवार्तिक' इत्यादि कित्येक ग्रंथ त्याने लिहिले आहेत. त्यांवरून तो उत्तर हिंदुस्थानचा ( आर्यावर्तांतील ) रहिवासी असावा, असें विद्वानांचें मत आहे. बौद्धधर्मामुळे अहिंसा आणि संन्यास ह्या गोष्टी बऱ्याच लोकप्रिय झाल्या होत्या; त्यामुळे कुमारिल भट्टाचे पश्चात् हिंसाप्रधान आणि कर्मकांडयुक्त यज्ञयाग ह्यांचा बहुतेक लोप झाला. तरीही बौद्धधर्माला उतरती कळा लागून, त्याने केलेलें वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन पुढेही अबाधित राहिलें.

शंकराचार्य हे मलबार प्रांतांतील 'कालटी' गावीं इ० स० ७८८ सालीं एक नंबुद्री ब्राह्मणकुळांत जन्मले. त्यांच्या बापाचें नांव शिवगुरु व आईचें नांव आर्याम्बा असें होतें. शिवगुरु विद्वान् असून त्यांना 'कालटी' गाव अग्रहार म्हणजे इनाम होता. शिवगुरु शंकराचार्य लहान असतांनाच मरण पावले. तेव्हा मातुश्री आर्याम्बा हिने पांचव्या वर्षीं 'शंकरा'चें उपनयन केलें. लोकोत्तर बुद्धिवान् असल्यामुळे आठव्या वर्षीं पूर्ण वेदाध्ययन आणि बाराव्या वर्षीं शास्त्राध्ययन करून शंकर मोठा पंडित झाला! अगदी लहान वयांतच ब्रह्मचर्याश्रमांतून त्याने एकदम संन्यास घेतला! गोविंदयति हे त्यांचे आश्रमगुरु होते. ह्यानन्तर शंकराचार्यांनी देशभर संचार करून 'मंडनमिश्र' प्रभृति अनेक पंडितांशीं धार्मिक व तत्त्वज्ञानविषयक वाद-विवाद केले. त्यांच्या 'अद्वैत' मतापुढे पूर्वीचे अनेक वाद पोकळ ठरले. बौद्धांचा 'नास्तिपक्ष' किंवा जैनांचा 'स्याद्वाद' हे सारे 'अहं ब्रह्मास्मि' हा साक्षात्कार झाल्यानन्तर पोरकट वाटणें साहजिकच आहे. म्हणून शृंगेरी मठाच्या शंकराचार्यांच्या बिरुदावलीमध्ये—

गुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्य ... वैदिकमार्गप्रवर्तक-सकलनास्तिकमतोच्छेदपूर्वकसकलधर्मसंस्थापनैकधुरीण

इत्यादि गौरवाचे शब्द गाजत आहेत. स्वधर्मावर कालांतराने आलेली मलीनता दूर करण्यासाठी किंवा परधर्मीयांकडून सामान्य जनांचा होणारा बुद्धिभेद दूर करण्यासाठी स्वधर्माच्या पूज्य धर्मग्रन्थांचें लोकांना यथार्थ ज्ञान करून देणें, हें तत्त्ववेत्त्यांचें आणि खऱ्या सुधारकांचें कर्तव्य असतें. युरोपांत मार्टिन ल्यूथर ह्या पंडिताने 'बायबल' वर श्रद्धा ठेवून त्याचें ज्ञान लोकांना करून दिलें; त्यामुळे लोकांना स्वधर्म आणि कर्तव्य समजून धर्माधिकाऱ्यांच्या अयोग्य प्रकारांना आळा बसला. आमच्या शंकराचार्यांनी त्याच उद्देशाने अनेक ग्रंथ लिहिले. गीता, उपनिषदें आणि वेदांतसूत्रें ह्या पवित्र ग्रंथांवर भाष्य ( स्पष्टीकरण ) लिहिलें. तें विशेष

प्रख्यात असून, त्याला 'शांकरभाष्य' म्हणतात. वेदांविषयी पूज्यभाव वाढवून आणि तत्त्वज्ञानामध्ये 'अद्वैत' अर्थात् चराचर सर्व सृष्टीमध्ये एकच व्यापक तत्त्व आहे, अशा मताचें प्रतिपादन करून त्यांनी बौद्धमताचा पाडाव केला. इतिहासांत त्यांच्या योग्यतेचा बुद्धिमान्, वादविवादकुशल आणि विलक्षण धडाडीचा तत्त्वज्ञानी पुरुष क्वचितच सापडेल !

आपलें कार्य अखंड चालू रहावें, म्हणून चारी दिशांना ( शृंगेरी, बदरी-केदार, द्वारका व जगन्नाथपुरी ) त्यांनी आपले मठ स्थापन केले. ते अद्याप चालू असून, त्यांचे द्वारा धार्मिक व सामाजिक अशा अनेक प्रश्नांचा निर्णय होत असतो. पीठस्थ आचार्य चांगले विद्वान् व योग्य पुरुष नेमले जातात. आद्य शंकराचार्यांप्रमाणे पुढीलही कित्येक आचार्यांनी धर्मग्रंथांवर 'भाष्यें' लिहिलीं आहेत. विजयनगरच्या हिंदु साम्राज्याला शृंगेरीच्या गुरूंचा मोठा आधार होता. त्यांच्या बिरुदावलीमध्ये 'कर्नाटक-सिंहासन-प्रतिष्ठापनाचार्य' असे शब्द आढळतात. त्यावरून वरील विधानाची सत्यता पटेल.

ह्याच सुमारास सिंधप्रांतामध्ये मुसलमानांनी प्रवेश केला होता; पण शंकराचार्यांपुढे बौद्धमताचा प्रश्न हाच फार व्यापक व महत्त्वाचा असल्यामुळे आणि ते स्वतः अल्पायुषी झाल्यामुळे मुसलमानी संकटाकडे त्यांचें लक्ष्य गेलें नसावें. खेरीज इस्लामी आक्रमण हें एका बैठकीवर बसून, पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष करून सामोपचाराने परतणें शक्य नव्हतें. त्या कामीं कणखर रजपुतांच्या प्रखर क्षात्र तेजाचीच जरूर होती ! (तें वर्णन पुढे येतच आहे.) असो. इ० स० ८२० सालीं श्रीमत् शंकराचार्य निजधामास गेले.

हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्.

# (८) चक्रवर्ती बाप्पा रावळ

( जन्म, इ० ७००, संन्यास इ० ७६३ )

मागील प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणे बौद्ध धर्माला ओहोटी लागून आमच्या 'वैदिक' धर्मांची घडी बसूं लागणार, तोंच ह्या देशावर सिंधकडून अरबांच्या राजकीय व धार्मिक आक्रमणाचें नवेंच संकट येऊन ठेपलें! शूर दाहीर राजाने अरबांना जोराचा प्रतिकार केला; परन्तु बौद्धांच्या अहिंसेच्या अनुचित कल्पनेमुळे, स्थानिक हिंदु राजांच्या विस्कळितपणामुळे आणि 'मोका बसय्या' सारख्या नीच माणसाच्या फितुरीमुळे 'दाहीर' राजाचा सर्वनाश झाला! ह्या यशाने फुरफुरलेले अरब मोठ्या आवेशाने पुढे राजस्थानांत घुसले! मात्र हिंदूंच्या सुदैवाने तेथे त्यांची डाळ शिजली नाही. चितोडच्या 'बाप्पा रावळ' नामक हिंदु वीराने त्यांना चांगलाच मार दिला. म्हणून त्याला कोणी 'चार्लस् मार्टेल्' * याची उपमा देतात. उदेपूरच्या तेजस्वी राजघराण्याचा 'बाप्पा रावळ' हा मूळ पुरुष होय.

चक्रवर्ती बाप्पा रावळ ह्याच्याविषयी विश्वसनीय ऐतिहासिक माहिती फार थोडी मिळते. तरी दंतकथांवरून आणि त्याच्या सापडलेल्या सुवर्ण-मुद्रा इत्यादिकां वरून तो महाप्रतापी असून, बऱ्याच मोठ्या राज्याचा

---

* 'चार्लस् मार्टेल्' हा फ्रेंच सरदार होता. त्याने आठव्या शतकांत स्पेनकडून फ्रान्सच्या हद्दीवर होणारे 'मूर-अरब' लोकांचे हल्ले मोठ्या शौर्याने परतवून स्वदेशाचें रक्षण केलें.

-अधिपति होता. एवढी गोष्ट निर्विवाद सिद्ध होत आहे. हिंदी भाषेंत त्याचें चरित्र पंडित रामशंकर त्रिपाठी ह्यांनी बरेंच परिश्रमपूर्वक लिहिलें आहे. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे त्याची पूर्वपीठिका दिली आहे—

चक्रवर्ती बाप्पाराव हा प्रभु रामचन्द्रापासून ऐंशीवा पुरुष होता. श्री रामचंद्राचा पुत्र 'लव' हा लवपूर (लाहोर) येथे राज्य करीत होता. त्याचे वंशांतील 'कनकसेन' नामक एक पुरुष गुजराथमध्ये आला. बऱ्याच कालानंतर त्याच्या 'गुह' नामक एका वंशजाला 'ईदर' येथील राज्य प्राप्त झालें. त्याचेपासून पुढील आठवा पुरुष 'नागादित्य' हा मरण पावला, त्या वेळीं त्याला 'शैल' नामक तीन वर्षांचा पुत्र होता. तेथील राज्यांत बंडाळी माजल्यामुळे पुरोहिताने (राजगुरु) त्याला पळवून 'नागदा' गावीं नेऊन ठेवलें. तेथील लोक त्या अपरिचित मुलाला प्रेमाने बाप्पा * म्हणूं लागले व तेंच नांव पुढे चाललें.

लहानपणीं तो शेजारच्या जंगलांतील भिल्लांच्या मुलांशीं खेळत असे. त्यांच्या सहवासाने तो तिरंदाजी, कुस्ती वगैरे शिकून शिकार करूं लागला. त्या तरुण भिल्लांमध्ये 'वालीय' आणि 'देव' हे दोघे मुख्य असून, बाप्पाचे जिवलग मित्र होते. त्यांच्याच हस्तें बाप्पाला मोठ्या समारंभाने चितोड येथे 'राजतिलक' लागला होता! आणि ती परंपरा अजून मेवाडच्या महाराण्यांच्या राज्यारोहणसमारम्भांत श्रद्धापूर्वक चालविली जात आहे!

नागदा गावानजीकच्या जंगलांतील एका गुहेमध्ये 'हारित' नामक ऋषि तपश्चर्या करीत होते. बाप्पाने बालपणीं त्यांची चांगली सेवा केली. त्यामुळे संतुष्ट होऊन त्या ऋषीने बाप्पाला गुरूपदेश देऊन 'शिवा' ची (एकलिंगजी) उपासना करण्याला सांगितलें. व 'तूं सार्वभौम राजा होशील' असा आशीर्वाद दिला! ह्या गोष्टीला अचलगड येथील शिलालेखावरून पुष्टि मिळते.

---

* एका मराठी लेखकाने त्याचें नांव 'कालभोज' असें दिलें आहे.

साधूच्या आशीर्वादाप्रमाणे नशीब काढण्याची संधि पुढे बाप्पा रावळ शोधूं लागला. भिल्ल मित्रांना बरोबर घेऊन तो चितोडच्या राजदरबारीं गेला. तेथील राजाने बाप्पाची तेजस्वी मुद्रा पाहून त्याला व त्या भिल्लांना सैन्यांत नोकरी दिली व कांहीं दिवस लोटल्यावर बाप्पाचें प्रत्यक्ष कर्तृत्व पाहून त्याला सेनापति नेमलें. लौकरच बाप्पाच्या परीक्षेची वेळ प्राप्त झाली! सिंधच्या अरबांचें सैन्य चितोडनजीक येऊन ठेपलें. स्वतः राजा शूर, पण वृद्ध झालेला. सिंधकडील मजकूर लक्ष्यांत घेऊन मेवाडची दुर्दशा होऊं नये, म्हणून शरण जाण्याचा सल्ला बहुतेक जुन्या सरदारांनी दिला होता; परन्तु बाप्पाने त्या वृद्ध परन्तु मानी राजाचे मनांतील भाव ओळखून आपले प्राण पणास लावून युद्ध करण्याचें निश्चित केलें! वीर रजपुतांनी व शूर भिल्लांनीहि आपल्या तरुण सेनापतीच्या आज्ञेप्रमाणे तयारी केली.

शेवटीं चितोडगडाचे पायथ्याशीं बाप्पाने अरब शत्रूंबरोबर तुमुल युद्ध करून विजय मिळविला आणि सिंधू नदीपर्यंत त्यांचा पाठलाग केला! एवढ्यानेहि बाप्पाचा क्रोध शांत झाला नाही. महंमद कासीम याने सिंधमध्ये ठेवून दिलेल्या 'सेलीम' नांवाच्या सुभेदाराचा पाडाव करून त्याचे जागीं आपल्या तर्फेचा नवीन सुभेदार नेमला आणि त्या 'सेलीम' च्या मुलीशीं लग्न लावून मोठ्या हर्षाने तो चितोडकडे परतला! अरबांवर मिळविलेल्या ह्या मोठ्या विजयामुळे बाप्पाची चोहोंकडे कीर्ति झाली. राजाराणीने त्याचें आनन्दाने स्वागत केलें व त्यानंतर लौकरच भाग्यशाली बाप्पाला मेवाडचें राज्य (इ० स० ७३०) प्राप्त झालें.

मराठी इतिहासकार त्याला 'बाप्पा रावळ' असें म्हणतात. वास्तविक 'रावळ' किंवा 'सामन्त' ह्यांपेक्षा त्याची योग्यता फारच मोठी होती. चक्रवर्ती व सार्वभौम हे तर त्याचे किताब होतेच. खेरीज 'हिंदुसूर्य' हें सन्मानदर्शक पद धारण करून तो मेवाडच्या सिंहासनावर बसला होता!

आणि तें त्याला व त्याच्या अनेक वंशजांना अक्षरशः सार्थ होतें, अशी साक्ष मेवाडचा अत्यंत उज्ज्वल असा शेकडो वर्षांचा इतिहास देत आहे ! सूर्यवंशी प्रभु रामचन्द्राचे ते वंशज असून, त्यांच्या ध्वजावर 'उगवता सूर्य' रेखाटलेला असतो.

राज्यवैभवाप्रमाणे कुटुंबसौख्यही त्याला चांगल्या प्रकारचें लाभलें होतें. त्याचें अंतःपुर अनेक सुंदर स्त्रियांनी युक्त होतें. एका मुसलमान कन्येचें पाणिग्रहण केल्याबद्दल वर लिहिलें आहेच. तिच्या संततीला सूर्यवंशी रजपूत म्हणून मान मिळतो, असें कर्नल टॉड म्हणतो. त्या अर्थी धार्मिक विधीने त्या मुलीला शुद्ध करून घेतली असावी, असा तर्क आहे. बाप्पाला पुष्कळ संतति असून, ती तेजस्वी होती. अनेक पुत्रपौत्रांनी कित्येक राज्यें स्थापन केलीं आहेत.* ते आपणांस 'सिसोदिया' रजपूत असें म्हणवितात. त्या वंशांतील सुमारें एक लक्ष लोक राजस्थानांत सापडतील ! अशा प्रकारें गृहस्थाश्रमांतील सर्व ऐहिक सुख पन्नासाव्या वर्षापर्यंत भोगून आणि क्षात्रधर्माला उचित अशीं सर्व कर्तव्यें पार पाडून वृद्धपणीं त्याने 'वानप्रस्थ' आश्रम घेतला आणि आपला पुत्र 'पहिला खोम्माण' ह्याला गादीवर बसविलें. हिंदुधर्माच्या शिकवणीप्रमाणे 'वर्णाश्रमधर्म' पाळणारा राणा बाप्पा रावळ धन्य होय ! अनेक प्राचीन हिंदु राजांच्या चरित्रांतही अशी घटना दिसून येते.

चक्रवर्ती बाप्पा रावळ जसा परम प्रतापी होता, तसा धर्मनिष्ठ व अध्यात्मज्ञानी होता. सौराष्ट्रावरील स्वारीमधून देवी 'व्यानमाता' हिची मूर्ति आणून चितोडाला स्थापिली व तीच मेवाडच्या

---

* 'दत्तक वारस नामंजूर' म्हणून इंग्रजांनी खालसा केलेल्या अनेक राज्यांची दशा लक्ष्यांत घेतली, म्हणजे बाप्पाच्या संतति-वैपुल्याचें महत्त्व आजच्या लोकांनाही कळून येईल !

राजघराण्याची कुलस्वामिनी मानतात. तसेंच हारित मुनीच्या आज्ञेप्रमाणे शिवोपासना करण्यासाठी त्याने भगवान् एकलिंगजीचें मंदिर बांधिलें. नंतर त्यालाच राज्य अर्पण करून आपण केवळ श्रीएकलिंगजीचा दिवाण म्हणून राज्यकारभार चालविला. पुढील वंशजांनीही त्याच भावनेने राज्य केलें. म्हणून त्यांना 'दीवानजी' अशी संज्ञा मिळाली आहे. असें म्हणतात की, वानप्रस्थ घेतल्यानन्तरही त्याने एकदा मोठी सेना घेऊन काश्मीरपासून कंदाहार-इराणपर्यंत स्वारी करून दिग्विजय केला ! मात्र पुढे स्वतः चितोडला परत न जातां त्याने चतुर्थाश्रम 'संन्यास' घेतला आणि कांही काळपर्यंत यात्रा व भगवत्-चिन्तन करून शेवटीं हिमालयामध्ये चक्रवर्ती बाप्पा रावळ ह्याने आपल्या नश्वर देहाचा त्याग केला !

बाप्पाचें राजघराणें अद्याप मेवाडांत 'उदेपूर' येथें राज्य करीत आहे. इस्लामी आक्रमणामुळे अनेक राष्ट्रें नष्टभ्रष्ट झालीं असतां ह्या घराण्याने त्यांचेशीं पिढ्यानुपिढ्या मोठ्या अटीतटीचा सामना करून वैदिक धर्माची आणि स्वातन्त्र्याची ध्वजा आपल्या स्कंधीं धारण करून ती शक्य तितकी उंच फडकत ठेवली. आपल्या राज्याचा विस्तार केला आणि विद्या, कला आणि वैभव ह्यांनी समृद्ध असें बलशाली हिंदुराष्ट्र सन्मानपूर्वक जगविलें आहे. हिंदुसूर्य महाराणा हम्मीर, महा राणासंग, राष्ट्रपुरुष राणा प्रताप व महाराणा राजसिंह हे बाप्पाचेच वंशज होत ! ह्या सर्वांमध्ये महाराणा कुंभ हा अनेक गुणांनी परिपूर्ण असा होता. त्याने माळवा व गुजराथच्या मुसलमान सुलतानांवर जय मिळवून त्यांपैकी एकाला कित्येक महिने आपल्या कैदेंत ठेविलें. ह्या विजयाच्या स्मरणार्थ 'कीर्तिस्तंभ' ही त्याने बांधला असून, तो रजपूत शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. राणा कुंभ हा साहित्य व संगीत ह्यांतही निपुण असून, रसिकप्रिया व संगीतराज इत्यादि ग्रन्थ त्याने स्वतः लिहिले आहेत. औरंगजेब बादशहाला दम-

*

विणारें राणा राजसिंहाचें शौर्य तर प्रसिद्धच आहे ! त्याचप्रमाणे त्याने बांधलेला 'राजसमुद्र' आणि त्याचे मुलाने बांधिलेला 'जयसमुद्र' इत्यादि उपयुक्त गोष्टींवरून ह्या राजघराण्याची प्रजेविषयी कळकळदेखील व्यक्त होत आहे. सती पद्मिनी व साध्वी मीराबाई अशा अनेक थोर स्त्रियांनी मेवाडच्या यशाला अधिक उज्ज्वलता आणली आहे. तसेंच चूंडाजी व भीमसिंह इत्यादि रजपुत्रांनी प्रसंगीं राज्याचा आपला हक्क सोडून स्वार्थ-त्यागाची पराकाष्ठा करून दाखविली आहे. छत्रपति शिवाजीमहाराज हे-ही ह्याच घराण्याच्या एका शाखेमध्ये जन्मले ! दुसरी एक शाखा नेपाळांत गेली, तिने स्थापलेलें 'स्वतंत्र हिंदुराज्य' आजही कोट्यवधि हिंदुजनांच्या अभिमानाचें आणि स्फूर्तीचें स्थान मानलें जात आहे.

हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्

# (१) सम्राट् तिसरा गोविंदराज ( राष्ट्रकूट )

( इ० स० ७९३ ते ८१४ * )

सम्राट् हर्षवर्धनानंतर कनोज येथे लागोपाठ ' वर्म ' (राज्यश्रींचें घराणें), बंगालचे पाल आणि मारवाड किंवा लाट नामक प्रदेशांतील ' प्रतिहार ' अशा निरनिराळ्या वंशांतील राजांकडे राजसत्ता चालली होती. स्वतःच्या प्रांतांत राज्य करून कनोज येथील सत्ताही आपल्या हातीं ठेवूं पाहणाऱ्या पाल-प्रतिहारांचा आणि मूळच्या ' वर्म ' कुळांतील राजांना जिंकून दक्षिणेंतील ' राष्ट्रकूट ' सम्राटांनी सर्वत्र आपलें अधिराज्य स्थापन केलें. उत्तर हिंदच्या दिग्विजयाचे बाबतींत राष्ट्रकूटांनी आंध्र राजांची जणू पुनरावृत्तीच केली !

राष्ट्रकूट हे प्रथमतः मुलकी प्रांताधिकारी व नंतर (दक्षिण गुजराथेंतील चालुक्य साम्राज्याचे ) मांडलिक ह्या नात्याने वऱ्हाड प्रांतांत होते. नंतर इ०स० ७५० च्या सुमारास चालुक्य राजे दुर्बल झाले असतां ते स्वतंत्र राजे झाले. आणखी कांही काळाने ते महाराष्ट्रांत आले व त्यांनी चालुक्यांचें राज्य जिंकलें.

* प्रस्तुत पुस्तकांतील बहुतेक सम्राटांच्या कारकिर्दी त्यांच्या राज्यारोहणापासून मृत्यु होईपर्यंत दिल्या आहेत, हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.

राष्ट्रकूट राजवंशांतील तेरावा पुरुष ‘ध्रुवराज’ ह्याने आपला तिसरा मुलगा ‘गोविंदराज’ हा सर्व मुलांमध्ये योग्य समजून, त्याला आपल्या ह्यातींतच युवराजपद दिलें; त्यामुळे बापाचे पश्चात् तो गादीवर बसला. तरीदेखील त्याचा थोरला भाऊ ‘स्तंभरणावलोक’ ह्याला आपला हक्क बुडाल्यामुळे दुःख वाटत होतेंच. थोड्या दिवसांनी त्याने इतर राजांचें साह्य घेऊन गादी मिळविण्याचा यत्न केला.गोविंदराजानेही पूर्ण सिद्धता करून, त्याचेबरोबर युद्ध केलें. तेव्हा ‘स्तंभराज’ त्याचे हातीं सापडला; परन्तु त्याला उदार मनाने क्षमा करून म्हैसूरजवळ ‘गंगवाडी’ येथे आपला सुभेदार नेमिलें. तेव्हापासून दोघे भाऊ प्रेमाने वागूं लागले. कोठे गोविंदराज आणि कोठे बंधुघातकी औरंगजेब!

ह्यानंतर भावांच्या यादवीचा फायदा घेऊन स्वार्थ साधूं पाहणाऱ्या राजांचा बंदोबस्त करण्यासाठीं गोविंदराज बाहेर पडला.

प्रथमतः बापाने कैदेंत ठेवलेल्या गंगवाडीच्या ज्या ‘शिवमार’ राजाला दया दाखवून स्वतः गोविंदराजाने मुक्त केलें होतें आणि जो पुनः विरुद्ध जाऊन स्तंभराजाला साह्य करीत होता, त्याला पुनः कैद केलें. नंतर कांचीच्या पल्लवांचा दोन वेळा पराभव केला. तसेंच वेंगीच्या ‘विक्रमादित्य’ चालुक्यांचा मोड करून त्यांच्या राजाला पकडून आणून आपल्या घोड्यांचे तबेले झाडण्याला लाविलें! अशा कडक उपायांनी आपल्या मांडलिकांवर आणि शत्रूंवर दहशत बसविली. पुढे त्या चालुक्य विजयादित्य राजाकडून कांही खंडणी घेऊन त्याला सोडून दिलें.

दक्षिण हिंदुस्थानांतील आपली साम्राज्यसत्ता अशा प्रकारें दृढ केल्यानंतर तो बापाप्रमाणे उत्तर-दिग्विजयासाठी निघाला. त्या वेळीं कनोज येथे ‘चक्रायुध,’ बंगालमध्ये ‘धर्मपाल’ आणि राजस्थानांत ‘नागभट्ट’ असे तीन राजे उत्तरहिंदुस्थानांत प्रमुख गणले जात. चक्रायुध दुर्बल असल्या-

मुळे हळूहळू त्याची सत्ता 'नागभट्ट' ह्याने संपुष्टांत आणली होती; म्हणून सम्राट् गोविंदराजाने प्रथम नागभट्टाचाच पराभव केला. हें समजतांच चक्रायुधानेही गोविंदराजाचें आधिराज्य मान्य केलें. पुढे त्याने बंगालकडे चाल केली. तेव्हा तेथील राजा 'धर्मपाल' हाही त्याला शरण गेला. राष्ट्रकूट-सैन्याच्या गडबडीने हिमालयांतील गुहा दणाणून गेल्या, असें त्या स्वारीचें वर्णन ताम्रपटांमधून आढळतें. ह्या एवढ्या स्वारींत फक्त 'माळवा प्रांत' राष्ट्रकूट साम्राज्यांत समाविष्ट [ खालसा ] झाला आणि इतर राजांकडून गोविंदराजाने फक्त खंडणी गोळा केली.

राष्ट्रकूटांच्या ह्या उत्कर्षाबद्दल कांचीचे पल्लव, मदुरेचे पांड्य व मलबार-मधील केरळ इत्यादि अनेक लहानमोठ्या राजांना वैषम्य वाटून गोविंद-राज दूर गेला आहे, असें पाहून त्याचें वर्चस्व झुगारून देण्याची खटपट त्यांनी चालविली. ही बातमी समजतांच सम्राट् गोविंदराज हा विजेच्या वेगाने गुजराथेंतून म्हैसूरपर्यंत चालून आला आणि त्या सर्वांचा त्याने खरपूस समाचार घेतला. हें ऐकून सिलोनच्या राजानेही त्याचें मांडलिकत्व मान्य केलें.

इ० स० ८१२ सुमारास राष्ट्रकूटांचा दरारा हिमालयापासून सिलोनपर्यंत आणि भडोचपासून बंगालपर्यंत चांगलाच बसला होता. श्रीकृष्णजन्मानंतर त्याच्या प्रभावाने जसा यदुवंश अजिंक्य झाला, तसा गोविंदराज गादीवर बसल्यानंतर 'राष्ट्रकूट' वंश अजिंक्य झाला, असें एका ताम्रपटांत म्हटलें आहे.

'राष्ट्रकूट' वऱ्हाडमध्ये असतां 'इन्द्रराज' नामक एका राष्ट्रकूट राजाने गुजराथेंतील चालुक्यांना साह्य करून इ० स० ७३५ मध्ये सिंधकडून झालेली अरबांची स्वारी परतविली. त्यानंतर त्यांनी प्रायः अरबांना जोराचा विरोध केला नाही आणि त्यांच्या दराऱ्यामुळे अरबांनीहि व्यापार करण्यापलीकडे राजकीय किंवा धार्मिक आक्रमण करण्याचें पुनः धाडस केलें नाही.

हें राष्ट्रकूट घराणें इ० स० ७५० पासून ९७७ पर्यंत राज्य करीत होतें. ह्या दोनशे वर्षांमध्ये सिंधमधील थोडासा प्रदेश वगळला, तर सर्व हिंदुस्थान

राष्ट्रकूट राजवंशांतील तेरावा पुरुष 'ध्रुवराज' ह्याने आपला तिसरा मुलगा 'गोविंदराज' हा सर्व मुलांमध्ये योग्य समजून, त्याला आपल्या हयातींतच युवराजपद दिलें; त्यामुळे बापाचे पश्चात् तो गादीवर बसला. तरीदेखील त्याचा थोरला भाऊ 'स्तंभरणावलोक' ह्याला आपला हक्क बुडाल्यामुळे दुःख वाटत होतेंच. थोड्या दिवसांनी त्याने इतर राजांचें साह्य घेऊन गादी मिळविण्याचा यत्न केला.गोविंदराजानेही पूर्ण सिद्धता करून, त्याचेबरोबर युद्ध केलें. तेव्हा 'स्तंभराज' त्याचे हातीं सापडला; परन्तु त्याला उदार मनाने क्षमा करून म्हैसूरजवळ 'गंगवाडी' येथे आपला सुभेदार नेमिलें. तेव्हापासून दोघे भाऊ प्रेमाने वागूं लागले. कोठे गोविंद-राज आणि कोठे बंधुघातकी औरंगजेब!

ह्यानंतर भावांच्या यादवीचा फायदा घेऊन स्वार्थ साधूं पाहणाऱ्या राजांचा बंदोबस्त करण्यासाठीं गोविंदराज बाहेर पडला.

प्रथमतः बापाने कैदेंत ठेवलेल्या गंगवाडीच्या ज्या 'शिवमार' राजाला दया दाखवून स्वतः गोविंदराजाने मुक्त केलें होतें आणि जो पुनः विरुद्ध जाऊन स्तंभराजाला साह्य करीत होता, त्याला पुनः कैद केलें. नंतर कांचीच्या पल्लवांचा दोन वेळा पराभव केला. तसेंच वेंगीच्या 'विक्रमादित्य' चालुक्यांचा मोड करून त्यांच्या राजाला पकडून आणून आपल्या घोड्यांचे तबेले झाडण्याला लाविलें! अशा कडक उपायांनी आपल्या मांडलिकांवर आणि शत्रूंवर दहशत बसविली. पुढे त्या चालुक्य विजयादित्य राजाकडून कांही खंडणी घेऊन त्याला सोडून दिलें.

दक्षिण हिंदुस्थानांतील आपली साम्राज्यसत्ता अशा प्रकारें दृढ केल्यानंतर तो बापाप्रमाणे उत्तर-दिग्विजयासाठी निघाला. त्या वेळीं कनोज येथे 'चक्रायुध,' बंगालमध्ये 'धर्मपाल' आणि राजस्थानांत 'नागभट्ट' असे तीन राजे उत्तरहिंदुस्थानांत प्रमुख गणले जात. चक्रायुध दुर्बल असल्या-

मुळे हळूहळू त्याची सत्ता 'नागभट्ट' ह्याने संपुष्टांत आणली होती; म्हणून सम्राट् गोविंदराजाने प्रथम नागभट्टाचाच पराभव केला. हें समजतांच चक्रायुधानेही गोविंदराजाचें आधिराज्य मान्य केलें. पुढे त्याने बंगालकडे चाल केली. तेव्हा तेथील राजा 'धर्मपाल' हाही त्याला शरण गेला. राष्ट्रकूट-सैन्याच्या गडबडीने हिमालयांतील गुहा दणाणून गेल्या, असें त्या स्वारीचें वर्णन ताम्रपटांमधून आढळतें. ह्या एवढ्या स्वारींत फक्त 'माळवा प्रांत' राष्ट्रकूट साम्राज्यांत समाविष्ट [ खालसा ] झाला आणि इतर राजांकडून गोविंदराजाने फक्त खंडणी गोळा केली.

राष्ट्रकूटांच्या ह्या उत्कर्षाबद्दल कांचीचे पल्लव, मदुरेचे पांड्य व मलबार-मधील केरळ इत्यादि अनेक लहानमोठ्या राजांना वैषम्य वाटून गोविंद-राज दूर गेला आहे, असें पाहून त्याचें वर्चस्व झुगारून देण्याची खटपट त्यांनी चालविली. ही बातमी समजतांच सम्राट् गोविंदराज हा विजेच्या वेगाने गुजराथेंतून म्हैसूरपर्यंत चालून आला आणि त्या सर्वांचा त्याने खरपूस समाचार घेतला. हें ऐकून सिलोनच्या राजानेही त्याचें मांडलिकत्व मान्य केलें.

इ० स० ८१२ सुमारास राष्ट्रकूटांचा दरारा हिमालयापासून सिलोनपर्यंत आणि भडोचपासून बंगालपर्यंत चांगलाच बसला होता. श्रीकृष्णजन्मानंतर त्याच्या प्रभावाने जसा यदुवंश आजिंक्य झाला, तसा गोविंदराज गादीवर बसल्यानंतर 'राष्ट्रकूट' वंश आजिंक्य झाला, असें एका ताम्रपटांत म्हटलें आहे.

'राष्ट्रकूट' वऱ्हाडमध्ये असतां 'इन्द्रराज' नामक एका राष्ट्रकूट राजाने गुजराथेंतील चालुक्यांना साह्य करून इ० स० ७३५ मध्ये सिंधकडून झालेली अरबांची स्वारी परतविली. त्यानंतर त्यांनी प्रायः अरबांना जोराचा विरोध केला नाही आणि त्यांच्या दराऱ्यामुळे अरबांनीहि व्यापार करण्यापलीकडे राजकीय किंवा धार्मिक आक्रमण करण्याचें पुनः धाडस केलें नाही.

हें राष्ट्रकूट घराणें इ० स० ७५० पासून ९७७ पर्यंत राज्य करीत होतें. ह्या दोनशे वर्षांमध्ये सिंधमधील थोडासा प्रदेश वगळला, तर सर्व हिंदुस्थान

स्वतंत्र आणि संपन्न होता, असें दिसून येईल. इतकेंच नव्हे तर भारता-बाहेरही हिंदु संस्कृति व हिंदुराज्यें नांदत होतीं ! अफगाणिस्थानांत हिंदु-राजघराणें चाललें होतें. पूर्वेकडील द्वीपांमध्ये आंध्र, तामीळ वगैरे प्रांतां-तील हिंदूंचीं राज्यें दहा-अकराव्या शतकापर्यंत नांदत होतीं. हें वर्णन मागे आलेंच आहे. व्यापार व विद्या ह्यांचीही भरभराट होती. हरून-अल्-रशीदसारखे मुसलमानी खलीफा बगदाद येथे आपल्या दवाखान्यांवर हिंदु वैद्यांना मुख्य अधिकारी नेमीत. चरक आणि सुश्रुत ह्यांच्या आर्यवैद्यक ग्रंथांचीं भाषांतरें अरबी भाषेमध्यें दोघां ब्राह्मणांनी केलीं होतीं. दहाव्या शतकांत हिंदुस्थानांत आलेला ' अल्बिरुणी ' नामक एक मुसलमान प्रवासी म्हणतो- 'मी अनेक भाषांतील आणि अनेक लोकांमधील अंकांची माहिती घेतली; परन्तु कोठेही हजारांच्या पुढे संख्येचें नांव मिळालें नाही. हिंदुलोक अठरा स्थानांपर्यन्त ( परार्धापर्यंत ) संख्या मांडू शकतात." हिंदूंची संख्यालेखन 'दशमान' पद्धति प्रथम अरब लोक शिकले आणि त्यांचेपासून ती युरोपियन लोकांना समजली. अरबी भाषेमध्ये ' अंक ' ह्या अर्थी ' हिंदसा ' शब्द आहे. त्यावरून वरील इति-हासाला पुष्टि मिळते.

हिंदुस्थानांतील मलमल आणि इतर कारागिरीचे पदार्थ ह्यांना बग-दादच्या दरबारांत फार महत्त्व मिळे. युरोपांतही शार्लमेनसारखे मोठमोठे राजे भारतीय कौशल्याचें कौतुक करीत.

राष्ट्रकूट राजे सरकारी खजिन्यांतून तळीं, कालवे आणि मंदिरें बांधण्या-साठी पुष्कळ खर्च करीत. वेरूळ एथील खडक खोदून बनविलेलें शिवा-लय ( कैलास लेणें ) भव्य व सुन्दर असून, जगांतील अत्यन्त प्रसिद्ध अशा शिल्पकृतींपैकी एक असें मानितात ! तें ' कृष्णराज ' राष्ट्रकूटाने बांधिलें. वेरूळच्या लेण्यांनी राष्ट्रकूटांचें नांव अजरामर केलें आहे. सम्राट्

तिसरा गोविंदराज ह्याने श्रीभवन ऊर्फ मालखेड हें सुन्दर नगर वसवून, ती साम्राज्याची राजधानी केली. देवस्थानांसाठी आणि विद्वान् ब्राह्मणांस दक्षिणा देण्यासाठी बरीच रोकड खर्चीं पडत असे. विद्यार्थ्यांना दक्षिणा मोफत मिळे; इतकेंच नव्हे तर सरकारी इनाम जमिनीच्या उत्पन्नांतून व श्रीमंत लोकांच्या देणग्यांतून कित्येक विद्यार्थ्यांस जेवण व कपडेही मिळत.

राष्ट्रकूटांच्या राज्यव्यवस्थेवरून तत्कालीन हिंदूंच्या राजकीय कल्पना आज आपणांस कळून येतील. त्यांच्या राज्यांतील सर्व गावांमधील सज्ञान व संभावित अशा लोकांना आपापल्या गावच्या पाटील-कुलकर्ण्यांच्या कामावर नजर ठेवून सार्वजनिक कामांमध्ये लक्ष्य घालतां येत असे. अशा प्रमुखांना 'महाजन' किंवा 'ग्राममहत्तर' असें म्हणत. जिल्हे आणि प्रांत ह्यांमधील मुख्य शहरांत 'विषयमहत्तर' नांवाच्या लोकसभा असत. त्या लोकांचें म्हणणें सरकारपुढे मांडीत असत. स्वतः 'सम्राट्' हे धर्म-शास्त्राचे नियम, रूढीने चालू असलेले लोकांचे हक्क आणि मंत्रिमंडळाचा सल्ला ह्या सर्वांच्या अनुरोधाने कामकाज करीत असत. त्यांतूनही जर एखादा सम्राट् मनसोक्त वागूं लागला, तर त्याला मांडलिक राजे व प्रजा ह्यांच्या रोषाला बळी पडून (चौथ्या गोविंदराजाप्रमाणे) राज्यभ्रष्ट व्हावें लागे! ह्यावरून राष्ट्रकूट राजे अनियंत्रित अरेराव नव्हते आणि त्यांची हिंदु प्रजादेखील कितीही राजनिष्ठ असली, तरी 'मुकीं बिचारी कुणी हांका' अशा मेषवृत्तीची नव्हती, हें सिद्ध होतें. चंद्रगुप्त मोर्यापासून आता-पर्यंतच्या अनेक राजांच्या चरित्रांवरून हीच गोष्ट कोणाच्याही निदर्शनास येऊं शकेल.

सम्राट् तिसरा गोविंदराज इ० स० ८१४ मध्ये मरण पावला. त्याचे पश्चात् त्याचा पुत्र 'अमोघवर्ष' हा गादीवर बसला. अरब प्रवासी सुलेमान ह्याने त्याची गणना जगांतील चार मोठ्या बादशहांमध्ये केली आहे!

## हिन्दुस्थानचे हिंदु सम्राट्.

# (१०) सम्राट् पृथ्वीराज चौहान

मालखेडच्या राष्ट्रकूटांचें साम्राज्य लय पावल्यानंतर पुढील एकदोन शतकांमध्ये ह्या देशांत अनेक लहान लहान हिंदुराज्यें चालत होतीं. अफगाणिस्थानांत चालू असलेलें हिंदु राज्य नष्ट होऊन, तेथे ह्याच सुमारास एक मुसलमान–तुर्क–घराणें राज्य करूं लागलें. त्या वंशांतील प्रसिद्ध ‘ महमूद’ नामक सुलतानाने हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या केल्या. पंजाबच्या अनंगपालाने अनेक रजपूत राजांच्या सहाय्याने त्याला प्रतिकार केला; परन्तु कांही प्रासंगिक कारणामुळे त्याचा पराभव होऊन पंजाबांत मुसलमानी सत्ता स्थापन झाली. महमुदानंतर त्याचा मुलगा ‘ मसाऊद’ ह्याने सतलज नदी उतरून ‘ हान्सी ’ नामक किल्ला घेतला आणि आग्नेय बाजूला बनारसपर्यंत स्वाऱ्या केल्या. कांहीं काळ लोटल्यावर दिल्लीच्या ‘ तोमार ’ राजांनी मुसलमानांकडून तो हान्सी किल्ला व भोवतालचा मुलुख परत सोडवून घेतला. नंतर सांबर ( अजमीर ) च्या ‘ बिसलदेव चौहान ’ ह्या विख्यात राजानेही मुसलमानांस हटवीत नेऊन ‘ सतलज ’ नदीच्या अलीकडील सर्व प्रदेशावर पुन: हिंदूंची सत्ता स्थापिली. ह्या चौहान घराण्यांत ‘पृथ्वीराज’ हा सर्वांत जास्त प्रसिद्ध आहे. आजकालही चितोडच्या अनेक राजांप्रमाणे ‘ पृथ्वीराजा ’ ची कीर्ति राजस्थानांत विशेष ऐकूं येते व रजपुतांना त्याच्याबद्दल विलक्षण आदर व अभिमान वाटतो.

दिल्लीचें तोमारांचें राज्य बिसलदेव चौहानाने इ० सन ११५२ त

आपल्या अजमीरच्या राज्याला जोडलें होतें. अर्थात् 'पृथ्वीराज ×' हा त्यानंतर बापाचे पश्चात् दिल्ली आणि अजमीर अशा संयुक्त राज्याचा मालक झाला. बिसलदेवापासून 'सम्राट् पदा'च्या मानासाठी कनोज प्रभृति राज्यांमध्यें स्पर्धा असे. पृथ्वीराज गादीवर बसल्यानंतर कनोजचा जयचन्द्र राठोड व गुजराथचा भीमदेव हे त्याजबरोबर वरील-प्रमाणे मानासाठी झगडत होते. त्याशिवाय 'पृथ्वीराज' ह्याचा पिता 'सोमराज' ह्याला भीमदेवाने मारलें असल्यामुळेही भीमदेवावर त्याचा राग असणें साहजिक होतें. लौकरच त्याचा सूड घेण्याची एक संधि पृथ्वीराजाला मिळाली. अबूच्या 'इच्छिनीकुमारी' नामक एका राजकन्येशीं सत्तेच्या जोरावर 'भीमदेव' विवाह करूं इच्छीत होता; पण अबूच्या राजाने तें नाकबूल करून भीमदेवाविरुद्ध पृथ्वीराजाची मदत मागितली. पृथ्वीराजाने त्याच्या विनंतीचा आनंदाने स्वीकार करून भीमदेवावर स्वारी केली. तेव्हा पृथ्वीराजाला प्रथम 'विजयश्री'ने व नंतर 'इच्छिनीकुमारी' ने माळ घातली! (लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास.)

ह्या गोष्टीनंतर बुंदेलखंडांतील महोबाचा राजा परमर्दिदेव ह्याजवर पृथ्वीराजाने स्वारी केली, त्यामध्येही त्याला विजय मिळाला; परन्तु ह्या युद्धांत उभयपक्षीं हजारो वीरांचा संहार झाला. हिंदुस्थान देशावर मुसलमान राजे चढाई करूं पहात असतां, तिकडे रजपूत राजांनी दुर्लक्ष्य करून असल्या भयंकर युद्धांमधून आपल्या राष्ट्रीय सामर्थ्याची जी हानि केली, तिजबद्दल खेद वाटल्यावाचून रहात नाही! रजपूत कन्यांचें स्वयंवर

× पृथ्वीराज चौहानाचा जन्म आनंद संवत् १११५ (११४९ इ० ) मध्ये झाला, असें 'चंद' म्हणतो; पण टॉडच्या मतें ११५८ इ० सन असावा.

आणि राजेलोकांची सम्राटपदासाठी स्पर्धा ह्या गोष्टी एका काळीं उपयुक्त असल्या तरी परकी आक्रमणाच्या वेळीं त्या हानिकारकच ठरतात ! कनोज-च्या संयोगितेचें स्वयंवर होऊन तिच्याशीं पृथ्वीराजाचा विवाह झाला; परन्तु त्यामुळे दिल्ली व कनोज ह्यांमध्ये वैर माजलें आणि तेंच दोन्ही राज्यांच्या व पर्यायाने साऱ्या राष्ट्राच्या पारतंत्र्याला कारण झालें, असें म्हणण्याला हरकत नाही.

अनेक युद्धांत पराक्रम गाजवून पृथ्वीराजाने आपणांस 'सम्राट्' पद प्राप्त करून घेतलें व त्यानंतर कांही काळ त्याने दिल्ली शहरांत मोठ्या ऐष-आरामांत घालविला. पुढे ११९१ इ० मध्ये अफगाणिस्थानच्या महंमद घोरीने हिंदुस्थानवर स्वारी करून पृथ्वीराजाचीं कांही ठाणीं घेतलीं. त्यामुळे पृथ्वीराजही मोठ्या सैन्यानिशीं त्याच्यावर चालून गेला. स्थानेश्वराजवळ तुमुल युद्ध झालें. पृथ्वीराजाने महंमद घोरीला पकडलें, हें समजतांच पठाण लोकांनी पळ काढला आणि सम्राट् पृथ्वीराज ह्याला जय मिळाला. घोरीने शरण जाऊन याचना केल्यामुळे उदार मनाने त्याला पृथ्वीराजाने सुखरूप परत जाऊं दिलें. ह्यावरून अजूनही रजपुतांचें शौर्य मुसलमान लोकांइतकें किंबहुना अधिक होतें, हें सिद्ध होतें.

इ० स० ११९२ मध्ये महंमद घोरी मागील अपयश धुऊन काढण्यासाठी पृथ्वीराजावर पुनः चालून आला. आपलें औदार्य म्हणजे अपात्रीं दान झालें, हें आता पृथ्वीराजाला कळून आलें ! परन्तु युद्ध करण्याशिवाय आता गत्यंतर नव्हतें. ह्या वेळीं पृथ्वीराजाच्या कांही वैयक्तिक चुकांमुळे बऱ्याच रजपुतांची नाराजी झाली होती. तरीदेखील पृथ्वीराजाच्या शौर्य-तेजा-बद्दल त्यांना अत्यंत आदर वाटत असल्यामुळे व रजपूत लोक जात्या युद्धोत्सुक असल्यामुळे त्यांनी त्याला चांगलें सहाय्य केलें. ह्या लढाईंत आपला कोणी ना कोणी पूर्वज गेला होता, असें आमचे रजपूत संस्थानिक मोठ्या अभिमानाने सांगतात ! पृथ्वीराजाने पराक्रमाची शर्थ केली; परन्तु



सम्राट् पृथ्वीराज चव्हाण



राष्ट्रपुरुष मेवाडचा प्रतापसिंह

( पृष्ठ ७७ पहा )

दैवानें ह्या वेळीं त्याला हात दिला नाहीं ! तो घायाळ होऊन शत्रूचे हातीं सापडला व रजपुतांचा पराभव झाला. ह्या युद्धांत पुढें पृथ्वीराजाचा अंत कसा झाला, ह्याविषयीं अद्याप बराच मतभेद आहे. ह्यानंतर दिल्लीला मुसलमानी तक्ताची स्थापना झाली, हें सांगावयास नकोच.

ह्या शेवटच्या युद्धामुळें त्याच्या योग्यतेला कमीपणा येऊं शकत नाहीं. (यश किंवा अपयश हें सर्वस्वी कोणाच्याही स्वाधीन नसतें.) ह्या विधानाच्या सिद्धतेसाठीं पृथ्वीराजाबरोबर दिल्ली येथील पुढच्या मुसलमान राज्यकर्त्यांची देशरक्षणाच्या पात्रतेसंबंधी तुलना करून पाहूं–

१. गुलाम घराण्यांतील अल्तमशापासून वायव्य सीमेवर मोंगल लोकांच्या स्वाऱ्यांना सुरुवात झाली. अल्तमश याच्या नंतरच्या राजांना त्यांनी पुरेसें केलें.

२. महंमद तघलघानें तर त्यांना पुष्कळ द्रव्य देऊन आपल्या राज्याचा बचाव करण्याचा यत्न केला.

३. तैमूरलंगाच्या स्वारीच्या प्रसंगीं दिल्लीचा सुलतान राजधानी मोकळी टाकून गुजराथेंत पळून गेला आणि दिल्लींतील निरपराध प्रजेची कत्तल झाली !

४. इराणच्या नादिरशहानें मोंगल बादशहाला कैद केलें, भयंकर लूट व कत्तल केली. ती थांबविण्यासाठीं एखाद्या गुन्हेगाराप्रमाणें नादिरशहापुढें त्याला हात बांधून दयेची याचना करावी लागली !

ह्या सर्व ऐतिहासिक घटना लक्ष्यांत घेतल्या तर पृथ्वीराजानें व त्याच्या रजपुतांनी महंमद घोरीशीं घेतलेली झुंज अत्यंत अभिमानास्पद होती, असेंच म्हणावें लागेल ! लागोपाठच्या ह्या दोन युद्धांतील जयापजय हे पृथ्वीराजाच्या भाग्यरवीचे मध्यान्ह आणि अस्त होत !

पृथ्वीराजाचे पश्चात् त्याचा मुलगा ‘रेणसी’ ह्याजकडे महंमद घोरीनें

आपला एक मांडलिक ह्या नात्याने फक्त सांबर ( अजमीर ) येथलि राज्य ठेविलें. पुढील इतिहासांत ह्या घराण्याचें विशेष नांव आढळत नाही.

सम्राट् पृथ्वीराज ह्याचा जन्मकाळ, राज्यारोहण व अन्तकाल ह्यांच्या सन–संवतामध्ये अद्याप एकवाक्यता झालेली दिसत नाही. तरीपण सुमारें चाळीस वर्षांच्या वयांतच त्याचें जीवनचरित्र संपलें, असें म्हणतां येतें. आणि तें आयुष्यदेखील अनेक युद्धांमध्ये प्रायः खर्च पडल्यामुळे राज्यांतील सुखशांति किंवा विद्येची प्रगति ह्या गोष्टींकडे त्याचें विशेष लक्ष्य गेल्याचें दिसत नाही. तरी तत्कालीन चारदोन गोष्टींवरून त्याच्या राजवटीमधील वस्तुस्थितीवर थोडासा प्रकाश पडत आहे. अजमीर येथे त्याच्या पूर्वीपासून एक मोठी संस्कृत पाठशाळा चालू असे; परन्तु महंमद घोरीला ती न पाहवल्यामुळे तिची त्याने मशीद बनविली ! ती 'अढाई दिनकी झोपडी' ह्या नांवाने हल्ली ओळखतात !

पृथ्वीराजाचे दरबारीं 'चंद' नामक एक विख्यात कवि होता. त्याने 'पृथ्वीराजरासो' ह्या नांवाचें महाकाव्य हिन्दी भाषेंत रचलें असून, पृथ्वीराज हा त्या काव्याचा नायक होय. हिन्दीमधील आदिकवीचा मान ह्याच कवीला आहे. तोमार राजांनी वसविलेल्या दिल्लीच्या बाहेर पृथ्वीराजाने आणखी तटबंदी करून 'पृथ्वीपूर' नामक शहर वसविलें. त्याचे कांही अवशेष 'नवी दिल्ली' शहराच्या नैर्ऋत्येला आढळतात. ज्या मनोऱ्याला 'कुतुबमीनार' म्हणून ओळखिलें जातें, तो कुतुबुद्दीनाचा नसून चौहानराजांचा आहे. बिसलदेव चौहान ह्याने तो बांधण्याला प्रारंभ केला आणि नंतर तें प्रचंड काम पृथ्वीराजाने पूर्ण केलें. त्याच्या रचनेवरून व आसपासच्या खाणाखुणांवरून तो बिसलदेवाने गिजनीच्या तुर्कघराण्यांतील राजांवर मिळवलेल्या विजयाचें स्मारक असावें, किंवा पृथ्वीराजाने दुसऱ्या कांही उद्देशाने हिन्दु कारागिरीचा नमुना जगापुढे ठेविला असावा आणि कुतुबुद्दिनाने दिल्ली घेतल्यावर त्याला मुसलमानी वळण दिलें असावें, असें कित्येक विद्वान् संशोधकांचें मत आहे.

## हिन्दुस्थानचे हिंदु सम्राट्.

# (११) धार्मिक आंदोलन.

कोणत्याही देशाचा खरा इतिहास म्हणजे केवळ ‘ हाणामारींचा सविस्तर वृत्तान्त ’ नव्हे; कारण त्या देशांतील लोकांच्या सामाजिक जीवनाचें ज्ञान नुसत्या युद्ध–वर्णनावरून व राजकीय घडामोडींवरून पूर्णपणें होत नाही. ही सामान्य गोष्ट आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासाचे बाबतींतही लागू पडेल. श्रीयुत के. ए. वीर राघवाचारियर नामक एक इतिहासकार आपल्या ‘ हिस्टरी ऑफ इंडिया ’ ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हणतात—

“ ......I learned to repeat the names of the मुसलमान kings and the dates of their reigns, but knew nothing of the country under their rule. I learned the causes of the मराठा wars, and the results following them, but I did not understand the prowess of the मराठा race. .........I gained nothing from the study of history ! ”

अर्थात् ‘ इतिहासाच्या अध्ययनापासून माझे पदरांत खरें पाहतां कांहीच पडलें नाही ! ’ हे एका ग्रंथकर्त्याचे विद्यार्थीदशेंतील अनुभवाच्या स्मृतीचे उद्गार आमच्या इतिहासलेखनामधील अपूर्णता दर्शविण्याला पुरेसे आहेत.

सम्राट् पृथ्वीराज चौहान ह्याचे पश्चात् राजकीय क्षेत्रांत हिंदूंच्या

कर्तृत्वाला फारसा वाव उरला नाही. त्यामुळे त्या वेळच्या दोनतीन शतकां-सम्बन्धीचा (राजकीय) इतिहास म्हणजे देशांतील बहुजनसमाजाचा इतिहास नसून आक्रमण करूं पाहणाऱ्या विदेशी मुसलमान विजेत्यांचा इतिहास होय. आता एवढी गोष्ट सिद्ध आहे की, ज्या हिंदु जातीमध्ये चंद्रगुप्त, शंकराचार्य आणि शिवाजी ह्यांच्यासारखे अलौकिक पुरुष उत्पन्न होऊं शकतात, ती हिंदु जाति केव्हाही नष्ट होणें शक्य नाही. मात्र वर सांगितल्याप्रमाणे हिन्दु जातीची ती जीवनगंगा कोणत्या दिशेने दुथडी भरून चालली होती, ह्याविषयी इतिहासामध्ये मिळावी तेवढी माहिती मिळत नाही. त्यासाठी भारतीय भाषांमधील उच्च साहित्याकडेच आपणांस धाव घेतली पाहिजे.

हिन्दु समाज हा स्वभावतः दैवी संपत्तीचा असल्यामुळे आमच्या राजकीय, सामाजिक किंवा साहित्यिक अशा सर्व हालचालींमध्ये धर्माची छाप विशेष दिसून येते. बौद्धधर्माबरोबर शंकराचार्यांनी केलेला शांतसंग्राम, आपण सातव्या प्रकरणांत मागे पाहिला आहेच. त्यानंतर सुमारें पांचशे वर्षांनंतर तितक्याच जोराचें पुनः एक धार्मिक आंदोलन सुरू झालें. त्यामध्ये निरनिराळया विचारांच्या आणि मतांच्या लोकांनी भाग घेतल्यामुळे त्याचीं अनेक स्वरूपें व परिणाम दिसून येतात. पहिला एक पंथ असा निघाला की, घटपटांच्या खटपटीमध्ये अर्थात् गूढ तत्त्वज्ञानामध्ये प्रवेश करणें ज्या सर्वसामान्य लोकांना अवघड वाटूं लागेल, त्यांनी भोळया भक्तिभावाने ईश्वराची उपासना व धर्माचरण करावें.

अशा लोकांसाठी सोप्या प्रांतिक-प्राकृत-भाषांतील ग्रंथांची आवश्यकता साहजिक उत्पन्न झाली. त्यामुळेच परंपरागत मोठमोठे तात्त्विक विषय संस्कृतसारख्या देववाणींतून सांगणारे कर्मठ पंडित आणि स्वतःच्या अन्तःस्फूर्तीचे साधे बोल सोप्या देशभाषांतून सर्वसाधारण लोकांना

मोकळ्या मनाने सांगणारे साधुसंत ह्यांच्यामध्ये धार्मिक व साहित्यविषयक तीव्र झगडा होऊन त्यांत बहुजन-समाजाच्या प्रतिनिधींनीं-साधुसंतांनी-जय मिळविला ! रामानुज, ज्ञानेश्वर, नामदेव, तुलसीदास, तुकाराम वगैरे सर्व मंडळी ह्या पंथापैकीं होत. ह्यामध्ये ब्राह्मणापासून महारापर्यंत इतकेंच नव्हे तर कबीर व शेखमहंमद बाबा ह्यांसारखे कित्येक मुसलमानही होते. ह्याखेरीज दुसराही एक पंथ असें म्हणणारा होता की, 'मुसलमानी आक्रमण केवळ धार्मिक व साहित्यिक चळवळीने थांबणार नाही; त्यासाठी राजकीय स्वातंत्र्याच्या स्थापनेचा कांही तरी प्रयत्न करावा.' रामदास, गुरु गोविंदसिंह, मुक्तेश्वर वगैरे मंडळी या पंथांतील होत. त्यांचेविषयी पुढे विचार करावयाचा असल्यामुळे येथे अधिक लिहीत नाही. ह्या निरनिराळ्या पंथांतील लोकांची ईश्वरभक्ति व समाजहिताविषयी कळकळ सारखीच होती; तरी पण त्यांच्या ग्रंथांवरून त्यांच्या विचारसरणींतील भिन्नता आणि वैशिष्ट्य कळून येतें. असो.

पंजाबांतील शीख व महाराष्ट्रांतील मराठे ह्यांनी ह्या आंदोलनानंतर मिळविलेली राजकीय यशस्विता बाजूस ठेवली, तरीदेखील केवळ धार्मिक व साहित्यिक दृष्ट्या आमच्या हिंदु संतकवींनी मुसलमान साधूंवर आपल्या आर्य तत्त्वज्ञानाची आणि भावनांची चांगलीच छाप बसविली होती, असें दिसून येतें.

शेख महंमद अविंध । त्याचे हृदयीं गोविंद ॥

म्हणणारे शेखमहंमदासारखे थोर मुसलमान महाराष्ट्रधर्मांतील उदात्त व निर्मल भक्तिभावाने-पंढरपूरच्या सुखसोहळ्याने-तल्लीन होऊन पांडुरंगाचे भक्त झाले व इतर हिंदु संतांबरोबर विठ्ठल नामाचा गजर करीत नाचले ! हिन्दूंच्या मूर्तिपूजेचें स्पष्टीकरण त्यांनी पुढीलप्रमाणे उत्कृष्ट प्रकारें केलें आहे—

ओनामा एका खडी आधीं मांडिती धडे ।
मग मोडिती पाढे अभ्यासिती ॥
तैसे तीर्थ प्रतिमा, ओनाम्याचे धडे ।
स्वहिता धडफुडे सेवा संत ॥ १ ॥

अकबराच्या दरबारांतील 'रहीम' नामक मुसलमान कवि आमच्या संस्कृत भाषेंत व पौराणिक उपमा–कल्पनांनी युक्त अशा कवितेमध्ये देवाला प्रश्न करितो--

रत्नाकरोस्ति सदनं गृहिणी च पद्मा ।
किं देयमस्ति भवते जगदीश्वराय ? ॥

( भावार्थ– रत्नाकर-क्षीरसागर- हें ज्याचें निवासस्थान आहे आणि संपत्तीची देवता लक्ष्मी ही ज्याची स्त्री आहे, अशा–विष्णूला–जगदीशाला माझ्यासारख्या क्षुद्र माणसाने काय द्यावें ? अर्थात् अनन्य भक्ति ! दुसरें काय ? )

तसेंच 'ताज बेगम' ह्या नांवाची मुसलमान–स्त्री श्रीकृष्णचरित्रावर पुढीलप्रमाणे हृदयस्पर्शी कवनें करी—

श्यामला सलोना सिरताज सिर कुल्लेदार ।
तेरे नेह दागमें निदाघ व्है दहूंगी मैं ॥
नंद के कुमार कुरबान ताणी सूरत पै ।
ताण नाल प्यारे हिन्दुवानी व्है रहूंगी मैं ॥ १ ॥

( भावार्थ— मुकुटधारी श्यामसुंदर श्रीकृष्णाचें अहर्निश चिन्तन करण्यामध्ये माझें अन्तःकरण रंगून शुद्ध होईल. हे नंदकिशोर श्रीकृष्णा ! तुझ्या सौंदर्यावर माझें सर्वस्व ओवाळून टाकीन आणि 'हिन्दु' भक्त बनून तुझेंच भजनपूजन करीत राहीन. )

महासाधु कबीर हा तर काशींतील रामानंद स्वामींचा शिष्यच होता.

त्याने हिन्दु-मुसलमानांनी वैरभाव विसरून ईश्वराची भक्ति कोणत्याही मार्गाने करावी, मुसलमानच कांही देवाचे लाडके नाहीत, इत्यादि प्रकारचा उपदेश केला. परन्तु हें समतेचें तत्त्वज्ञान जेतेपणाचा अहंकार असलेल्या दिल्लीच्या बादशहांना कसें रुचावें ? त्या वेळच्या सुलतानाने कबीराच्या ह्या गुन्ह्याबद्दल त्याला काशींतून घालवून दिलें !

एकंदरीने विचार करतां कबीर, कमाल, सुलतान अली, रहीम, रसखान इत्यादि मुसलमान थोर पुरुषांचीं चरित्रें आणि त्यांचे ग्रंथ पाहिले, तर मुसलमान-समाजावर बहुसंख्य हिन्दूंच्या प्राचीन व उच्च तत्वज्ञानाचा परिणाम त्या वेळीं बराच झाला होता; असें म्हणण्याला हरकत नाही. एक कवि म्हणतो—

दीने मुहम्मदीका बेबाक बेडा ।
न जेजोंमें ठेहेरा न कुलजम में अटका ॥
किये जिसने तै चलके सातो समुन्दर ।
वह डूबा दहानेमें गंगाके आखिर ॥ २ ॥

( भावार्थ- जो इस्लामधर्मरूपी नौका-समूह निर्भयपणें स्पेनपासून चीनपर्यंत वेगाने चालला होता, तो सरतेशेवटीं आर्यतत्त्वज्ञानाच्या प्रशांत गंगाप्रवाहांत विश्राम पावला ! )

## हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्.

# (१२) सम्राट कृष्णदेवराय तुळुव

(इ० स० १५०९–१५३०)

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांमध्ये आणि निरनिराळ्या कालविभागांमध्ये होऊन गेलेल्या अनेक हिंदु सम्राटांच्या चरित्रांविषयी क्रमाक्रमाने आपण आतापर्यंत विचार केला. ते सर्व थोर थोर राजे कृष्णानदीच्या उत्तरेकडचे प्रदेशांत होऊन गेले आहेत. महाभारतकालापासूनहि बहुतेक मोठमोठीं राज्यें पंजाब आणि गंगा नदीच्या काठचा प्रदेश ह्यांमध्येच स्थापन झालेलीं दिसतील. असो. अत्यंत चंचल म्हणून प्रसिद्ध असलेली लक्ष्मी–साम्राज्यलक्ष्मी–नांदण्याचें भाग्य इतर प्रांतांप्रमाणे कर्नाटक प्रांतालाहि एका कालीं प्राप्त झालें होतें! उत्तरेकडील बहुतेक हिंदु राजे ज्या वेळीं मुसलमानी सत्तेच्या दडपणाखाली दबून गेले होते, त्या वेळीं हिंदु संस्कृतीचें रक्षण करण्यासाठी तुंगभद्रा नदीचे काठीं 'विजयनगरचें हिंदु साम्राज्य' स्थापन झालें! त्या साम्राज्याचा वैभवशाली अधिपति कृष्णराय ह्याचें चरित्र ह्या प्रकरणांत देत आहों.

चौदाव्या शतकांत दक्षिण हिंदुस्थानांत देवगिरी, वारंगूळ, द्वारसमुद्र आणि मदुरा अशीं चार मोठीं हिंदु राज्यें होतीं. त्यांपैकी देवगिरीचें राज्य इ० स० १३१२ सालीं मलिक काफूर नामक दिल्लीच्या सरदाराने खालसा करून पुढे वारंगूळ, द्वारसमुद्र आणि मदुरा ह्या राज्यांवरहि स्वाऱ्या केल्या आणि थेट रामेश्वरपर्यंत इस्लामी चांद मिरवला.* महंमद तघलघाने-

---

* इ० स० १३३४ ह्या वर्षीं महंमद तुघलघाने कंपिली एथील हिंदु राजास मारून त्याचे अकरा मुलगे बाटवून टाकले.

देखील ह्याच चढाईच्या धोरणाने दक्षिणेंत स्वाऱ्या करून जागजागीं आपलीं लष्करी ठाणीं स्थापन केलीं आणि मदुरेला तर एक सुभेदारहि नेमून ठेवला !

मुसलमानांच्या या स्वाऱ्यांमध्ये हजारो निरपराध हिंदुप्रजेची कत्तल, देवळांची लूट आणि विध्वंस, हिंदु राजांना अटक व बाटवाबाटवी इत्यादि पूर्वीं माहीत नसलेले अघोर प्रकार पाहून हिंदूंचीं मनें विषण्ण व संतप्त झालीं ! तेव्हा द्वारसमुद्र येथील वीरबल्लाळ आणि अनेगुंदी येथील हरिहर व बुक्क ह्यांच्यासारख्या वीरांनीं एकत्र होऊन, इस्लामी सत्ता उत्तर भारताप्रमाणे कर्नाटकांत दृढ होण्यापूर्वीं तिला वेळींच प्रतिकार करून हिंदु धर्मरक्षणासाठी एका प्रबळ हिंदु राज्याची स्थापना करण्याचा विचार केला. श्रृंगेरी येथील विद्यारण्य स्वामींनीहि त्यांना आशीर्वाद देऊन बरेंच साह्य केलें. त्या सुमारास दैववशात् महंमद तुघलघाविरुद्ध जिकडे तिकडे बंडाळी सुरू झाली.

ह्या अपेक्षित संधीचा फायदा घेऊन त्यांनी इ० स० १३३६ मध्ये एका सुरक्षित ठिकाणीं 'विजयनगर' शहराचा आणि तद्द्वारा पूर्वसंकल्पित अशा हिंदु साम्राज्याचा पाया घातला. ह्या साम्राज्यामध्ये चार राजवंशांनीं मिळून सुमारें तीनशे वर्षें यावनी सत्तेचा लोंढा तुंगभद्रेच्या उत्तरेकडील काठावर थोपवून धरिला! ह्या सर्व सम्राटांमध्ये * कृष्णदेवराय तुळुव हा परम प्रतापी, वैभवशाली व कीर्तिमान् होऊन गेला. म्हणून त्याचें चरित्र आपणांस पहावयाचें आहे.

---

* हरिहर, बुक्क, देवराय, कृष्णदेवराय आणि रामराजा हे विशेष कर्तृत्ववान् होते; परन्तु लोकांच्या नजरेसमोर फक्त रामराजाचें नांव आणि तेंहि तालिकोटची लढाई हरलेला व युद्धांत मेलेला अभागी राजा म्हणून येत असतें !

सम्राट् 'वीर नरसिंह' ह्याचे मागून त्याचा धाकटा भाऊ 'कृष्णदेवराय' इ० स० १५०९ सालीं राज्यारूढ झाला. [×] त्याने राज्यप्राप्तीनंतर दोन वर्षें अंतर्गत व्यवस्था व राज्याची मजबुती ह्या गोष्टींकडे लक्ष्य दिलें. पुढे सन १५११ मध्ये म्हैसूरच्या गंगराजावर स्वारी केली. श्रीरंगपट्टण, उम्मतूर इत्यादि ठिकाणें काबीज केलीं आणि गंगराजाला आपला मांडलिक बनवून त्याचे दरबारीं आपला एक प्रतिनिधि (रेसिडेंट) ठेवून सम्राट् कृष्णराय राजधानीला परत आला. ओरिसा प्रांताचा राजा विजयनगरच्या सीमेवरील प्रदेशांत आपलें वर्चस्व स्थापण्याच्या विचारांत होता. त्याची हालचाल पाहून कृष्णरायाने त्याजवर हल्ला केला. अनेक चकमकी झाल्या. शेवटच्या लढाईत त्याचा पूर्ण पराभव होऊन त्याने कृष्णरायाचें मांडलिकत्व कबूल केलें ! ह्या विजयाच्या स्मरणार्थ 'पोट्टनुरू' नांवाच्या गावीं कृष्णरायाने एक कीर्तिस्तंभ उभा केला आहे. ह्यानंतर मुसलमान शत्रूंची पाळी आली ! प्रथम कलबुर्गा येथील मुसलमान सुलतानाकडे कृष्णराय वळला. तेथील तीन शहाजादे (राजपुत्र) त्याने पकडले. नंतर त्यांपैकी एकाला आपल्या तर्फेने तक्तावर बसवून दोघांना आपल्याबरोबर नेलें.

ह्या स्वारीनंतर १५२० मध्ये कृष्णरायाने तुंगभद्रा उतरून 'रायचूर' दुआबावर स्वारी केली. आदिलशहाला ही खबर लागतांच तो त्वरेने येथे येऊन पोचला; परंतु रायाने त्याच्या फौजेचा अगदी धुव्वा उडविला ! पुढे विजापूरच्या रोखाने चाल करून पुष्कळ लूट घेऊन कृष्णराय विजय-नगरला परत आला. रायचूर दुआब जिंकल्यामुळे त्याची सरहद्द कृष्णानदी-पर्यंत जाऊन पोचली ! अशा प्रकारें त्याच्या राजवटीमध्ये विजयनगरच्या हिंदुसाम्राज्यसत्तेचा परमोत्कर्ष झाला.

राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठी ह्या साम्राज्याचे उदयगिरी, पेनुगोंडा व तुळुव इत्यादि सहा विभाग केले होते. त्यांचेवर नायक, गौड व ओडियर

---

[×] एका तेलगु कवितेच्या आधारें १४८७ इ० जन्मकाल ठरला आहे.

अशा हुद्द्यांचे अधिकारी असत. ते सरकारी वसूल व सैन्यभरती वगैरे कामें करीत. खर्च वजा जातां शेतीच्या उत्पन्नाचा एक षष्ठांश कर घेत. कृष्णरायाने शेती सुधारणेकडे चांगलें लक्ष्य दिलें. तुंगभद्रेचा विख्यात कालवा, कोरागलबंधारा व सोंडूरचा तलाव हीं कामें त्यानेच केलीं होतीं. शेती-प्रमाणे हिऱ्यांच्या व इतर खाणी चालविणें, किनाऱ्यावरील समुद्रांतून मोतीं काढणें इत्यादि धंद्यांनाही त्याने उत्तेजन दिलें. कालिकत, मंगळूर इत्यादि बंदरांतून चीन, पेगू मलाया, पोर्तुगाल इत्यादि देशांशीं ह्या साम्राज्याचा व्यापारही फार मोठा चाले. त्यापासून होणारें जकातीचें उत्पन्नही चांगलेंच होतें. व्यापारवृद्धीसाठी आणि विजापूरच्या बादशहाला जरूर तेव्हा शह देण्यासाठी कृष्णराय पोर्तुगीजांना सलोख्याने वागवी. विजय-नगर राजधानी फार विस्तृत व सुंदर होती. 'निकोलो दि कोंती' नामक प्रवासी त्या शहराचा घेर साठ मैल असल्याचें सांगतो. 'दोमिंगो पाएस'च्या मताने राजधानींत एक लक्ष घरें होतीं. म्हणजे लोकसंख्या सुमारें पांच लक्ष असावी. इराणच्या राजाचा वकील अबदुल रझाक म्हणतो—

'विजयनगरसारखें सुंदर व संपन्न शहर कधी कोणी पाहिलें नसेल किंवा ऐकलेंही नसेल!'

सम्राट् कृष्णराय विद्वान् व कलेचा भोक्ता होता. त्याने 'ज्ञानाचिंतामणि' व 'रसमंजरी' हे संस्कृत ग्रंथ आणि 'आमुक्तमाल्यदा' नामक तेलगू ग्रंथ लिहिला आहे. त्याच्या राजसभेंत तिम्मणा व कुमार सरस्वती इत्यादि अनेक कानडी व तामीळ वगैरे कवि होते. श्रृंगेरीच्या गुरूंनी तत्त्वज्ञान व संगीत ह्या विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले. त्या सर्वांवरून त्या वेळची साहित्यरचना व प्रगति समजते. उत्कृष्ट शिल्प आणि खोदकाम हें तर 'विजयनगर' साम्राज्याचें वैशिष्टय होय!

कृष्णरायाने हजार रामाचें व कृष्णस्वामीचें मंदिर, विरूपक्षाचें प्रचंड

गोपुर आणि हंपी येथील मनोरे इत्यादि अनेक भव्य व सुंदर बांधकामें करून आपलें स्मारक ठेवलें आहे! एकाच पाषाणांतून अठरा फूट उंचीची नृसिंहाची भव्य मूर्ति खोदून काढली असून ती प्रेक्षकाला आजहि भग्नावस्थेंत थक्क करून सोडते! यशोमंदिरांतील विविध रंगांमध्ये काढिलेलीं चित्रें फारच प्रेक्षणीय आहेत! कृष्णरायाने हंपी येथे कृष्णपुरम् नांवाची पेठ आणि होस्पेटजवळ नागलापूर म्हणून एक नवीन शहरहि वसविलें होतें. आजही त्यांचे अनेक अवशेष पहावयास मिळत आहेत.

कृष्णराय राज्य करीत असतां 'दोमिंगो पाएस' नांवाचा पोर्तुगीज व्यापारी इकडे आला होता, तो म्हणतो–"कृष्णराय शूर व राजकारणी असून उदार होता. त्यामुळे त्याचेवर लोकांचें प्रेम असे. त्याचें शरीर भव्य आणि रुबाबदार होतें. त्याचे सरदार व मांडलीक त्याला वचकून असत."

तत्कालीन हिंदुस्थानांतील राजांमध्ये त्याचा नंबर बराच वर लागेल. उदेपूरचा महाराणा संग हा कृष्णरायाचा समकालीन राजा होता. इंग्लंडचा राजा आठवा हेन्री ह्याचेशीं कोणी त्याची तुलना करतात; पण विद्वत्ता व धर्मगुरूंविषयी पूज्यभाव इत्यादि बाबतींत कृष्णराय हेन्रीपेक्षा थोर होता, यांत संशय नाही. मोंगल बादशहांतील शहाजहानप्रमाणे दक्षिणेंत सम्राट् कृष्णराय हा वैभवशाली होऊन गेला.

सम्राट् कृष्णदेवराय १५३० मध्ये स्वर्गवासी झाल्यावर तो निपुत्रिक* असल्यामुळे त्याचा भाऊ अच्युतराय गादीवर बसला.

विजयनगरच्या बहुतेक सर्व सम्राटांनी आपणांपुढे धर्मरक्षण हेंच ध्येय प्रामुख्याने ठेवलें होतें. शैव, वैष्णव, जैन, मुसलमान व ख्रिस्ती अशा सर्व धर्मांच्या लोकांना त्यांनी समतेने वागविलें. सम्राट् कृष्णरायाने स्वसांप्र-

---

*कृष्णरायाला 'तिरुमल' नामक एक पुत्र होता; परन्तु तो बालवयांतच मरण पावला होता.

दायाचे गुरु व्यासतीर्थ व श्रृंगेरीचे शंकराचार्य ह्यांना अनेक भूमिदानें दिलीं. कांही राजांनी अन्यधर्मीय लोकांना मशिदी व चर्चे बांधण्यासाठीहि देणग्या दिल्या होत्या! बहुतेक राजे प्रजावत्सल व जुन्या परंपरेचे अभिमानी असल्यामुळे त्यांची सत्ता प्रजेला सुखदायक झाली. साम्राज्याचें अंतर्गत स्थैर्य व शांतता प्रायः ग्रामव्यवस्थेवर अवलंबून होती. ग्रामसंस्थांतून सेनबोवस आणि शेट्टी नामक ग्रामस्थ प्रमुख असत आणि ते वसुलाचे व न्यायाचे कामीं सरकारी अधिकाऱ्यांना सल्ला व मदत देत.

सामान्यत: ह्या साम्राज्याची अखेर रामराजाचे कारकिर्दींत (इ० १५६५ त) झाली असें मानितात. त्यामुळे रामराजाची अपात्रता भासूं लागते; परंतु त्या अपेशी राक्षसतागडीच्या युद्धापूर्वी रामराजाने केलेले अनेक पराक्रम व डावपेच लक्ष्यांत घेतले, म्हणजे त्याची योग्यता कळून येते. यादगिरी, कल्याणी वगैरे त्याने काबीज केलेलीं ठिकाणें पाहिलीं, तर कृष्णरायाच्या सीमेच्या पुढेदेखील त्याने साम्राज्याची हद्द व दरारा स्थापन केला होता, असें सिद्ध होतें व तो उत्कर्ष सहन न झाल्यामुळेच साऱ्या मुसलमान शत्रूंनी जूट करून पानिपतप्रमाणे रामराजाशीं निकराचा सामना केला होता. परन्तु तो वज्राघात सहन करूनही महाराष्ट्रांत 'शिवछत्रपति' जन्मास येईपर्यंत त्या राज्याने हिंदु संस्कृतीला आधार दिला.

## हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्.

## (१३) राष्ट्र-पुरुष आणि परकी सुराज्याचें अतरंग.

आतापर्यंत बऱ्याच हिंदु साम्राटांचीं उद्बोधक व अभिमानास्पद चरित्रें आपण पाहिलीं आणि त्यांच्या अनुषंगाने इतरही अनेक घटनांचें ओझरतें अवलोकन आपण केलें. त्यानंतर ह्या प्रकरणांत त्या प्रकारचें एखाद्या हिंदु राजाचें चरित्र द्यावयाचें नसून, देशामध्ये दृढमूल होऊं पाहणाऱ्या एका परकी राजसत्तेने मोठया कुशलतेने सुरू केलेला सुराज्यस्थापनेचा प्रयोग आणि त्या प्रयोगाच्या अंतरंगांतील मख्खी ओळखून त्या परकी सत्तेचा डाव उधळून लावण्यासाठी स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रपुरुषांनी चालविलेली लढत, ह्यांविषयी थोडेंसें विवेचन करावयाचें आहे.

सोळाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत सुमारें तीनशे वर्षांमध्ये कडव्या पठाण वगैरे मुसलमान राजांनी आपल्या करड्या अंमलखालीं हिंदूंना दाबून टाकण्याचे यत्न करून पाहिले; परन्तु ह्या देशाचा अफाट विस्तार व हिंदूंचें प्रचंड संख्याबल ह्यामुळे त्यांचा उद्देश तडीस गेला नाही. शिवाय मेवाडचे महाराणे व विजयनगरचे सम्राट् इत्यादिकांकडून त्यांना जोराचा प्रतिकारही होत असे. तसेंच मुसलमानांतसुद्धा कित्येक जमाती असून, त्यांच्यांतही सत्तेसाठी स्पर्धा चालू होतीच. हें सर्व पाहून अकबरासारख्या धोरणी बादशाहाने आपलें वर्चस्व स्थापण्याची व टिकवण्याची एक नवीनच दिशा योजिली !

अकबराच्या ह्या नवीन प्रयोगांपैकी रजपूत राजांशीं जोडलेला शरीर-

सम्बन्ध हा एक महत्त्वाचा भाग होय. सक्तीच्या खुशीने आप्त बनविलेल्या रजपूत राजांस मोठ्या देणग्या व बादशाही नोकऱ्या देऊन त्यांच्या क्षात्रतेजाचा उपयोग कधी इतर हिंदु राजांविरुद्ध तर कधी जुन्या अफगाणांविरुद्ध त्याने करून घेतला. तसेंच प्रजेचीं अंतःकरणें झुलवीत ठेऊन, तिला आपल्या गतवैभवाचा आणि नैसर्गिक हक्कांचा विसर पाडण्यासाठी उभारलेलें 'दीने इलाही' धर्माचें गारूडही त्याच प्रकारांत मोडणारी विलक्षण युक्ति होय ! ( कारण त्या धर्माच्या आद्य गुरूचें काम तो स्वतःच करी; पण त्या नव्या धर्मावर त्याचा स्वतःचा फारसा विश्वास नव्हता. ) त्या अजब नाटकामुळे फसून जाऊन बिरबल व तानसेन ह्यांच्यासारखे थोर हिंदु पुरुष स्वधर्माला मुकले. तानसेनाच्या ह्या धर्मांतरामुळे भारतीय गायनपद्धतीवर मुसलमानी शिक्का बसणें सुलभ झालें. नंतर त्या अभिनव अशा प्रयोगाचा तिसरा भाग म्हणजे अकबराने स्थापिलेली शांतता आणि सुव्यवस्था. कडव्या अफगाणांच्या सुलतानी अंमलाखाली जेरीस आलेल्या प्रजेला त्याची राज्यपद्धति म्हणजे दैवी देणगीच, असें वाटणें साहजिकच होतें. दुसरें असें की, मोंगल बादशहांचें समर्कंद बुखारा इकडील मूळ केव्हाच तुटलें होतें. त्यामुळे त्यांची उपरीपणाची दृष्टि कांहींशी कमी झाल्याने त्याचाही परिणाम देशस्थितीवर इष्ट असा झाला. ते दिल्लीला राहूं लागल्यामुळे ह्या देशांतील संपत्तीचा ओघ बाहेर गेला नाही, हीदेखील एक इष्टापत्तीच मानली पाहिजे ! घुणाक्षरी न्यायाने का होईना, ही व्यवस्था व एकछत्री अंमल पुढेही नीट चालता, तर कांही काळाने ह्या देशांत हिंदु-मुसलमानांचें संयुक्त, समर्थ आणि संपन्न असें एक राष्ट्र निर्माण झालें असतें ! × परन्तु परकी राज्यकर्त्यांचा

× पंधराव्या सोळाव्या शतकामध्ये कित्येक विचारी मुसलमानांच्या मनांत हिंदभूमि व हिन्दु बांधव ... ह्यांच्याविषयी आपलेपणा उत्पन्न

[टीप पुढील पृष्ठावर पहावी.]

भिन्नधर्मी आणि भिन्न संस्कृतीच्या लोकांवर मिळवलेल्या राजकीय वर्चस्वाचा अभिमान शहाणपणाच्या आवरणाखाली नेहमी दबून राहणें कठीणच आहे. तो केव्हा आणि किती उसळी मारील ह्याचा नेम नसतो !

राणा उदयसिंहाचा पराभव करून चितोड जिंकल्यावर अकबराने तेथे केलेल्या कत्तलीमध्ये आणि हरएक वस्तूच्या व रजपूत कलाकौशल्याच्या राक्षसी विध्वंसामध्ये हाच ताठा, निष्ठुरता व पाशवी शक्तीचा दिमाख दिसून येतो. औरंगजेबाने तर ह्या बाबतींत कमाल मर्यादाच गाठली ! असो.

---

होऊं लागलाही होता. एकराष्ट्रीयत्वाच्या उच्च भावनेने प्रेरित होऊन जर मुसलमान राज्यकर्त्यांना सामान्य लोकांच्या भावनांची जोपासना केली असती, तर किती नामी झालें असतें ? 'रसखान' ह्या मुसलमान कवीचे उद्गार पहा–

पत्थर हौं तो वही गिरि को जु कियो व्रज छत्र इंद्र कारन ।
जो खग होउँ बसरो करौं वही कालिंदी कूल कदंब की डारन॥

ह्या कवितेवरून कवीचे मनांत कालिंदी-यमुना नदीबद्दल तसेंच गोवर्धन पर्वताबद्दल आतिशय प्रेम असलें पाहिजे, हें उघड आहे. तर मग आणखी थोडें पुढे गेल्यानंतर 'मातृभूमि' हीच भावना उत्पन्न होणार नाही काय ?

कवि महंमद जायसी म्हणतो— हिंदूही मुसलमानांप्रमाणेच देवाचे पुत्र-कन्या होत. म्हणून त्यांच्या धर्मांची निन्दा करूं नका; आदर बाळगा.

तिन्ह संतति उपराजा भाँति भाँति कुलीन ।
हिंदू तुरक दुनऊ भये अपने अपने दिन ॥

अकबरासारख्या धूर्त परकी राज्यकर्त्यानें स्थापलेलें राजकीय ऐक्य आणि सुराज्य ह्यांच्या घटोत्कची बाजारामध्ये कांही लोक भुलून जाणें साहजिकच होतें. 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' असें म्हणून अकबरापुढे लाळ घोटणारे रजपूत राजे हे अशा लोकांत गणतां येतील ! वैदिक वाङ्मयामध्ये लोकांना स्वस्थितीचा विसर पाडणाऱ्या ह्या राज्यपद्धतीला त्या वेळच्या विचारी राष्ट्रपुरुषांनी 'आसुरी' असें नांव दिलें आहे. खरोखर दारिद्र्य वाढत असून, आपण सुखी होत चाललों आहों; तसेंच वास्तविक कांहीच ज्ञान न मिळतां आपण सर्वच लोक मोठे सभ्य आणि विद्वान् झालों आहोंत; असा लोकांना भास होणें, हें त्या राजनीतीचें लक्षण होय !

स्वाभिमानी आणि दक्ष असे राष्ट्रपुरुष मात्र ह्या जाळ्यांत न गुरफटतां तें तोडून टाकण्याच्या उद्योगाला लागतात. मेवाडचा वीर प्रताप हा तत्कालीन राष्ट्रपुरुषांचा नेता होय. त्याला सम्राट् किंवा महाराणा न म्हणतां राष्ट्रपुरुष म्हणून संबोधणें अधिक उचित होईल; कारण एकतर त्याच्या बापाच्या वेळीं सर्व देश अकबरानें जिंकल्यामुळे त्याला अरवली पर्वताच्या डोंगराळ भागांतच रहावें लागलें होतें. तसेंच त्याला मिळालेलें राज्यपद केवळ वारसदारीनें किंवा तरवारीच्या बळावर मिळालें नसून, त्याच्या अंगच्या अनेक सद्गुणांमुळे त्याच्या भावाला पदच्युत करून स्वातंत्र्यप्रिय रजपुतांनी त्याला आपला राजा किंवा नेता म्हणून निवडलें होतें.

आता अकबराच्या अनेक युक्त्यांना तोंड देऊन आणि नंतर अनेक घनघोर लढाया करून 'प्रतापा'नें देशाचें स्वातंत्र्य कसें रक्षण केलें, हें आपण पाहूं. प्रथमतः शरीरसम्बन्ध जोडून रजपुतांचें पाठबळ मिळविण्याचा जो डाव अकबरानें टाकला होता, तो त्या स्वाभिमानशून्य लोकांवर जातीय बहिष्काराचें शस्त्र धरून प्रतापानें उलटून टाकला !

त्यामुळे बाणेदार रजपूत समाजामध्ये त्या जोधपूर, जयपूर येथील राजां-विषयी तिरस्कार उत्पन्न झाला व तितक्याच प्रमाणांत प्रतापसिंहाबद्दल रजपूत जनतेचा आदर द्विगुणित झाला. त्यामुळे अनेक जात्याभिमानी व देशाभिमानी रजपूत सरदार प्रतापाच्या निष्कलंक झेंड्याखालीं जमा झाले.

त्यानंतर दुसरा भाग म्हणजे अकबराने मेवाडांतील जो प्रदेश जिंकून तेथे आपली नवीन राज्यपद्धति सुरू केली होती, अर्थात् जेथे राहण्याने सुखशांतीला चटावलेल्या लोकांना स्वाभिमानाचा विसर पडणार होता, त्या प्रदेशांत राहूं नये, अशी सक्त तजवीज केली! त्यामुळे मोगलांच्या तिकडील वसुलाला चांगलाच चट्टा बसला. मोंगली फौजेसाठी पैसा व धान्य दिल्लीहून आणण्याची पाळी आली आणि तेंही वाटेंत रजपुतांनी लुटल्यामुळे मोंगल फौज हैराण होऊं लागली. अकबराला आणखीही थोडें नुकसान पोचविण्यासाठी 'प्रतापाने' सुरत बंदराकडून होणाऱ्या मोंगलांच्या व्यापाराचे सर्व रस्ते रजपूत व भिल्ल ह्यांचे साह्याने रोखून धरले. त्यामुळेही बादशहाचें नुकसान होऊं लागलें. त्यानंतर झालेल्या प्रत्यक्ष युद्धांच्या हकिगती मात्र विस्तार-भयास्तव येथे देत नाही. स्वातं-त्र्यासाठीं झगडणारा प्रताप, त्याचा प्रधान भामशा व लोकप्रतिनिधि चंद्रावत असे राष्ट्रपुरुष धन्य होत!

ज्यांना धकाधकीच्या ह्या मामलयांत पडतां येत नव्हतें, असे लोकही ह्या राष्ट्रपुरुषांचें सानंद कौतुक करून त्यांचें सुयश चिंतीत होते. दिल्लीच्या दरबारांतून 'पृथ्वीसिंह' नामक एक रजपूत सरदार प्रतापाला लिहितो—

"........यह दशा सर्वदा नहीं रहेगी। एक दिन समस्त राजपूत जाति प्रताप के चरण चुमेगी। आर्यों को पुनः उन्नति के शिखरपर पहुंचाने का मान प्रतापही प्राप्त करेंगे........"

## हिंदुस्थानचे हिंदु सम्राट्.

# (१४) छत्रपति शिवाजी महाराज.

(जन्म इ० स० १६३० मृत्यु १६८० )

"महापुरुष अपने युगकी प्रवृत्तियोंका प्रतिनिधि है, विचारधाराओंका प्रतिबिंब है। वह युगका जहाँ पुत्र है, वहाँ उसका निर्माता भी होता है।

— पंडित व्यंकटेश नारायण तिवारी.

पुणें जिल्ह्यांतील शिवनेरी किल्ल्यावर इ० स० १६३०* सालीं शिवाजीचा जन्म झाला. त्याच्या बापाचें नांव शहाजी राजे भोसले आणि आईचें नांव जिजाबाई असें होतें. शहाजीला विजापूर दरबारकडून पुणें प्रांतांत एक जहागीर मिळाली असून, तो स्वतः विजापूरकरांतर्फे कर्नाटकांतील स्वारीवर नेहमी असल्यामुळे त्या जहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी त्याने दादाजी कोंडदेव नामक गृहस्थास पुण्याला ठेविलें होतें. शिवाजी आणि मातुश्री जिजाबाई तेथेच रहात असत. दादोजीने त्या जहागिरीची उत्तम व्यवस्था लावून उत्पन्न वाढविलें. तसेंच शिवाजीला घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें व नेम मारणें वगैरे सरदारांच्या मुलांना अवश्य असें शिक्षण दिलें. जहागिरीचा कारभार व न्याय वगैरे कामें करतांना त्याला जवळ बसवून त्याविषयी प्रत्यक्ष बरीच माहिती करून दिली. मातुश्री जिजाबाई आपल्यापरी रामायण व महाभात ह्यांतील आदर्श पुरुषांच्या गोष्टी सांगून त्याचे बालमनावर उदात्त संस्कार करीत असे.

---

* सन १६३० जेधे शकावलीप्रमाणे मानला जातो. रियासतकार श्री० सरदेसाई, शके १५४९ सन १६२७ देतात.

अशा उत्तम शिक्षणाचा लाभ शिवाजीला मिळाल्यामुळे त्याचे ठिकाणीं अनेक सद्गुणांचा विकास झालेला दिसून येतो.

इ० स० १६४६ सालीं तोरणा किल्ला अदिलशहाचे किल्लेदाराला वश करून शिवाजीने आपल्या ताब्यांत घेतला× आणि तेथपासून सुमारें पंचवीस वर्षें भगीरथ प्रयत्न करून शिवाजीने तानाजी, मोरोपंत इत्यादि अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने महाराष्ट्रांत 'हिंदवी स्वराज्य' स्थापन केलें. इ० स० १६७४ त रायगडावर मोठा समारंभ करून शिवाजीने आपण स्वतंत्र अशा मराठी राज्याचा राजा झाल्याचें जाहीर केलें, त्याच्या आयुष्यांत प्रतापगड-चें युद्ध (ज्याला अफझुलखानाचा वध म्हटलें जातें), औरंगजेबाचे तावडींतून आग्ऱ्याहून मोठ्या शिताफीने सुटका, सुरत, विजापूर व हुबळी इत्यादि संपन्न शहरांवरील हल्ले; शिद्दी व इंग्रज ह्यांचेबरोबर झालेल्या आरमारी चकमकी आणि कर्नाटकांतील दिग्विजय इत्यादि अनेक प्रसंग महत्त्वाचे होत. त्यांपैकी कित्येकांवर स्वतंत्र इतिहास, नाटकें वगैरे पुष्कळ वाङ्मय मराठींत झालें आहे. त्यावरून शौर्य, दक्षता, प्रसंगावधान, चातुर्य व धर्मनिष्ठा इत्यादि शिवाजीचे अनेक गुण आपल्या नजरेस येतात.


राज्याभिषेकानन्तर सहा वर्षांनी 'गुडघी' रोगाने छत्रपति शिवाजी महाराज स्वर्गवासी झाले. त्यांला संभाजी व राजाराम असे दोन पुत्र होते. वडील मुलगा संभाजी ह्याने बापाचे पश्चात् राज्य कारभार आपल्या हातीं घेतला.

---

× इ० स० १६४४ त कोंडाणा (सिंहगड) किल्ला व प्रांत दादाजीने हस्तगत केला. शिवाजीने तेथील बंदोबस्त करून नंतर तोरण्याच्या किल्लेदाराशीं संधान बांधून तोही ताब्यांत घेतला.

—मराठी रियासत (शककर्ता शिवाजी).

# छत्रपति शिवाजीमहाराज




‘ अवघी दक्षिण दक्षिणीया हातीं । ’

( शिवाजीमहाराजांच्या उद्योगाचें एक सूत्र )

# छत्रपति शिवाजी महाराज



सिंहगड

छत्रपति शिवाजी हा हिंदुस्थानांतच नव्हे, तर सर्व जगांत एक लोकोत्तर पुरुष होऊन गेला ! इतिहासाचार्य कै० राजवाडे म्हणतात—

'शिवाजीची योग्यता स्वयंसिद्ध आहे. त्याच्याशीं तुलना करावयाची झाली, तर स्वदेशाला स्वातन्त्र्य मिळवून देणाऱ्या ज़ॉर्ज वॉशिंग्टन् किंवा किंवा हॉलंडचा 'पहिला विल्यम्' अशा राष्ट्रपुरुषांशीं करावी लागेल. जगज्जेता 'अलेक्झँडर दि ग्रेट' प्रमाणे शिवाजीने जिंकलेल्या शहरांतील अमोलिक ग्रंथसंग्रह जाळले नाहीत किंवा आपल्या स्नेह्यांना मारिलें नाही, ज्यूलियस् सीझरप्रमाणे धर्मपत्नीला निराधार सोडलें नाही, नेपोलियनप्रमाणे राक्षसी महत्त्वाकांक्षेने इतर राष्ट्रांचें स्वातन्त्र्य हरण केलें नाही. नेपोलियनपेक्षा शिवाजीचें खाजगी वर्तन पवित्र होतें. क्रॉम्वेलप्रमाणे एखाद्या प्रांतांतील लोकांची निष्ठुरपणें कत्तल उडविली नाही ! बाबर बादशहाप्रमाणे तो शूर व कंटक होता. अकबराप्रमाणे त्याने व्यवस्थित राज्यकारभार केला. औरंगजेब बादशहाची उद्योगशीलता त्याचे अंगीं असून औरंगजेबाचें कपट, क्रूरता, विश्वासघात, परधर्माविषयी असहिष्णुता इत्यादि दुर्गुण शिवाजीमध्ये नव्हते !'

शिवाजीचें चरित्र मराठी वाचकांच्या परिचयाचें असल्यामुळे येथे विस्ताराने दिलें नाही. मात्र त्याच्या चरित्रांतील वैशिष्टय आणि प्राप्त झालेल्या अपूर्व यशाचें रहस्य स्पष्ट कळण्यासाठी मी यथाशक्ति सारांशरूपाने थोडी चर्चा करीत आहें.

शिवाजी जन्माला येण्यापूर्वी तीनशे वर्षें महाराष्ट्रांत मुसलमानी सत्ता चालत होती. त्या अमदानीमध्ये हिंदु प्रजेला कोणत्या स्थितींत दिवस कंठावे लागत होते, ह्याविषयी साधु एकनाथ म्हणतात—

गाई ब्राह्मणांसी जाण। पीडा करिती दारुण ॥
क्षेत्रवित्तदाराहरण। स्वार्थें प्राण घेताती ॥१॥

ह्यानंतर ता० ९।४।१६६९ रोजीं औरंगजेबाने बादशाही फर्मान काढून शेकडो पवित्र व सुंदर मंदिरांचा विध्वंस केला. हिंदुस्थानच्या आणि हिंदु जातीच्या इतिहासांत ह्याच्याइतका चीड आणणारा दिवस क्वचितच आढळेल ! लुटीच्या लोभाने किंवा धर्मवेडाने दूरच्या अनेक मुसलमान राजांनी हिंदु मंदिरें व मूर्ति भंगिल्या असतील; परन्तु हिंदुस्थानचा बादशहा म्हणविणाऱ्या राजाला प्रजेच्या धर्मभावना पायाखाली तुडविणारें हें फर्मान काढणें म्हणजे लांच्छन होय ! भूतदयेचें, प्रजावात्सल्याचें आणि राजकीय मुत्सद्दिगिरीचें अशा प्रकारें दिवाळें निघाल्यानंतर मोंगल बादशाहीच्या सत्तेला व वैभवाला झपाट्याने ओहोटी सुरू झाली. उत्तरेंतील महाराणा राजसिंह प्रभृति शूर व धर्माभिमानी हिंदु राजांनी बादशाहीवर आघात करण्याला सुरुवात केली. बुंदेला राजा छत्रसाल आणि महाराष्ट्रांतील छत्रपति शिवाजी ह्यांनीही त्यांचाच कित्ता पुढे गिरविला ! त्यामुळे पुढील बादशहा निर्माल्यवत् झाले !

रामदासांनी तीर्थयात्रा करीत असतां अनेक पवित्र क्षेत्रांना व हिंदु साधुसंतांना दिल्लीच्या बादशाही सत्तेकडून होणारा हा उपद्रव पाहून हिंदूंना जागृत करण्यासाठी आपल्या रसरशीत तीव्र शब्दांनी हाक फोडली—

तीर्थें क्षेत्रें बुडालीं । ब्राह्मण-स्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥१॥

अशा संकटकाळीं रामदासासारख्या विरक्त साधूंनाहि 'हिंदुराजा'ची आवश्यकता भासूं लागली.

गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा ।
ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ॥१॥

कविश्रेष्ठ मुक्तेश्वरानेसुद्धा 'पुराणांतील अवतारी पुरुषांच्या वर्णनाची

कांही प्रचीति दाखवावी,' अशी देवाची प्रार्थना केली आहे. अशा रीतीने जुलमी राजसत्तेविषयी जो तीव्र असंतोष देशभर पसरत होता, त्यांतूनच आत्मरक्षणार्थ 'स्वराज्य' मिळविलेंच पाहिजे, ही भावना उत्पन्न झाली! अर्थात्च गरज आणि पुरवठा ह्या तत्त्वाप्रमाणे त्या महान् ध्येयासाठी तळमळणाऱ्या लाखो लोकांच्या प्रबलतर इच्छाशक्तीने शिवाजीसारख्या विभूतीला निर्माण केलें!

छत्रपति शिवाजीने जें प्रचंड कार्य केलें, त्याची तयारी त्याचे पूर्वीपासून महाराष्ट्रांत चालूच होती. वेरूळचा पाटील मालोजी भोसले ह्याने नांगर टाकून तरवार घेतली आणि निजामशहाकडून स्वपराक्रमाने मोठी जहागीर मिळवली. त्याचा पुत्र शहाजी हासुद्धा निजामशहाचा सेनापति होता. त्याला हिंदूंची दुर्दशा दिसत होतीच; परंतु कांही काळाने सत्ताधीशांना सुबुद्धि होऊन हिंदु-मुसलमानांचें संयुक्त राष्ट्र देशांत नांदूं लागेल, अशा कल्पनेने शहाजी लहानग्या निजामाचा पक्ष घेऊन मोंगलांशीं लढला. परंतु निजामशाहीचें मोंगल बादशहापासून रक्षण होणें आणि हिंदु-मुस्लीमऐक्य प्रस्थापित होणें ह्या दोन्ही गोष्टी त्याला पुढे अशक्य वाटूं लागल्या. निजामशाहीप्रमाणे विजापूरच्या अदिलशाही राजकारणाचाही प्रत्यक्ष नौकरी करून त्याने अनुभव घेतला.

त्यानंतर बादशाही राजधानीपासून आपण दूर राहून हिंदु संस्कृतीच्या रक्षणार्थ शक्य तो उद्योग करावा, असे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. आदिलशहाचा नोकर ह्या नात्याने शहाजी 'विजयनगरच्या हिंदु सम्राटावर' स्वाऱ्या करीत होता आणि दुसऱ्या हाताने जणू काय शिवाजीच्या भावी हिंदवी स्वराज्याची सामग्री जमवीत होता! महाराष्ट्र व कर्नाटक अशा दोन प्रांतांत दोघां पुत्रांना ठेवून पुढेमागे भाऊबंदकी उत्पन्न होऊं नये, इतकेंच नव्हे तर दोघांचें राजकीय एकीकरण होत जावें, अशी त्याची योजना दिसून येते. महत्त्वाकांक्षी भोसले घराण्याप्रमाणे इतरही अनेक

मराठे व ब्राह्मण वगैरे महाराष्ट्रीय लोक मुसलमान सुलतानांकडे शिपाई, कारकून, सरदार किंवा प्रधान म्हणून नौकरी करून राज्यकारभाराचें शिक्षण अप्रत्यक्ष घेत होते. पूर्वी ज्याप्रमाणे हिंदु राजांच्या अंत:कलहाचा फायदा मुसलमानांस मिळाला होता, त्याचप्रमाणे आता मुसलमान राजांच्या भांडणामध्ये हिंदु सरदारही नोकर म्हणून ओढले गेल्यामुळे स्वपर–बलाबलाची त्यांना कल्पना येऊन त्यांचे मनांत थोडा आत्म-विश्वास व स्वातंत्र्याची नैसर्गिक लालसा उत्पन्न होणें सहाजिकच होतें.

रघुनाथपंत हणमंते, मोरोपंत पिंगळे, मादण्णा ह्यांच्यासारखे राज-कारणी पुरुष ज्या वाटाघाटी करीत होते, किंवा कर्नाटकांतून महाराष्ट्राच्या रोखाने जी धांवपळ करीत होते, तिच्या मुळाशीं कांहीतरी उच्च ध्येय असलें पाहिजे. अशा प्रकारच्या अपूर्ण आणि विस्कळीत हालचालींना पूर्णता देऊन व एकत्रित करूनच त्या वेळीं शिवाजीसारख्या चतुर व महत्त्वाकांक्षी पुरुषाने महाराष्ट्रांत, नव्हे दक्षिण देशांत स्वतंत्र हिंदु राज्याची स्थापना केली, हें उघड आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी हजारो शूर रजपुतांनी आत्मबलिदान करून-ही रणदेवता त्यांचेवर कां प्रसन्न झाली नाही? देवगिरीचे राजे 'यादव' अल्लाउद्दीनाच्या एका साधारण तडाख्यानेच कसे कोलमडून पडले? किंवा बंगालचे 'सेन' राजे मुसलमानांचा यत्किंचितही प्रतिकार कां करूं शकले नाहीत? इत्यादि प्रश्न आपल्या इतिहासांत महत्त्वाचे आणि चिंतनीय आहेत. त्यांविषयी शिवाजीने सूक्ष्म विचार केला होता किंवा काय कोण जाणे! परंतु अनेक हिंदु राजांच्या हातून झालेल्या चुकांची पुनरावृत्ति शिवाजीच्या राजवटींत दिसत नाही, एवढें मात्र खरें. शिवाजीच्या उद्योगांतील एकंदर धोरणाचा आता क्रमाने विचार करूं—

( अ ) महाराष्ट्राचें अभेद्य संघटन हा शिवाजीच्या यशोमंदिराचा पाया होय! हा पाया घालतांना त्याने सामदामादि सर्व उपाय योजिले.

अफझलखानाचा वकील कृष्णाजीपंत ह्याला मोठ्या खुबीने आपल्या बाजूला वळवून घेऊन आपलें कार्य त्याने साधलें. चंद्रराव मोऱ्याचा अजिबात काटा काढून इतर प्रतिस्पर्धी मराठ्यांवर वचक बसविला, तर दुसरीकडे बजाजी निंबाळकराला शुद्ध करून× आपलासा केला. ब्राह्मण, मराठे, कायस्थ अशा साऱ्या लोकांस एकत्र करून कामाला लाविलें. अशा प्रकारें रजपुतांमधील संघटनेची उणीव महाराष्ट्रामध्ये शिवाजीने राहूं दिली नाही.

(आ) रजपुतांच्या मानापमानाच्या व धर्मयुद्धाच्या कल्पना शत्रुपक्षाच्या मनोवृत्तींकडे लक्ष्य देऊन शिवाजीने बदलून टाकल्या. एखाद्या लढाईंत पराभव झाला–नव्हे होणार असें वाटतांच उघड किंवा गुप्तपणें पळून जाऊन पुढे संधि पाहून शत्रूचा पाडाव करावा, असें धोरण त्याने आखिलें. आपत्प्रसंगीं पुण्याची राजधानी रायगडला किंवा साताऱ्यालाच काय, पण दूर 'जिंजी' येथे नेऊन स्वातंत्र्याचा लढा चालवण्याची चिकाटी मराठ्यां-

---

×बजाजी निंबाळकर ह्याला अदिलशहाने जुलमाने मुसलमान केलें होतें. हिंदुधर्मदृष्ट्या ही गोष्ट खेदकारक होतीच; पण त्याहूनही सामाजिक व राजकीय दृष्ट्या तें घातुकच होतें. अनेक देवतांची व गुरूंची उपासना ज्या धर्मांतील लोक स्वेच्छेनुसार करूं शकतात, त्या हिंदुधर्माला मुसलमानी 'नमाज' ( प्रार्थना ) कदाचित् पचवितां आली असती; परंतु त्या धर्मांतरांत शुद्ध मतांतर नसून भ्रष्टता होती. हिंदूंनी अभक्ष्य मानलेले पदार्थ खाल्ल्याखेरीज अर्थात् खाणेंपिणें व चालीरीति, विवाह व वारसाहक्क ह्या बाबतींत एखाद्या माणसाला हिंदुसमाजापासून तोडल्याखेरीज त्याचें धर्मांतर पूर्ण होत नसे अर्थात् अशा भ्रष्ट माणसाचा ओढा स्वजातीकडून कमी करून आपणाकडे ओढून घेणें व पर्यायाने सामाजिक व राष्ट्रीय फूट पाडून जित समाज दुर्बळ करणें, असा हेतु विधर्मी राजकर्त्यांचा असूं शकतो. तो ओळखूनच शिवाजीने मराठा समाजाचें बल वाढवण्यासाठी बजाजी निंबाळकर किंवा नेताजी पालकर इत्यादिकांना शुद्ध करून स्वधर्मांत घेतलें असावें.

मध्ये शिवाजीने उत्पन्न केली. सबंध राष्ट्राचें भवितव्य एकाच युद्धावर मराठ्यांनी अवलंबून ठेवलें नाही.

( इ ) शत्रूच्या हालचालींची बातमी ठेवण्याची दक्षता, हें शिवाजीच्या यशाचें एक महत्त्वाचें कारण होतें. सम्राट् चंद्रगुप्त मौर्य ह्याचेप्रमाणे शिवाजीचें स्वतंत्र बातमीखातें असून त्यामध्ये बहिर्जी नाईक प्रमुख होता. रामदेव यादव देवदर्शन करीत असतां किंवा बंगालचा लक्ष्मणसेन भोजन करीत असतां अकस्मात् मुसलमानांचा हल्ला येऊन त्या हिंदु राजांचे पदरीं जें नामुष्कीचें अपयश आलें, त्याचें कारण गाफीलपणा हेंच होय ! मुसलमान राज्यकर्त्यांमध्येहि ह्या दक्षतेचा बराच अभाव होता. नाहीतर तैमूर-बाबर-नादिरशहा ह्यांच्याबरोबर हिंदुस्थानच्या बादशहांनी दिलेल्या लढाया पानपत-दिल्लीमध्ये न होतां दूर पेशावर-अटकच्या आसपास झाल्या असत्या आणि पंजाबमधील प्रजेची प्राणहानि टळली असती ! त्याच सुस्तपणाचा फायदा बादशाही फौजेवर छापे घालून चपळ मराठे स्वारांनी अनेक वार घेतला. रामदासांचे शिष्य सर्वत्र संचार करीत असल्यामुळे त्यांजकडून कांही बातमी शिवाजीला मिळे. विजापूरहून अफझुलखान येत असल्याची खबर रामदासांनी शिवाजीला कांही सांकेतिक ओव्यांचें पत्र पाठवून कळविली होती. 'प्रतापगडचें' युद्ध ह्या पुस्तकांत त्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

(ई) आपला राजा किंवा सेनापति युद्धामध्ये मरण पावला की, विनाकारण तेवढ्यावरून घाबरून जाऊन हिंदूंनी रणांगण सोडून पळ काढल्याचीं अनेक उदाहरणें अढळतात. ह्या चुकीची सुधारणा करून एकाचे जागीं दुसरा पुढारी उभा करून त्याचे नेतृत्वाखाली देशासाठी आपण लढलेंच पाहिजे, अशी भावना शिवाजीने मराठ्यांत उत्पन्न केली. सिंहगडावर तानाजी पडतांच त्याची जागा सूर्याजीने घेऊन युद्ध जिंकलें. तसेंच जेसूरीच्या लढाईंत प्रतापराव गुजर पडतांच त्याची जागा हंसाजी मोहित्याने

घेऊन मराठ्यांना जय मिळवून दिला! प्रत्यक्ष छत्रपति शिवाजी आग्रा येथे कैदेंत असतांही मराठ्यांचें इकडील कार्य पूर्ववत् सुरळीत चालू होतें.

( उ ) किनाऱ्याच्या सुरक्षितपणासाठी शिवाजीने आरमार तयार केलें. विजापूरचे अदिलशहांनी तें काम शिद्दीवर सोपविलें, तर दिल्लीच्या मोंगलांनी बंगालच्या किनाऱ्याचें संरक्षण परकी पोर्तुगीजांना सांगितलें. हें परावलंबी धोरण सोडून त्याने आपलें राजनीतिनैपुण्य सिद्ध केलें आहे.

( ऊ ) आपल्या सरदारांना जहागिरी न देतां रोख पगार आणि इतर बक्षिसें देऊन त्यांजकडून काम करून घेतलें. त्यामुळे त्याचे सरदार डोईजड किंवा शत्रूला फितूर झाले नाहीत. लुटीचा सर्व ऐवज एकत्र राजाकडे जमा करून नंतर मिळेल तेवढें बक्षीस घ्यावयाचें, अशी कडक शिस्त असल्यामुळे त्याची मुलुखगिरी फायदेशीर होऊन, खजिना भरलेला असे. स्वतः राजा देश व धर्म ह्यांच्या कल्याणासाठी झटत असल्यामुळे त्याचे अधिकारीही स्वामिनिष्ठ, अल्पसंतुष्ट व प्रामाणिक असेच होते.

( ए ) पौर्वात्य राजांचा स्वतन्त्रपणा आणि पाश्चात्यांची लोकसत्ता-पद्धति ह्यांचा सुंदर मिलाफ घालणारी 'अष्टप्रधानसंस्था' निर्माण करून व त्यांजवर अधिकाधिक जबाबदारीचीं कामें टाकून त्यांना तरबेज केलें. त्या व्यवस्थेचा उपयोग संभाजी व राजाराम ह्यांच्या कारकिर्दींत विशेष झाला. शिवाजीचें राज्य 'मराठी राज्य' म्हणून ओळखिलें जातें, भोसल्यांचें म्हणून नव्हे. तो आपणांस 'देव, गाई आणि ब्राह्मण ह्यांचा प्रतिपालक' म्हणवीत असे. भगीरथ प्रयत्न करून त्याने 'मराठ्यांचें राष्ट्र' बनविलें.

( ऐ ) शिवाजीचें राज्य क्षेत्रविस्ताराने लहानच होतें आणि त्याचे सैन्यांत किंवा राजसभेंत बादशाही रुबाब नव्हता, तरीही त्याला 'दक्खन-चा सम्राट्' असें म्हणण्याला हरकत नाही. 'अवघी दक्षिण दक्षिणिया हातीं' हें जुन्या बखरींतील वाक्य त्याच्या उद्योगाचें रहस्य दर्शवीत आहे. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान त्याला दरसाल खंडणी पाठवीत होते. मोंगलांच्या ताब्यांतील खानदेश-वऱ्हाडमधून प्रतापराव गुजराने

खंडण्या गोळा केल्या आणि गावोगावच्या पाटलांना चौथाई वसूल केल्याबद्दल पावत्याही दिल्या. नंतर स्वतः शिवाजीने कर्नाटकांत स्वारी करून बराच प्रदेश घेतला व तेथे आपलीं ठाणीं स्थापन करून आपले अधिकारीही ठेवून दिले. औरंगजेबासारखें दीर्घायुष्य त्याला लाभलें असतें, तर सातव्या शतकांतील चालुक्य सम्राट् दुसरा पुलकेशी ह्याचेप्रमाणे शिवाजी दख्खनचा सम्राट् झाला असता.

( ओ ) त्या धामधुमीच्या काळांत वैभवाचीं निदर्शक अशीं शिल्पकलेचीं कामें कोठून होणार ? तरीपण त्याने रायगडावर सुंदर वाडे व गंगासागर तलाव वगैरे कामें केलीं. अनेक मजबूत किल्ले हींच त्या वेळच्या शिल्प-कलेचीं स्मारकें होत.

( औ ) त्याने भाषाशुद्धीसाठी राज्यव्यवहारकोश नांवाचा ग्रंथ लिहविला. प्रधानांचीं फारशीं नांवें बदलून संस्कृत पद्धतीचीं ठेविलीं. दरबारचें सर्व लेखन मराठी भाषेंत व मोडीमध्ये होऊं लागलें. संस्कृत भाषेलाही उत्तेजन दिलें.

( अं ) स्वधर्मावर त्याचें प्रेम होतें; परंतु मुसलमानी धर्माला त्याने उपसर्ग दिला नाही. इतर हिंदु साधूंप्रमाणे 'बाबा याकूत' नामक मुसलमान साधूलाही तो पूज्य मानी. लुटींत सापडलेल्या कुराणाचे ग्रंथ किंवा स्त्रिया सन्मानपूर्वक तो परत पाठवी. त्याचे आरमारांत मुसलमानही अधिकारी असत. मदारी मेहतर ह्या मुसलमान फरासाने आग्र्यास त्याचा जीव वाचविला.


( अः ) शिवाजी लष्करी अधिकाऱ्याला पत्र लिहितो—

"कोणी कुणब्याकडील दाणे आणील, कोणी गवत आणील. म्हणजे मोंगलांहूनही अधिक तुम्ही, ऐसा त्यांस तळतळाट होईल ! रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाही. खजानांतून वाटण्या पदरीं घातल्या आहेती. कोणावर जुलुम करावयाची गरज नाही."

अशा प्रजावत्सल शिवाजीबद्दल भूषण कवि म्हणतो—


धरामें धरम राख्यो, राख्यो गुन गुनीमें ।
देस देस कीरति बखानी तब सुनी मैं ॥

# हिंदूंची शिल्पकला




चितोडचा जयस्तंभ

# हिंदूंची शिल्पकला.



विजयनगरची राजसभा



हंपी-विरूपाक्ष-देवालय

## हिन्दुस्थानचे हिंदु सम्राट्.

# उपसंहार.

पूर्वसंकल्पाप्रमाणे येथवर दहा हिंदु सम्राटांचीं चरित्रें वर्णन करून आणि मधूनमधून देशामध्ये झालेल्या धार्मिक व साहित्यिक घटनांची थोडथोडी माहिती देऊन प्रस्तुत पुस्तकाचें काम पूर्ण होत आलें आहे. उद्देशाप्रमाणे तें कार्य कितपत साधलें आहे, हें ठरविण्याचें काम मी सूज्ञ वाचकांवरच सोपवितों. ह्यानन्तर गतकालाकडे थोडी नजर देऊन, तत्कालीन सामान्य लोकस्थिति कशी होती? आपली अवनति कां झाली? आपणांवरील बहुतेक आक्षेप कसे विपर्यस्त व अतिशयोक्ति-पूर्ण आहेत? याचा विचार करून आपल्या इतिहासाचें रहस्य समजून घेतलें पाहिजे.

ह्या पुस्तकांत वर्णिलेल्या दहा सम्राटांइतकेच प्रतापी असे चालुक्य-वंशांतील दुसरा पुलकेशी, गुजराथेंतील सिद्धराज, धारचा भोज राजा, महाराजा रणजितसिंह असे अनेक राजे हिंदुस्थानांत होऊन गेले आहेत. महाराष्ट्रांतही शिवाजीनंतरदेखील अनेक हिंदुस्त्रीपुरुषांनीं आपलें तेज अनेक वेळा प्रकट केलें आहे. त्यांपैकी चिमाजीअप्पाने गोव्या पोर्तुगीजां-वर मिळविलेला वसई येथील विजय आणि महादजी शिंद्याने वडगांव येथे घेतलेला इंग्रजांचा खरपूस समाचार, हे विशेष नाविन्यपूर्ण व स्मर-णीय आहेत. इंग्रजांची जगप्रसिद्ध मुत्सद्देगिरीसुद्धा नाना फडणीस व महादजी शिंदे ह्या जोडीपुढे फिकी पडली होती!

तसेंच स्त्रीजातीला भूषण अशा- चौरागडची राणी दुर्गावती, चितोडची पद्मिनी, इंदूरची अहिल्याबाई, झांशीची लक्ष्मीबाई इत्यादि अनेक

स्त्रियांचीं चरित्रेंही वाचनीय व स्फूर्तिप्रद आहेत; परन्तु विस्तारभयास्तव त्यांच्या नामनिर्देशावरच मी भागवून घेत आहें.

आता लोकस्थिति पहावयाची ती शेती, व्यापार-धंदे, शिक्षण, शिल्प-कला व धार्मिक समजुती अशा विषयांची पृथक् पृथक् चर्चा करून पाहणें योग्य होईल.

## १. शेती.

जमीन सुपीक आणि अनेक प्रकारचें हवापाणी आपल्या देशांत असल्या-मुळे निरनिराळीं धान्यें, कापूस व इतर कच्चा माल विपुल पैदा होत असे. अनेक हिंदुराजांनी पाटबंधारे करून शेतीला उत्तेजन दिलें होतें. मेग्यास्थिनीज् म्हणतो- ' ऊस आणि कापूस ह्या पिकांचें दर्शन आम्हां ग्रीकांना प्रथम हिंदुस्थानांतच झालें ! ' निर्वाहाचे पदार्थ अत्यन्त स्वस्त असल्यामुळे लोक सुखी असत.

## २. व्यापार-धंदे.

हा देश कृषिप्रधान होता; तरी केवळ शेतकऱ्यांचा-अडाण्यांचा नव्हता. शेतकरी दुसरेही व्यवसाय करीत. येथील रेशमी व जरीचें कापड व इतर विविध कलाकुसरीचे जिन्नस परदेशीं जात. हिंदु व्यापाऱ्यांचा वाहतुकीचा धंदाही कित्येक शतकें स्वावलंबी होता. त्यामुळे इतर देशांतून भारता-मध्ये संपत्तीचा ओघ वहात असे.

## ३. विद्या व विद्वान्.

नालंद, तक्षशिला, उज्जयिनी, काशी, प्रयाग, कांचीवरम् इत्यादि ठिकाणीं मोठमोठीं विद्यालयें होतीं. बौद्धांचे विहार व हिंदूंचीं देवळें ह्यांमधूनही विद्यादान होत असे. छापण्याची कला नसतांही अनेक विद्वान् व विद्यार्थी काळजीपूर्वक हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह करीत. असे अनेक

ग्रन्थ चीनमध्ये गेल्याचें बौद्ध प्रवासी लोकांच्या वर्णनावरून दिसत आहे. ह्यावरून ज्ञानार्जन व ज्ञानप्रसार ह्या बाबतींत हिंदु विद्वान् किती उत्सुक होते, हें ध्यानांत येईल. कविश्रेष्ठ कालिदास ह्याच्या 'शाकुंतलें' नाटकानें तर गटे नामक जर्मन पंडिताला जणू वेडच लावलें ! अशा अनेक ग्रंथांचीं कित्येक भाषांतून भाषांतरेंही झालीं आहेत.

'आर्यभट्ट' ह्या ज्योतिष्यानें 'पृथ्वी आपल्या आंसाभोंवती फिरते, हें प्रथम शोधून काढलें. ग्रहण लागण्याचीं कारणें त्याच्या ग्रंथांत सापड-तात. वराहमिहिर ह्याची बृहत्संहिता म्हणजे प्राचीन ज्ञानकोशच होय. कादंबरीकार बाणभट्ट, गणिती ब्रह्मगुप्त व भास्कराचार्य, कोशकर्ता अमरसिंह व हेमचन्द्र ( जैन ) इत्यादि अनेक शास्त्रांतील विद्वान् नामांकित होऊन गेले. धार्मिक वाङ्मय हें तर हिंदूंच्या साहित्याचें एक स्वतंत्र आणि फार मोठें दालन आहे. त्यामध्ये हिंदु-बौद्ध-जैन अशा सर्व विद्वानांनी अनेक देशभाषांतून विपुल वाङ्मय लिहून ठेवलें आहे.

## ४. शिल्पकला.

भव्य आणि सुन्दर मंदिरें, प्रासाद, कीर्तिस्तंभ आणि मूर्ति इत्यादि गोष्टींवरून देशांतील कलाकौशल्य आणि संपन्नता अजमावतां येते. हिंदु-बौद्ध शिल्पकलेच्या कामांमध्ये 'अजिंठा' येथील लेणीं विशेष प्राचीन व प्रसिद्ध आहेत. मि० ग्रिफिथ नामक एक तज्ज्ञ १८७३ सालच्या रिपोर्टां-मध्ये म्हणतो– 'फ्लॉरेन्टाईन कला उत्तम चित्र रेखाटील, व्हेनेशियन् कला छानदार रंगकाम करील; परन्तु अजिंठ्यामधील चित्रांतून आढळणारें आविर्भावदर्शन मात्र कोणालाच साधाणार नाही !'

सम्राट् अशोकाचे वेळीं ही वास्तुविद्या व चित्रणकला ह्यांची चांगलीच प्रगति झाली होती. त्या वेळच्या गुंफांमधील आंतला भाग पॉलिश करून इतका गुळगुळीत व चमकदार बनविला होता कीं, तो दगडी नसून

काचेचा असावा, असा भास व्हावयाचा ! ज्या दगडी स्तंभाला ( दिल्ली ) फेरोजशाह तघलघाचा स्तंभ ( लाट ) असें म्हटलें जातें, तो अशोकाच्या वेळीं झालेला 'तोपरा' येथील स्तंभ होय ! त्याजवरील पॉलिश व चमक पाहून तो धातूचाच असावा, असें कित्येक पाश्चात्य लोकांनाही प्रथमतः वाटलें. कृष्णराज राष्ट्रकूटाने बांधलेलें प्रचंड शिवालय ( वेरूळचें लेणें ) हें जगांतील एक आश्चर्यच मानलें जातें ! दक्षिणेंत विजयनगर, तंजावर, मदुरा इत्यादि ठिकाणचीं भव्य मंदिरें व गोपुरें फारच प्रेक्षणीय आहेत. ह्या अनेक शिल्पकृतींमध्ये विविधता व वैशिष्ट्यदेखील दिसून येतें. ओरिसांतील भुवनेश्वर मंदिर व आठनऊशे वर्षांपूर्वीचा जगन्नाथाचा पूल, दक्षिणेंतील उंचच उंच व निमुळतीं गोपुरें, महाराष्ट्रांतील दौलताबाद किल्ला व हेमाडपंती घरें, कार्लें नाशिक इत्यादि ठिकाणचीं कोरीव लेणीं, अबूच्या पहाडावरील जैन मंदिरें, मेवाडमधील कुंभलगड किल्ला व राणा कुंभाचा कीर्तिस्तंभ इत्यादि भिन्न भिन्न प्रदेशांतील विविध कामें हीं त्या कलेमधील विविधतेची व वैशिष्ट्याचीं उदाहरणें होत. प्रत्यक्ष बांधकामांप्रमाणे तीं कामें कशीं करावीं, ह्याविषयी हिंदु कारागिरांनी अनेक ग्रंथही लिहिले आहेत.

उदाहरणार्थ राणाकुंभाच्या आश्रयाखालील 'सूत्रधारमंडन'कृत 'देवता मूर्तिप्रकरण व वास्तुशास्त्र,' तसेंच त्याचा पुत्र 'गोविंद' याचा 'कलानिधि' व 'वास्तुमंजरी' इत्यादिकांवरून रजपूत कला कळून येते. दिल्लीमधील विख्यात लोहस्तंभ 'चन्द्रगुप्त' ( विक्रमादित्य ) ह्याच्या वेळचा आहे. पंधराशे वर्षें तो उभा व उघडा असून गंजलेला नाही व त्यावरील लेखही अद्याप जशाच्या तसा आहे ! त्याचा व्यास १६ इंच असून उंची सुमारें पंचवीस फूट आहे. अशा प्रकारचें भव्य ओतकाम आजच्या यांत्रिक युगांतही क्वचितच सापडेल ! डॉ० फर्ग्युसन् ह्यानेही हिंदूंच्या ह्या प्राचीन कारागिरीची मुक्त कंठाने स्तुति केली आहे.

## ५. धार्मिक समजुती.

हिंदु समाजावर 'देव' आणि 'धर्म' ह्यांची विलक्षण छाप असते, किंबहुना त्यांतच आमच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनाचा अन्तर्भाव होत असतो. प्राचीन यज्ञसंस्थेशीं आमचें जीवन कसें निगडित झालें होतें, हें मागील चौथ्या प्रकरणांत दाखविलेंच आहे. 'देवालय' ही संस्थाही अशीच अनेक कामीं हितप्रद होणारी आहे व आजपर्यंत झालेली आहे. आजचे नवमतवादी लोक कांही म्हणोत, परन्तु खेड्यांतील बहुजन-समाजाला ती धार्मिक समजूत उपयुक्त आहे यांत शंका नाही.

१. देवालय ही हिंदूंची 'शाळा' होती. केवळ लहान मुलांनाच नव्हे, तर मोठ्या स्त्रीपुरुषांनाही कीर्तन--भजनाचे द्वारा नीति, कर्तव्य इत्यादि पाठ देणारी ती नमुनेदार पाठशाळा होती!

२. देवालय हें 'न्यायालय होतें. देवावरील श्रद्धामिश्रित भीतीमुळे सहसा असत्य भाषण त्याजागीं कोणी करीत नसे. गांवांतील चार समंजस लोकांच्या वजनाने अल्प खर्चांत न्यायदान होत असे.

३. देवालय, त्याभोवतालच्या धर्मशाळा, तळीं इत्यादि बांधकामें नवीन करणें किंवा जुनीं दुरुस्त करणें, ह्या कामीं गांवांतील अगर प्रांतांतील कारागिरीला उत्तेजन मिळे. हिंदूंच्या शिल्पकलेचे नमुने व स्मारकें म्हणजे मंदिरेंच होत!

४. देवाची स्तुति किंवा उपासना ह्यामध्ये गायन, वादन आणि नृत्य-कला ह्यांना उत्तेजन मिळत होतें.

५. देवालय हें टाऊनहॉल-सभागृह होतें. त्याचे भोवतालच्या ओवऱ्या म्हणजे अतिथींना निवाऱ्याच्या जागा असत. देवाचे उत्सव व जत्रा म्हणजे एक प्रकारचीं प्रदर्शनें होऊं शकत. तीर्थक्षेत्रांची यात्रा करण्याने देशाचा

भूगोल व सद्यःस्थिति कळण्यास मदत होई.

ह्या गेल्या दोन हजार वर्षांत बौद्ध–काल थोडासा वजा केला तर वर्णाश्रमधर्माचें आचरण बरेंच कडक स्वरूपांत होतें, असें दिसेल. तरी त्या कर्मठपणाला आळा घालून साधुसंत साध्या प्रेमळ भक्तीचा व समतेचा उपदेश सर्वांस करीत.

अन्यधर्मीय लोकांशीं वागतांना सहिष्णुता हा तर हिंदूंचा मुख्य गुण होय. बौद्ध–जैनांशीं झालेले शांत संग्राम अर्थात् पंडितांचे बुद्धिवाद आपण मागील अनेक प्रकरणांमध्ये पाहिले आहेतच. मुसलमान व ख्रिस्ती ह्यांचाही कोणी हिंदु राजाने सहसा छळ केला नाही. राणा प्रताप, शिवाजी, चिमाजी अप्पा ह्यांच्या तावडींत सापडलेल्या मुसलमान व ख्रिस्ती शत्रूंच्या स्त्रियांवर त्यांनी पापी नजर ठेविली नाही. मशिदी फोडणें किंवा थडग्यांचा विध्वंस व विटंबना असलीं कामेंही हिंदु राजांनी केलीं नाहीत. अपवाद म्हणून तापट शीखांचा एखादा सांगतां येईल, पण तोही सूडाच्या भावनेमुळे असेल ! असो. गुजराथच्या हिंदु राजाने मुसलमानी आक्रमणामुळे त्रस्त होऊन असहाय झालेल्या ‘ पार्शी ’ लोकांना उदार बुद्धीने आपल्या राज्यांत राहूं दिलें. याच लोकांतील राष्ट्रपुरुष दादाभाई नौरोजी ह्यांनी आमरण खऱ्या कळकळीने हिंद देशाची सेवा केली आहे.

हिंदु समाज आणि हिंदुस्थान देश ह्यांजवर परकीय इतिहासलेखकांकडून ‘ राईचा पर्वत ’ करून लादलेले कांही आक्षेप व दोष ह्यांविषयीं आता थोडा विचार केला असतां अप्रस्तुत होणार नाही; कारण अशा निंदकांमध्ये कांही स्वकीय लोकही असतात !

## १. इतिहास–लेखन.

सर्वांत मोठा आक्षेप म्हटला म्हणजे मुसलमानांच्या तवारिखा किंवा

पाश्चात्यांच्या डायऱ्या आणि एका स्वतंत्र पद्धतीने लिहिलेले इतिहास पहावयास मिळतात. तसा हिंदूंमध्ये प्रघात नाही. × ह्या आक्षेपांत सत्यांश फार थोडा आहे. हिंदूंच्या सामान्य प्रवृत्ति भौतिकापेक्षा आध्यात्मिक व धार्मिक स्वरूपाच्या विशेष असतात. अयोध्यापति श्रीरामचन्द्र केवळ खन्दा लढवय्या किंवा मोठा चक्रवर्ती राजा म्हणून हिंदूंना पूज्य वाटत नसून वर्णाश्रमधर्म चांगल्या प्रकारें स्वतः आचरणारा आदर्श पुरुष म्हणून आदरणीय वाटतो.

रामायण व महाभारत तसेंच निरनिराळीं पुराणें हीं वस्तुतः इतिहासच होत. मात्र त्यांजवर धार्मिक पावित्र्याचें व परंपरागत श्रद्धेचें आवरण आहे. कालाच्या प्राचीनत्वामुळे आणि ग्रंथकारांच्या वर्णनशैलीमुळे त्यांमधून क्वचित् अतिशयोक्ति किंवा असंबद्धताही असूं शकेल. आजच्या एखाद्या समारंभाचें किंवा चळवळीचें वर्णन जर निरनिराळ्या नियतकालिकांतून पाहिलें तर त्यांतही बरेंच अन्तर आढळतें ! पण तेवढ्यावरून ती चळवळ किंवा समारंभ सर्वस्वी कल्पित किंवा असत्य मानण्याचें कारण नाही. उपरिनिर्दिष्ट आमच्या प्राचीन ग्रंथांवरून केवळ राजेलोकांची नामावली किंवा सनावळीच न समजतां त्या काळांतील समाजस्थिति आणि नीतिदेखील उत्कृष्टपणें कळून येते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्येही 'इतिहास' विषयाचा उल्लेख असून 'पुराण, इतिवृत्त, धर्मशास्त्र अर्थशास्त्र, आख्यायिका आणि उदाहरण' असे त्याचे सहा भाग सांगितले आहेत. राष्ट्रकूटांसारख्या राजांनी दिलेल्या सनदांमधून ( दानपत्रें ) विद्यमान दानकर्त्या राजपुरुषांबरोबर त्याच्या कांही पूर्वजांचा पराक्रमही थोडा-बहुत वर्णिलेला असतो. हल्लीप्रमाणे इनाम द्यावयाच्या मिळकतीच्या

---

× पर्यायाने लिहून ठेवण्यासारखें हिंदू लोकांनी कांही कर्तृत्व दाखविलेंच नाही.

चतुःसीमा, ज्याला द्यावयाचें त्याचें नांव व कामगिरी आणि दिल्याची तारीख एवढीच माहिती त्या वेळीं देत नसत; त्यामुळे पुष्कळ ऐतिहासिक माहिती मिळूं शकते. देवगिरीचा प्रधान 'हेमाडपंत' ह्याने लिहिलेल्या धार्मिक ग्रंथांतून 'यादव' राजघराण्याचा बराच इतिहास आला आहे.

'कल्हण' नांवाच्या गृहस्थाने 'राजतरंगिणी' म्हणून काश्मीर देशाचा इतिहास लिहिण्याला इ० स० ११४८ मध्ये सुरवात केली व तो पुढेही जोनराज, श्रीवरपंडित, व प्राज्यभट्ट ह्या गृहस्थांनी क्रमाक्रमाने लिहून सोळाव्या शतकांत पूर्ण झाला ! सतत चारशें वर्षे निरनिराळ्या लोकांनी आस्थापूर्वक प्रयत्न करून आपल्या प्रांताचा इतिहास लिहिणें ही गोष्ट कौतुकास्पद तर आहेच; शिवाय त्यामधील चिकाटी व सहकार्य हे गुण अनुकरणीय आहेत. बिल्हण कवीचें 'विक्रमांकदेवचरित्र,' बाणभट्टाचें 'हर्षचरित्र,' चंदकवीचा 'पृथ्वीराजरासा,' हंमीर महाकाव्य, खोम्माण-रासा, 'पृथ्वीराजविजय,' 'कीर्तिस्तंभप्रशस्ति,' 'आल्हाखंड' इत्यादि ग्रंथांवरून पंजाब, काश्मीर, राजस्थान, बुंदेलखंड वगैरे प्रांतांचा बराच इतिहास मिळतो.

रजपूत लोकांत वंशावळी व ख्याति लिहून ठेवण्याचा फार प्रघात असे. बिकानेर व जोधपूर राज्यांत असे विस्तृत 'ख्याति-इतिहास' लिहिलेले आढळतात. जोधपूरच्या जसवंतसिंह राजाचा दिवाण 'मुहिणोत नैणसी' हा शूर, मुत्सद्दी व इतिहासाचा अभ्यासु होता. तो दिवाण असल्यामुळे मोठमोठ्या रजपूत व मुसलमान सरदारांशीं त्याचा विशेष परिचय असे. त्यांजकडून व भाट-चारण अशा दरबारी लोकांकडून व ठिकठिकाणच्या जुन्या ख्याति, लेख इत्यादि अनेक साधनांवरून त्याने आपला एक बृहत्-संग्रह तयार केला. त्यावरून १५-१६ व १७ व्या शतकांतील राजस्थानचा चांगला इतिहास समजतो. म्हणून पं० गौरीशंकर ओझा ह्यांनी 'मुहिणोत

नैणसी' हाच राजस्थानचा आधुनिक इतिहासकार होय; असें म्हणून कर्नल टॉडचें उच्चपद त्याला दिलें आहे. विजयनगरच्या राज्याविषयी 'आमुक्त माल्यदा' व मराठी राजांच्या बखरी हे सारे हिंदुजातीचे इतिहासच होत. त्यांचा अभ्यास करून नवीन धर्तीवर इतिहास लिहिणें हें सुशिक्षित व इतिहासप्रेमी लोकांचें कर्तव्य आहे.

## २. राष्ट्रीय भावना.

आपल्या लोकांना 'राष्ट्र' विषयक भावना माहीत नव्हती. ती इंग्रजांच्या एकछत्री अंमलामध्ये शिक्षण व वृत्तपत्रें इत्यादिकांमुळे अलीकडेच उत्पन्न होऊं लागली आहे, असा दूसरा आक्षेप आहे. पूर्वीपेक्षा दूरदूरच्या प्रांतांतील लोकांचें दळणवळण परस्परांशीं हल्ली वाढलें आहे, ही गोष्ट खरी आहे; पण राष्ट्रीयत्वाची मुख्य खूण 'स्वदेश-स्वधर्म-स्वभाषा' ह्यांविषयी अभिमान हीच होय! ह्या कसोटीवर आपल्या मनोवृत्ति लावून पहाव्या, म्हणजे आपण कोठे आहों, हें कळून येईल.

खऱ्या राष्ट्रभावनेसाठी समकालीन लोकांचा राग सोसून सामान्य लोकांकरिता ज्ञानेश्वरांनी संस्कृतांतील 'भगवद्गीता' मराठींत आणली आणि शिवाजीने अष्टप्रधानांचीं फारसी नांवें बदललीं, किंवा फस्ली वगैरे परकीय सन बंद करून स्वतःचा 'राजशक' चालू केला. आपल्या समाजांत येऊन मिळण्यासाठी बजाजी निंबाळकर शुद्ध झाला आणि स्वधर्मत्यागापेक्षा संभाजीने मरण पत्करिलें! छत्रपति जाग्यावर नसतां स्वदेशासाठी मराठे वीर सतत पंचवीस वर्षें लढले. त्यांच्या राष्ट्रीयत्वाला 'सूर्याजी पिसाळ' सारख्याचें नांव पुढे करून जर कोणी दोष देईल, तर तो त्याचा क्षुद्रपणा सिद्ध करण्याला अनेक खंडो बल्लाळ पुढे येतील!

आता हिंदु समाजाला प्रिय अशी संस्कृतिविषयक ऐक्यभावना सर्व

प्रांतांत कशी आहे, तें पाहूं—

मलबारमधील श्रीशंकराचार्य वैदिक धर्मरक्षणार्थ उत्तरेला बदरीनाथपर्यंत हिंडले. काशींतील गागाभट्ट हिंदु राजाचें पाठबळ मिळून धर्मरक्षण व्हावें म्हणून शिवाजीच्या राज्याभिषेकाला हजर राहिला. उदेपूरचा महाराणा 'लाखाजी' गया क्षेत्राच्या रक्षणासाठी वृद्धापकाळीं धावून गेला. मराठी साम्राज्याचे आधार असे प्रधान आणि सरदार 'काशी' घेण्यासाठी तळमळत होते. निजाम, टिपु सुलतान ह्यांचें राज्यांतील अनेक हिंदु संकटकाळीं आपुलकीने पेशव्यांकडे साह्याची प्रार्थना करीत. ह्या ऐक्याविषयी 'सर फ्रेडरिक व्हाईट' हा 'दि फ्यूचर ऑफ ईस्ट अँड वेस्ट' ग्रंथांत लिहितो—

"हिंदुस्थानांतील अनेक प्रांत, अनेक जाती व पंथ, अनेक भाषा अशा कारणांमुळे परस्परभिन्नता वाटते. परन्तु त्या सर्व विविधतेमध्ये एक विलक्षण प्रेमसूत्र आहे. तें राजकीय दृष्ट्या इतिहासामध्ये फारसें प्रगट झालेलें नाही. परन्तु तें इतकें बळकट व प्रभावशाली आहे की, तें सर्व देशाला एकत्र राखूं शकतें. त्याने अन्तर्गत विरोधांचा व बाहेरील आक्रमणांचा अनेक वार यशस्वी प्रतिकार केला आहे !"

## ३. एकमुखी राजसत्ता.

हिंदुस्थानच्या लोकांना एकतंत्री राज्यव्यवस्था आवडते. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' म्हणजे राजा हा ईश्वरी अंश आहे, अशी भावना बाळगणाऱ्या भोळ्या हिंदूंना युरोपियन लोकांच्या सहवासाने आता लोकसत्तेची नवी दृष्टि प्राप्त होऊं लागली आहे, इत्यादि विधानें देखील गैरसमजाचीं आहेत. आमच्या देशांत 'पार्लमेंट' नसलें, तरी इतर अनेक लोकसंस्था होत्याच. ग्रामपंचायतीच्या रूपाने हिंदुस्थानांत 'स्थानिक स्वराज्य' चालू होतें. 'राजा प्रकृतिरंजनात्' ह्याप्रमाणे वागणारा राजा 'ईश्वराचा अंश' मानण्यांत अयोग्य काय ?

## ४. निवृत्तिपर तत्त्वज्ञान.

'ऐहिक प्रगतीबद्दल उदासीनतेचें हिंदू तत्त्वज्ञान देशाला घातुक झालें.' हा आक्षेपही अत्युक्तिपूर्ण आहे. वर्णाश्रमरचना जर लक्षांत घेतली तर हा आक्षेप फोल ठरतो. चार वर्णांमध्ये फक्त ब्राह्मणच निरिच्छ असावे, अशी योजना आहे. बाकी तीन्ही वर्णांना 'उदासीन रहा' असें आमचें तत्त्वज्ञान सांगत नाही. व्यक्तिशः पाहिलें तरी पहिले दोन आश्रम ऐहिक उन्नतीला ठेविले आहेतच. वैदिक मंत्रांतील अनेक प्रार्थना व्यक्तीला व राष्ट्राला 'अभ्युदय' प्राप्त व्हावा, अशा अर्थाच्या आहेत! 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥' ह्या भगवद्गीतेच्या उपदेशाप्रमाणे लाखो रजपूत व मराठे स्वराज्यासाठी लढले आहेत. पिढ्यानुपिढ्या स्वदेश व स्वधर्मासाठी लढलेले वीर शेवटीं हरले, तरीही त्यांचें नांव इतिहासांत अजरामर राहील! निवृत्तिपर तत्त्वज्ञानाचे कट्टे पुरस्कर्ते तुकारामबुवा देखील शिवाजीला आपल्याबरोबर भजन करीत बसण्याला सांगत नव्हते! मग रामदासांच्या तेजस्वी उपदेशाबद्दल बोलावयासच नको!

सारांश, इतर देशांप्रमाणेच आमच्या देशांत व हिंदु समाजांत देखील अनेक राजे, मुत्सद्दी, तत्त्ववेत्ते व ग्रंथकार होऊन गेले आहेत आणि त्यांच्या कर्तृत्वाच्या उज्ज्वल इतिहासामुळे आपली भूतकालीन सुस्थिति समजते, वर्तमानकाळीं आत्मविश्वास वाटूं लागतो आणि त्यानंतर भविष्यकाळाविषयी आशेचे विचारही उत्पन्न होतात. आता आपल्या देशबांधवांमध्ये दोष नाहीतच, केवळ यदृच्छेने आमची अवनति झाली आहे, असें मी म्हणत नाही. परन्तु आम्हां हिंदूंच्या दोषांचें वर्णन सर्वत्र इतकें झालें आहे की, त्यामुळे आमचा आत्मविश्वास व स्वाभिमान नष्ट होऊन एक प्रकारें न्यूनगंड उत्पन्न होण्याचा संभव वाटतो! ज्या अर्थी जगांत आज आम्ही मागे पडलों आहों, त्या अर्थी आमच्यांत कांही दोष असले

पाहिजेत, हें खरें; परन्तु अनेक संकटांशीं झगडत आम्ही टिकून राहिलों आहोंत, त्या अर्थीं आपणांमध्ये कांहीं गुणहि असावेत, हें उघड आहे. ते गुण वृद्धिंगत करून दोष घालविणें हें आपलें काम आहे. राजकीय पराभवानंतरही आपली संस्कृति टिकविण्याचा उद्योग आमचा चालूच आहे. परकी संस्कृति आम्ही आपली अशी कधीच मानली नाही, हेंच आमच्या राष्ट्रीय इतिहासाचें रहस्य होय. परिस्थितीप्रमाणे मार्ग बदलतील; पण संस्कृति व राष्ट्रीयत्व रक्षण करण्याचा आमचा प्रयत्न निरंतर चालू राहील, असें म्हणण्याला हरकत नाही. शेवटीं 'रामदास' स्वामींचा आशीर्वाद लिहून हें पुस्तक संपवितों.

धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार॥
झाले आहेत पुढे होणार। देणें ईश्वराचें॥ १॥

REFBK-0005869

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ५८६९

## परिशिष्ट १ ले.

# आक्षेपांविषयीं चर्चा.

१ इतिहासलेखन (उपसंहारप्रकरण)

पृ० ९६ ओळ १० वर काश्मीरचा इतिहास इ० स० [illegible] च्या सुमारास पूर्ण केला. इत्यादि मजकूर आहे; त्याच्यापुढे खालील ओळी वाचाव्या—

कानडी भाषेंतील 'नरसराजचरित्र', 'म्हैसूर अरसुगळ पूर्वाभ्युदय', आणि 'राजेंद्रनामे' (कूर्ग प्रांताचा इतिहास), 'चिक्करायवंशावळी' इत्यादि ग्रंथ ऐतिहासिक स्वरूपाचे होत. म्हैसूरचा राजा 'चिक्कदेवराय' हा इतिहासप्रेमी असल्यामुळे त्याने अनेक ऐतिहासिक साधनांचा मोठा संग्रह करून ठेविला होता; परन्तु पुढे टिपू सुलतानाने आडदांडपणाने त्याचा नाश केला! असल्या सत्ताधीशांच्या उन्मादामुळे, नैसर्गिक आपत्तींमुळे आणि आमच्या अज्ञानामुळे अशा ऐतिहासिक लेखांची, स्मारकांची व वाङ्मयाची किती हानि झाली असेल, हें कोणी सांगावें?

× × ×

ह्याच मुद्द्याखाली स्वतंत्र टीप म्हणून पुढील मजकूर वाचावा—

टीप– भारतइतिहाससंशोधक मंडळ पुणें; पुराणवस्तुसंग्रह आणि इतिहासकार्यालय उदेपूर; अखिल भारतीय इतिहासपरिषद् अशा अनेक सभा-संस्थांमधून देशाभिमानाने प्रेरित होऊन अनेक विद्वान् भारताच्या इतिहासाचें संशोधन व लेखन करीत आहेत. त्यांच्या परिश्रमाने पूर्वीचा परावलंबीपणा कमी होऊन अगदी शालोपयोगी ऐतिहासिक पुस्तकांतही ताजेपणा आणि जिवंतपणा अधिकाधिक दिसूं लागला आहे. कै० राजवाडे, खरेशास्त्री, चिंतामणराव वैद्य, त्याचप्रमाणें पं० गौरीशंकर ओझा, श्री० गोविंदराव सरदेसाई, प्रो० यदुनाथ सरकार, डॉ० कृष्णन् इत्यादि थोर पुरुषांच्या ह्या कार्याबद्दल सारा देश त्यांचा ऋणी राहील, यांत शंका नाहीं.

+ + +

## परिशिष्ट २ रें

# नवीन संशोधन आणि सुधारणा.

| पृष्ठ | ओळ | आवश्यक दुरुस्ती. ( डॉ० अळतेकर यांचे मताने ) |
|---|---|---|
| १५ | १ | प्रजापतिनिधींची सभा नव्हती. |
| १५ | २० | १/६ हिस्सा कर कांही पिकांवर होता; सर्वत्र इतका जबर नव्हता. |
| २० | ८ | अशोकाचे वेळीं नालंदा विद्यालय नव्हतें, त्याची स्थापना इ० स० ४०० च्या सुमारास झाली. |
| २७ | ७ | गुप्त साम्राज्य ३२०–५३० पर्यंत २०० वर्षें होतें. |
| २८ | २० | समुद्रगुप्ताची स्वारी महाराष्ट्रांत आली नव्हती; असें आता सिद्ध झालें आहे. |
| ५३ | २ | ' किंवा लाट ' हे शब्द गाळावेत. |
| ८० | ४ | शिवाजीच्या कार्याचा खरा प्रारम्भ शके १५६२ इ० स० १६४० हा होय. (प्रा० पोतदार, पुणें ) |
| ९७ | ६ | वेदांमध्ये स्वदेश व मातृभूमीसम्बन्धी पूज्य भाव आणि सेवा एतदर्थीं उल्लेख आढळतात. उदा०– ... अभि राष्ट्रेण वर्धताम् ... ॥ त्वज्जाताः त्वयि चरन्ति ... (आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष, पान १९.) |